# अभिनव काव्यमाला

## भाग दुसरा

संपादक

रे. नारायण वामन टिळक

सायन्तनीषु मकरन्दवतीषु भृङ्गः
किं मल्लिकासु परमन्त्र [illegible]

स० र० भांडागार.

शके १८४३: इ. स. १९२२.

आवृत्ति दुसरी

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण
नवीन किताबखाना, बुधवार, पुणें सिटी.

किंमत एक रुपया.

CHECKED

# अभिनवकाव्यमाला

## भाग २ रा.

नारायण वामन टिळक

यांनीं तयार केला.

आवृत्ति दुसरी—१९२२

किंमत एक रुपाया.

पुणें, शनिवार पेठ, नं. ५७० येथें **अनंत सखाराम गोखले** यांनीं
आपल्या '**विजय**' छापखान्यांत छापिला व
प्रो० **लक्ष्मण गणेशशास्त्री लेले**, न्यू पूना कॉलेज,
यांनीं पुणें, पेठ बुधवार घ. नं. ४ येथें प्रसिद्ध केला.

# प्रस्तावना.

प्रसिद्ध साहित्यपंडित व महाराष्ट्र कवि रा. रा. लक्ष्मणशास्त्री लेले यांनीं 'शारदाप्रसादनमंडळा'च्या वतीनें अभिनवकाव्यमालेचा पहिला भाग प्रसिद्ध केल्याला उणीं पुरीं पांच वर्षे झालीं. इतक्या आवकाशांत या मालेचे आणखी निदान दोनतरी भाग प्रसिद्ध झाले असते. पण ते झाले नाहींत याला कारण आम्हीं आहों. 'शारदाप्रसादनमंडला'नें मालेचा दुसरा भाग तयार करून छापण्याचें काम आम्हांकडे सोंपविलें, व आम्हीं ते मोठ्या उत्साहानें पतकरिलें; पण पुढें एकामागून एक अपरिहार्य संकटें येऊन तें जें एकदां लांबणीवर पडलें तें पडलें; तें आज शेवटीं आमच्या एका कविमित्राच्या साहाय्यानें पुरें होऊन जगापुढें येत आहे. या अक्षम्य विलंबामुळें 'शारदा-प्रसादनमंडला'च्या कार्याची जी पिछेहाट झाली आहे, आमच्या कविमित्रांना व त्यांच्या काव्यांचा आस्वाद घेण्याकरितां सदा आतुर राहणाऱ्या रसिकांना जो त्रास झाला आहे, त्याबद्दल आम्ही जबाबदार असून ते म्हणतील त्या दंडास पात्र आहों. आणि त्यांनींहि आपल्या शीलास अनुसरून आम्हांला असा चमत्कारिक दंड केला आहे, कीं, त्याच्या वेदना आम्हांला आमरण सोसाव्या लागणार आहेत. हा दंड म्हणजे यांतल्या एकानेंहि आम्हाला एका शब्दानें न दुखविणें ! हें यांचें मौनव्रत, विश्वास, सहनशीलता आणि सहानुभूति यांचें पूर्ण द्योतक आहे, व याच्या योगानें यांनीं आम्हाला दंड करण्याच्या ऐवजीं एक अप्रतिम देणगी घ्यायला लावून निरंतर खालीं पाहावयाला लाविलें आहे.

असो; इतक्या उशिरानें कां होईना, हें पुस्तक तयार झालें म्हणून सकल सिद्धिदात्या परमेश्वराचे उपकार मानून आम्ही हें रसिकांच्या चरणीं अर्पण करितों. हें तयार करणार, अर्वाचीनांचा भयंकर द्वेष म्हणजे प्राचीनांविषयीं अमर्याद प्रेम, असें समजणारा नाहीं. येथूनतेथून साऱ्या आधुनिक कवींना एकदम अडाणी म्हणून, मग नानाप्रकारच्या लटपटी करून आपलें म्हणणें खरें ठरविणारांकडे याचें लक्ष्य बिलकूल नाहीं; भिन्न भिन्न कालीं व भिन्न भिन्न परिस्थितींत झालेल्या कवींची तुलना करून एकाला उत्तम आणि एकाला अधम

ठरविण्याची याची तयारी नाहीं; कोणत्याहि भाषेच्या प्राचीनार्वाचीन काव्यो-द्यानांत एकीकडे सारे कल्पवृक्ष आणि एकीकडे सारे एरंड असतात, हें त्याला खरें वाटत नाहीं; ज्यांत आपल्या आवडीचा विषय प्रतिपादला आहे ती मात्र कविता, बाकीची कपिला म्हणणारेच त्याला कपि दिसत आहेत. लेखण्या नव्हे, कुऱ्हाडी किंवा तरवारी घेऊन कोणी आधुनिक कवींच्यामागें लागले, तरी त्यांच्या अधुनातनत्वाचा उच्छेद होईल असें याला वाटत नाहीं. हा काल स्थित्यन्तराचा आहे. पूर्व आणि पश्चिम यांचें संमेलन होत जाणें हें या स्थित्यन्तराचें मुख्य लक्षण असून तें जसें इतरत्र तसें आधुनिक काव्यवाङ्म-यांतही पूर्णपणें दिसून येत आहे. हें स्थित्यन्तर आणि हें संमेलन होत असतां कांहीं गोष्टी बऱ्या तर कांहीं वाईट घडत असणारच; यांत ज्या वाईट असतील अगर वाईट आहेत अशी आपली कल्पना असेल, त्यांचे डोंगर करून, बरें असेल त्याला राईहून कमी लेखणें, असलें प्रतिकूलदर्शित्व हा काव्यसंग्रह करणाराला परम द्वेष्य आहे; अर्थात् आधुनिक मराठी कवितेंतले साधारण दोष याला क्षम्य वाटत असून, तिच्यांतले गुण रमणीय वाटत आहेत. याला प्राचीन मराठी कवि प्राचीन म्हणून प्रिय आहेत, आणि अर्वाचीन अर्वाचीन म्हणून प्रिय आहेत. याचें आणखी एक म्हणणें आहे, तें हें कीं, इतर उद्यानांप्रमाणें काव्योद्यानांतहि गुलाबापासून कोऱ्हाटीपावेतों सारीं फुलझाडें असतात, आणि या वैचित्र्यानेंच त्याला अधिक शोभा येत असते. आधुनिक मराठी कवींवर याचें अत्यंत प्रेम आहे. त्यांत जो खरा खरा कवि आहे, तो आज कसाहि असला तरी लौकरच जसा असावा तसा होणार, ही याला आशा आहे. आधुनिक मराठी कविता प्रगल्भ होत असून योग्यकालीं ती जग-न्मान्य होणार असा याला विश्वास आहे. सारांश, कवि प्राचीन असो वा अर्वाचीन असो, पौरस्त्य असो वा पाश्चात्य असो, त्याच्याविषयीं निर्मल प्रेम, आपल्या महाराष्ट्रांत आज हयात असलेल्या कवींविषयीं आशा आणि विश्वास या तीन गुणांवाचून ज्याच्यामध्यें दुसरी कोणत्याहि प्रकारची योग्यता नाहीं, व ज्याच्या कवींविषयीं व काव्याविषयीं समजुती साधारणतः वर सांगितल्याप्रमाणें आहेत, अशा मनुष्यानें तयार केलेला हा काव्यसंग्रह आहे, हें लक्ष्यांत ठेवून वाचकांनी याला व याच्या या प्रयत्नाला वागवून घ्यावें.

हें पुस्तक इतक्या लांबणीवर पडण्याचें कारण मध्यन्तरीं उपस्थित झालेल्या अनेक अडचणी व घोंटाळे होत, हें आरंभींच सांगितलें आहे. या पुस्तकांत आलेल्या कवींना त्यांच्या त्यांच्या वयोमानाप्रमाणें स्थळ मिळणेंहि अशक्य झालें, हा तरी या अडचणींचा व घोंटाळ्यांचाच एक विचित्र परिणाम आहे. आणि याबद्दल वाचकांनीं आम्हांला क्षमा करावी इतकेंच लिहिणें तूर्त आमच्या हातीं आहे.

हें पुस्तक छापून प्रसिद्ध करण्याच्या कामीं '**मनोरंजन**' छापखान्याच्या मालकांनीं आम्हाला जी मदत केली आहे, तीबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत ऋणी आहों. हा छापखाना रा. मित्रांचा म्हणजे महाराष्ट्रांतील लेखकवर्गाच्या मित्रांचा आहे, इतकेंच सांगितलें म्हणजे म्हणजे पुरे.

ना. वा. टिळक.

---

## दुसरी आवृत्ति.

आमचे मित्र रे० टिळक हे ही दुसरी आवृत्ति पहावयास राहिले नाहींत याचें फार वाईट वाटतें. त्यांना इष्ट अशा एक दोन गोष्टी हिच्यांत साधल्या आहेत. त्या वाचकांच्या सहज लक्ष्यांत येण्यासारख्या आहेत. या भागाशीं कवि या नात्यानें ऋणानुबंधी असलेले लेंभे, लोंढे, ठोमरे, गोविंदाग्रज, रेंदाळकर, चिंतामणी हे दिवंगत झाले, यामुळें मालेची पराकाष्ठेची हानि झाली आहे, पण ईशेच्छेपुढें कोणाचाच उपाय नाहीं हें ध्यानांत ठेवून माला गुंफण्याचा क्रम चालू ठेवण्याची मंडळाची इच्छा आहे. ती पूर्ण करणें कवींकडे आहे.

पुणें,
चैत्र वद्य १२ शके १८४४.

लक्ष्मणशास्त्री लेले.
चिटणीस, शा. प्र. मं., पुणें.

---

# अनुक्रमणिका.

पृष्ठें-


१ गणेशशास्त्री लेले — १-५
१ रामदासांचा उपदेश. २ अजविलाप.

२ विठ्ठल भगवंत लेंभे. — ६-१२
१ दशरथ आणि कौसल्या.

३ चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे. — १२-२६
१ वसंतमाधव. २ कविसंदेश
३ राष्ट्रीय मंगल

४ सौ० लक्ष्मीबाई टिळक. — २६-३७
१ पतिपत्नी.

५ लक्ष्मण गणेशशास्त्री लेले — ३७-५०
१ विपन्न आम्रवृक्ष. २ यमुनागीत.
३ हिमालयवर्णन. ४ करुणालहरी.
५ करुणविलास.

६ भास्कर रामचंद्र तांबे. — ५०-५४
१ वसावें वाटे दिनरजनी !- २ पांवा.
३ जगाहुनि भिन्न !- ४ बुलबुलास.

७ कृ. ल. पा. — ५४-६०
१ समुद्रवर्णन. २ पूर्वस्मृति.
३ मृत्युभय. ४ करुणविलाप.

८ विनायक जनार्दन करंदीकर. — ६०-६२
१ नदी आणि कवि. २ प्रीति निमाली तर-
३ सुवास.

९ 'Bee' — ६३-७२
१ कमळा. २ फुलांची ओंजळ
३ चांफा

१० **सौ० काशीबाई हेरलेकर** ७२--७५

१ सीतागीत. २ सीताविलाप.

११ **'भालचंद्र'** ७५-७७

१ 'आगरकरांस'— २ दुःखाश्रुमार्जन.

३ विश्वललित.

१२ **' श्रीराम. '** ७७-७९

१ झरोके.

१३ **विष्णु बाबाजी कुळकर्णी** ७९-८२

१ देवा ! विपत्काल दे !—

१४ **कृष्णाजी बाबाजी कुळकर्णी.** ८२-८४

१ वनदेवीचा वसंतोत्सव.

१५ **सीताराम वासुदेव पेंडसे, बी. ए.** ८४-८८

१ आजवा सरोवरावरील प्रातःकाळ.

१६ **दिनकर नानाजी शिंदे** ८८-९२

१ प्रदोषतारा. २ प्रियकरास पत्र.

३ विच्छिन्न बकुलास.

१७ **दत्तात्रेय अनंत आपटे.** ९२-९४

१ पुष्प आणि मानवी जीवित. २ फूल तें फूल !

१८ **गोविंद पांडुरंग देवधर, एम्, ए. एल्एल्. बी.** ९४-१००

१ वीणेस. २ संध्याराग.

३ गवत.

१९ **दत्तात्रय भिमाजी रणदिवे.** १००-१०५

१ कां घेतिस आढे वेढे ? २ विरहाकुल राजीमतीचे उद्गार.

३ ऐहिक नश्वरता.

२० **' सिंधुसुता '** १०५-१०७

१ शिशुवात्सल्य. २ वसंतागम.

२१ **' गोविंदाग्रज '** १०७-१२२

१ राजहंस माझा निजला ! २ अल्लड प्रेमास.

३ बागेंत बागडणाऱ्या लहानग्यास. ४ मुरली.

५ घुंगुरवाळा. ६ एकाद्याचें नशीब.

७ स्मृतिगीत. ८ गुलाबी कोडें.

९ विरामचिन्हें.

**२२ एकनाथ पांडुरंग रेंदाळकर.** १२२–१३०

१ कोकिळास. २ प्रबोधन.

३ प्रेमासाठीं !

**२३ 'नागेश'** १३०–१३५

१ फुलपांखरूं २ निराशेंतील उत्कंठा.

३ उत्कंठिताचें गाणें.

**२४ त्र्यंबक बापूजी ठोमरे.** १३५–१४८

१ अरुण. २ संध्यारजनी.

३ निर्झर. ४ फुलराणी.

५ प्रेमलेख. ६ काल आणि जीवित.

**२५ बाळकृष्ण दिनकर वैद्य, कल्याणकर.** १४८–१५०

१ संचय. २ संसार.

**२६ मोरो गणेश लोंढे.** १५०–१५२

१ जगावें कशाला ?

**२७ लक्ष्मण पांडुरंग भोसेकर.** १५३–१५५

१ मनास बोध. २ इंद्रियांस प्रार्थना.

३ गवत. ४ दिव्यांतील वात.

**२८ 'चिंतामणी.'** १५५–१५७

१ सूर्योन्योक्ति. २ वीरपत्नी कोण ?

**२९ पारुजी नारायण मिसाळ** १५८–१५९

१ कवींचे मित्र.

**३० भास्कर मोरेश्वर कीर्तने.** १५९–१६०

१ 'उद्यांचा नको करूं वायदा !'

# अभिनवकाव्यमाला.

## भाग दुसरा.

## गणेशशास्त्री लेले.

जन्म—इ. स. १८२५; मृत्यु—इ. स. १८९८.

## रामदासांचा शिवाजीला उपदेश.

[ आपणाला कांहीं उपदेश करावा, अशी शिवाजीनें
विनंति केली असतां रामदास म्हणतात. ]

दास ह्मणे "वत्सा ! तुज झाली मति हे सुपुण्यराशीनें,
सकला अशुभा निरसुनि जी अंतीं सत्पदा नराशी ने.
"स्रक्चंदनवनितादिकविषयां वान्ताशनापरी त्यागीं,
वैराग्यबोध करिते वेदान्ताची अशाच रीत्या गी.
"यास्तव गृहदारादिकविषयक सोडुनि समस्त आसक्ति,
श्रीमद्भगवत्पदयुगकमलाची सर्वदा करीं भक्ति.
"कामक्रोधादिक हे षड्वैरी त्रास देति जीवास,
त्यांतहि मानवदेहीं करिते हृदयांत काळजी वास.
"सुज्ञें धरूं नये बा दुष्टजनाच्या कदापि संगतिला,
तत्सम दुसरा न दिसे प्रतिबंधनहेतु वत्स ! सद्गतिला.
"उपडुनियां टाकावें प्रथमचि रे या मनांतुनी कामा,
सर्वानर्थकरचि तो, म्हणुनि तयाची स्थिरता न ये कामा.
"कामावाप्ति न होतां क्रोधाची येतसे मनीं उकळी,
जेथें क्रोधोत्पत्ती तेथें आहेचि बा अगाउ कळी[१] !

---

[१] कलह.

“ कामानें सर्वांचें बाटविलेंसे नरोत्तमा ! चित्त,
जेणें पूत विरक्ती न रुचे, रुचतें सदारसुतवित्त.
“ असतीऽ युवती करिती परोपरी नरवरा ! सदा नखरे,
न खरे मानावे ते, देती जे सुमतिच्या गळीं† नख रे !
“ कांताकनकधनादिक जैसा देते मनास अति माज,
तैसा भांग, अफू, मधु यांचाही देत नाहिंच समाज !
“ षड्रिपुंमाजीं भूपा ! जाणें बा अग्रगण्य काम खरा,
तत्पर होतो नर जो, अणुमात्रहि तो उणा असे न खरा !
“ भग्न मनोरथ होतां क्रोधानें व्याप्त होतसे नर तो,
यास्तव मुळींच कामीं चित्त तुझें नरपते ! कधीं न रतो.
“ तो नर नव्हेचि अंध क्षितीश्वरा ! जो विहीन नयनांहीं;
क्रोधाधीनचि अंध श्रेष्ठ वदति, त्यांत अन्यथा नाहीं.
“ पापाला मूळ असे लोभ, असें सर्व बोलती संत,
जो त्यागी लोभातें, त्याच्या सौख्या नसेच बा अंत.
“ अज्ञानें मोह पडे, यास्तव तूं ज्ञान आधिं संपादीं,
नसतांही सर्प दिसे अज्ञानाच्या वशेंचि जी वादी !
“ मोहाच्या योगानें ज्ञान्याहि भ्रांति पडतसे मोठी,
ज्यावरि ईशदया बहु, तोचि मनांतून दूर या लोटी.
“ धनयौवनादियोगें येतो जो माज तोचि मद जाणें,
रावणबाणार्जुनमुख‡ नाशियले वश करोनियां ज्यानें.
“ परदुःखसुखांनीं जो क्रमें करित सौख्य, दुःख, मत्सर तो,
त्यातें सोडुनि, संगीं चित्त तुझें साधुच्याचि वत्स ! रतो.
“ त्रैलोक्याही जिंकी त्याला विजयी अम्ही कधीं न ह्मणूं,
परि या षड्रिपुवर्गा जिंकी त्यालाच मात्र विजयि गणूं !
“ आहे एक जगाचा सृष्टिस्थितिनाशनास कर्ता रे,
जेणें इच्छामात्रें निर्मियले भू, खगोल, खग, तारे.

---

ऽव्यभिचारिणी. †गळीं नख देणें म्हणजे ठार मारणें. ‡रावण, बाणासुर, सहस्रार्जुन इत्यादि.

" श्रीरामादिकरूपां घेउनियां जो जगांत अवतरतो,
त्यातें प्रेमपुरःसर भजतां निश्चय मनुष्य भव तरतो॥"
—शिवाजीचरित्र.

[ २ ]

## अजविलाप.

" मनेंही म्यां केलें कधिंहि न तुझें अप्रिय सये !
मला टाकायाची मति तव मनीं कैंवि अजि ये ?
पति क्षोणीचा मी, परि वरिवरी प्रीति तिकडे,
खऱ्या प्रेमाचा तो भर सकल वाहे तुजकडे !
" ज्यांमाजीं भरलीं फुलें सुरुचिरें, जे नील भृंगापरी,
ज्यांचे पेड वळोनि सुंदर अशी वेणी दिसे साजरी,–
त्या केशांस समीर लागुनि सये ते हालती जें अतां,
होतो भास मनास कीं जिव तुझा येतो जणूं मागुता !
" कोणी एक लता हिमालयगता तेजास जी वागवी,
रात्रीं होउनियां प्रकाशित, तमा ती तेथ त्या घालवी;
तैशी सावध होउनी मम सखे ! ऊठ स्वयें सुंदरि !
माझी ही विरहव्यथा सकलिका आतां करीं गे दुरी.
" रात्रीचें मिटतें सरोज उदरीं ज्याच्या अली कोंडती,
ते शब्दा करिती न, ते दिसतसे त्याची जशी का स्थिति-
तैसें भाळ विशाळ युक्त अलकीं ऐसें तुझें जें मुख–
तें निःशब्द विलोकुनी मज गडे ! वाटेल कैसें सुख ?
" चंद्राला रजनी पुन्हां मिळतसे, कोकास कोकांगना,
त्यांच्या सावधि तो वियोग ह्मणुनी सोसे तयांच्या मना;
आतां भेट तुझी अशक्य ह्मणुनी संताप जो हा असा–
होतो त्वद्विरहें, सखे ! मज न तो जाळील कां अग्निसा ?
" शय्या सुंदर पुष्पराजिरचिता ती ही खुपे गे जिला,
ऐसी शारदपूर्णचंद्रवदने ! जी त्वत्तनू कोमला–
ती काष्ठीं घटिता भयंकर चिता दीप्ताग्निनें संयुता
गे सोशील कशी सरोजनयने ! सांगें अतां तत्त्वतां !

“ एकांतिंची सहचरी तव मेखला ही,
तीही अतां मधुर शब्द करीत नाहीं !
याचेवरोनि मज हे करभोरु ! भासे
कीं ती तुझ्याचि विरहें मृत जाहलीसे !
“ तूं मंजुल स्वर दिले सखये ! पिकांस,
हंसांस मंदगति, दृष्टि चला मृगांस;
वातें वनांत डुलती लतिका सुरेख,
त्यां हावभाव दिधला रमणीय देख !
“ मातें घडो सुख म्हणोनिच पाठिमागें,
या या स्थलीं स्वगुण ठेवियले तुवां गे !
त्यांनीं मला सुखविलें, परि तेचि पाहीं
आतां मदीय तनुची करितात लाही !
“ देखें हीं सहकार आणि फलिनी बागामधें संप्रति,
या दोघांस परस्परें सुचतुरे ! त्वां कल्पिलीं दंपती;
त्यांचें मंगलकार्य हें न करितां गेलीस लोकांतरीं,
आहे हें करणें तुझें उचित कीं ? सांगें मला सुंदरि !
“ केला दोहद तूं अशोकतरुला, त्याला फुलें पातलीं,
होतीं सुंदर योग्य बेणिस तुझ्या जीं भूषणें चांगलीं;
झालीस परलोकवासि सखये ! या कारणानें असा,
तीं वाहूं तव पिंडदानसमयीं पिंडावरी गे कसा !
“ ज्याचे नूपुर वाजती छुमछुमा ऐशा पदांचा मला-
झाला अद्भुत लाभ, हें मनिं सये ! हा आठवोनी भला-
पावे चंद्रमुखी ! अशोकविटपी शोकास तो अंतरीं,
पुष्पांचें मिष दाउनी करितसे ही बाष्पवृष्टी वरी !
“ तुझ्या श्वासाऐसीं बकुलकुसुमें सौरभयुतें-
कराया तल्पांची अपण बसलों येथ निरुतें;
वदूं काई कांते ! त्यजुनि तिस अर्धीच सुभगे !
अशी निद्रा घेसी, उचित तुज हें ? सांग मज गे.

## गणेशशास्त्री लेले.

“ तुझ्या दुःखें दुःखी, तव सुखभरानें बहुसुखी,
 अशा तूझ्यासंगें असति सखया जाण सुमुखी!
जसा शुक्लीं पक्षीं विधु सुभग वाढे प्रतिदिनीं,
 तसा आहे तूझा तनय गुणशालीहि सदनीं.
“ तुला जें का वाटे प्रिय मजहि वाटे प्रियचि तें,
 मतीं दोघांच्याहीं रुचि अणुहि भिन्ना न वसते!
अशी सर्वांशांनीं स्थिति सकलसौख्यास्पद मना–
 असोनी हा कैसा हृदयिं धरिला निष्ठुरपणा?
“ झाली ध्वस्त रती, धृतीहि सकला अस्ताचला पावली,
 संपे गायन, उत्सवींहि ऋतुच्या नाहीं रुची राहिली;
तैसें कारण अल्पही न उरलें या भूषणांचें अतां,
 शय्या शून्यचि जाहली मज अजी जी जाळिते पाहतां!
“ तूं माझ्या अससी धनीण घरची, मंत्री विचारांतली,
 एकांतांतिल मित्र, शिल्पकृतिची गे पट्टशिष्या भली;
ऐशी तूं–तुजला दयारहित या दैवें बलें हारितां,
 नेलें सर्वहि! काय शेष उरलें तें तूं वदें तत्त्वतां!
“ काढोनी दयिते! मधु स्वमुखिचें तूतें मियां अर्पिलें,
 तें प्राशोनिच संप्रती मन तुझें संतुष्ट कीं जाहलें;
त्या पानावर हें तिलोदक कसें स्वर्गीं रुचेल प्रिये?
 झालें दूषित जें मृगांकवदने! उष्णाश्रुंनीं माझिये.
“ त्वत्संगें विषयोपभोग घडले नानापरींचे मला,
 अद्यापी सखये! उणें न किमपि द्रव्यादि संपत्तिला;
तत्रापी विरहें तुझ्या मम मना झालें महारोचक,
 तेणें कांहिं न आवडे, गणि सखे! दुःखामधें हें सुख!”
ऐसें तो करुणस्वरें परिपरी बोलोनि कांतेप्रति,
 उद्यानस्थ तरूंसही रडविता झाला तईं भूपति;
वाहे जो मकरंद फुल्ल कुसुमांपासोनि त्यांखालतीं–
 तद्रूपेंच तईं गमे जनमना अश्रूच ते ढाळिती!

—रघुवंश, सर्ग ८ वा.

——:०:——

# विठ्ठल भगवंत लेंभे.

जन्म–इ. स. १८५०.　　　मृत्यु–इ. स. १९२९.

## दशरथ आणि कौसल्या.

ऐशा रम्य त्रिभुवनकलामंदिरीं पट्टराणी
　श्रीकौसल्या दशरथनृपा शोभली रूपखाणी;
माया ब्रह्मा, कनकलतिका कल्पवृक्षास जैशी,
　किंवा मेघा चपल चपला, सुप्रभा श्रीरवीशी.
उद्यानाची कुसुमसुषमा, चंद्रिका वा शशीची,
　गंगौघाची विमल लहरी, कांति किंवा हिऱ्याची;
ज्योतिर्माला उदयगिरिची, श्री* सुरत्नाकराची,§
　शोभे ऐशी दशरथनृपा रत्नमालाचि साची!
सौंदर्याचें सदन अथवा सार तें सारसाचें,
　आनंदाचें भुवन अथवा रंजन प्रेमळाचें,
नेत्रानंदप्रचुर विलसे रूप त्या सुंदरीचें
　जाणों तेज त्रिजगिं पसरे प्रेमरत्नांकुराचें!
जीच्या भोंतीं मधुकर करी मंजुगुंजारवातें,
　आश्चर्यानें चकित हरिणी होय पाहूनि जीतें;
होई नम्रा कुसुमित लता देखुनी सुंदरीतें
　वाणी जीची श्रवणमधुरा मौन दे कोकिलेतें.
सेवाधर्मी परिजन झटे मोद द्याया मनासी
　होती जेथें अगणित जरी साधनें रंजनासी;
श्रीकौसल्या–सुखदसदनीं भूप जों येत आहे—
　तों त्या स्थानीं विकलहृदया खिन्न देवीस पाहे!
चिंताक्रांता स्तिमितनयना निश्चला ते मुशीला
　बैसे खिन्ना निजकर अहा! लावुनीयां कपोला;

---

*शोभा.　§ सागराची.

दासी झाल्या चकितनयना निष्प्रभा चंद्रलेखा
आश्वासाया कुशलरमणी धांवल्या सर्व देखा!
पुष्पांसंगें कच विखुरले, म्लानता ये मुखाला,
कंठीं होता कुसुमसुरभी हार तोही गळाला!
शालूसंगें स्तनहि भिजले अश्रुबिंदुप्रपातें,
जाणों मुक्तांजलि वरुनिया† सोडिते अप्सरा ते!
प्रत्युत्थान प्रियपतिस ते देउं जातां शुभांगी
प्रेमें तीचा कर धरुनियां बैसवी तो पलंगीं;
कुर्वाळोनी वदन पुसुनी अश्रुबिंदु स्वहस्तें
राजा प्रेमें सदयहृदयें बोलता होय तीतें.
"कां म्लानत्व प्रियसखि! असे या मुखांभोरुहातें?
अंतःशोकस्फुरित हृदयीं दुःख मावे न, कांते!
मुक्ताजालग्रथनकुशला‡ अश्रुंनीं पक्ष्मपंक्ति–
झाली; तेणें अरुणकमलासारखी नेत्रकांति!
"नाहीं झाले चरण तव हे रक्त लाक्षारसानें
तेणें आलें अरुण कमला आजि धन्यत्व जाणें!
कर्णीं कां गे कलरव न ये या स्थळीं नूपुरांचा?
कां गे मूका मणिमय तुझ्या किंकिणी मेखलेच्या?
"भिन्नच्छाया नयनसुभगा त्यागिली रत्नमाला,
अश्रुक्लिन्ना अरुणरचना दैन्य दे या कपोला;
नाहीं शोभा प्रियसखि! जया कर्णपूरप्रभेचीं§
त्या दीनातें मग वद सखे! पांडुरी ये न केचीं?
"गे या भालीं तिलक न दिसे आजि गोरोचनाचा,
लोकीं ख्यात प्रणयतिलक स्पष्ट जो सुंदरीचा!
नाहीं केली कुसुमरचना रम्य लीलालकांतीं
निश्चंद्रा गे जणुं मज गमे शार्वरी नील कांति!

---

† आकाशांतून. ‡तुझ्या पापण्या अश्रुयोगानें मुक्ताजाल पसरण्यांत कुशल आहेत, असा भाव. § ज्या गालांना तुझ्या ताटंकाची प्रभा नाहीं; म्हणजे तूं ताटंकें काढून टाकलीं आहेस, असा भाव.

“ हृदय धडधडे हें दीर्घ निश्वासयोगें,
अधर थरथरे हा, कांपती कोमलांगें;
वरिवरि तुज मूर्च्छा येउं पाहे कृशांगि!
असुखभर वरांगे! ताप दे अंतरंगीं.
“ सखि! सकल सुखाचें मूल जें रम्य हास्य
वदनकमल ऐसें स्थान जें रंजनास,
बघुनि कमलनेत्रे खिन्न गे दुःख होई
सदयहृदय कांते! एक या साक्ष देई.
“ प्रियजनपरिरंभा अन्य नारीस देतां
बघुनि तुज जडे हे काय गे स्वप्नचिंता?
हंसत सखि! ‡सपत्नी–मैत्रिणी, मंदिरातें–
बघत बघत गेली यामुळें खिन्नता ते?
“ नवल मजसि वाटे मौन हें आजि कां गे?
कवण तुजसि देई ताप? सांगें शुभांगे!
परिजनकृतमन्युत्रस्त हें चित्त झालें
गुरुतर तव शोका कारण स्पष्ट बोलें.”
नरपति बघुनीयां स्तब्ध ऐशी मृगाक्षी
परिजनगण बाहे लोकसंसारसाक्षी;
लगबग मग आली चंचला एक दासी
तिजसि नृपति बोले “ काय झालें प्रियेसी?”
नृपतिचरण भावें वंदुनी शीघ्र दासी
विनयमधुर ऐसें बोल बोले तयासी,
“ सदयहृदय देवा! धर्मपाला नृपाला!
गणि तनुसि अधन्या स्वामिनी हे दयाला!
“ सकल रिपुकुलाचे काल जे नाथ जींचे–
जवळ असति ऐसे रक्षणीं सज्ज साचे,

‡ सवतीची मैत्रीण तुझ्या मंदिराकडे पहात हंसत गेली. म्हणजे आपली सखी प्रियजनसंगमसुखाचा अनुभव घेऊन तुला अधन्य केलें आहे, म्हणून हंसत गेली.

छळिल कवण ऐशी राजभार्या जगीं या ?
    परिजनगण आज्ञापालनीं दक्ष आर्या !
“ जरि परम सुखाचें स्थान† तें सन्निधानीं,
    अभिनव तरुणींचें सार‡ हे रूपखाजी,
सकलसुखविलासीं मंदिरीं पुष्पबाण,
    निशिदिनिं परि देवी होतसे हाय खिन्न !
“ अशन–शयन–पान त्यागिले भोग सारे,
    नयनसलिल वाहे सर्वदा शोकभारें;
बघुनि सकल ऐशीं भूषणें§ जागजागीं
    खचित गमति मातें या क्षणीं हीं ०अभागी !
“ सुकुनि विगतभा ही जाहली पुष्पशय्या,
    पडुनि सकल पात्रीं राहिले हार वाया;
विफल पडुनि राहे गंध हें चंदनाचें,
    कवण उघडिताहे पात्र हें तांबुलाचें !
“ अतिकरुण वचें ही सारिका साद घाली,
    प्रियजनवचनांची× विस्मृती हीस झाली;
जवळजवळ येई बाळ लोभें मृगाचें,
    विकल हृदय ठावें काय त्या स्वामिनीचें !
“ चतुर पति, विलासी, कल्पवृक्षासमान,
    अभिनव मधुवल्ली सुंदरी हे सुजाण;
सुखकर, रमणीया, प्रेमळा, संगमाचें—
    फल= अजुनि दिसेना भाग्य जें या जनांचें.
“ अभिनव सुषमा या इंदिरामंदिराची
    जणुं सकल सुखाची रम्य शालाचि साची,
जरि बहु दिन येथें संचरे प्रेम बाई
    अजुनि अहह ! देवीं नंदनानंद नाहीं !

---

† प्रियपति. ‡ देवी कौसल्या. § हार वगैरे जागजागीं पडलेले पाहून. ०भोक्त्याचे अभावीं भाग्यहीन. ×बरेंच दिवस शिक्षण नसल्यामुळें. =पुत्रप्राप्ति.

“ छवि धवल विराजे ज्या स्थळीं चंद्रिकेची,
   मणिमय नवमाला ज्यावरी निर्झरांची,
गिरितटगत ऐशा माधवीकुंजगेहीं—
   प्रभुचरण§ नमोनी पुण्यसाफल्य नाहीं !
“ तरुवर फलभारें ज्या स्थळीं नम्र होतीं,
   कुसुमित लतिकांच्या रंगल्या जेथ पंक्ति;
सुधवल बिसमाला, रम्य फुल्लारविंदें
   विमलजलतरंगीं डोलती जेथ मोदें.
सुचवि करुनि जेथें कोकिळा कूजिताला
   मदनसख वसंत स्त्रीजनानंद आला !
मधुवन जरि ऐसें दंग झालें विलासें
   अजुनि न सुख दैवीं वत्सला माउलीचें !
“ अभिनव सरयूच्या संगमान्तस्तरंगां-
   वरुनि पवन वाहे मोद दे अंतरंगा;
असुनि पुलिन ऐसें साधन प्रेमरंगा
   अजुनि न मळवाया बाळ या कोसलांगा.
“ निशिदिनिं ह्मणुनीयां होतसे खिन्न देवी,
   करुण वचन आह्मां बोलण्या दैव लावी;
वरिवरि बघुनीयां धूसरा चंद्रिकेतें
   अतिकरुणभरें ये पाझर प्रस्तरातें ! ”
करुण वचन ऐसें ऐकुनी किंकरीचें,
   हृदय खळबळोनी राय तो स्तब्ध बैसे;
दृढतरपरिरंभा देउनीयां मुखातें—
   पुसुनि निजकरानें बोलला सुंदरीतेः-
“ प्रियसखि ! बघ ऐशी खिन्नता व्यर्थ आहे,
   अनुकुल समयाला पाहिजे दैव पाहें;

§ पतीचे पाय धरून.

प्रियसुत हृदयाशीं चुंबुनीयां धराया
विधिबळ नच आह्मां साह्य, हा शोक वाया.
" असुखसुख सखे ! दे कर्म जन्मांतरींचें,
अनुकुलविधियोगें पुण्यसाफल्य साचें;
प्रभुवरचरणांतें भक्तिभावें भजोनी,
तनयसुख मिळे हें बोलिलें सज्जनांनीं.
" गुरुजनरुचिराशी, साधुसंगप्रभाव,
ऋषिवरचरणांच्या वंदनीं प्रेमभाव;
हितकर सखि ! त्यांहीं ईप्सितप्राप्ति होय,
सदय मुनि न देती नंदनानंद काय ?
" खचितचि मज भासे मूढ हें अंतरंग,
उठति सखि ! विकारें जेथ नाना तरंग;
छवि धवल मुखीं या गर्भभारें बघावी,
शशधरधवलांगा चांदणी रात्र जेवीं !
" अलसललितगात्री, गर्भखिन्ना प्रियेतें
बघुनि कधिं शुभांगे ! मोद होईल मातें ?
परिजन कधिं वार्ता पुत्रजन्मोत्सवाची
करितिल कथुनीयां धन्य गे या जिवाशीं ?
" स्मित वदन जयाचें दर्शनानंदकारी,
रुचिरतर तनूचा हर्ष दे स्पर्श भारी,
धरुनि सुमुखि ! ऐसें तान्हुलें अंकदेशीं–
कधिं रुचिरकरानें सारिसी कुंतलांशीं ?
" रुचिरतनुलता ती कोमला बालकाची
चपलहरिणनेत्रानंददा होय साची;
प्रणयतरललीलावत्सला माउली ते
वरिल सुख कधीं हे चुंबुनी तान्हुल्यातें ?
" कमलसुमनरम्या मंगला बालकाच्या
स्मितरुचिर मुखांनीं रंगल्या वृत्ति जीच्या,

सहज हंसुनि मोदें बाळ पोटीं धरोनी
  करिल मजसि केव्हां धन्य ही प्राणराणी ?
"हृदयिं अनुभवोनी नंदनानंदकंदा
  कवळुनि निजबाळा सांडुनी कामधंदा-
हंसतहंसत केव्हां घेऊनी स्तन्यदेशीं
  स्मित करिल शुभांगी देखुनीयां प्रियाशी ?
"अरुणअरुण गाला चुंबितां मोद होई,
  मृदुलमृदुल शय्या पाळणां सौख्य देई;
मधुर मधुर 'जो जो' गाउनी गोड गाणीं-
  वरिवरि सुख केव्हां देइल प्राणराणी ?"

——:०:——

## चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे.

जन्म-इ. स. १८७०.

### वसंतमाधव.

आला वसंत कवि-कोकिल हाहि आला,
  आलापितो, सुचवितो अरुणोदयाला;
हा 'ऊठ ऊठ!' म्हणतो जणुं भारताला,
  ऐका ! पहा उठुनि या प्रतिभा-रताला.
वाल्मीकि हा जणुं दुजा दिसतो न कांहीं,
  आलाप मात्र निघती अमृतप्रवाही !
वाङ्मोहनी किमपि साधियली जयांनीं,
  कोठें वसोत मग ते नचि मानहानि !
ही दिग्वधू तदनुरूप पतीस लाजे,
  झाली सुवर्णरसतुल्यचि, काय साजे !
आरक्त ही बघुनि हो अनुरक्त भानु,
  हा प्रेमरंग उभयांतिल काय वानूं !

तेजोनिधान पद 'देव' यथार्थ ज्याला,
दिव्यासनास रवि तो अधिरूढ झाला;
आहे तदीय नववर्षसखा सवें तो—
दृष्टींत सख्य असल्यास दिसोनि येतो.
हे सारखे वरद, मंगल अन्तरंगें,
आले जगांत उदया उभयानुषंगें;
जे कां समान हृदयें अथवा स्वभावें,
त्यांनां अभिन्न गणिती जन एक भावें.
आहेत दोन मधु माधव तुल्य मास,
केला वसंतऋतु एकचि तत्समास;
हेही सखे मिळुनि 'मित्र' पदांत तैसे,
नारायणीं नर, विराजति एक ऐसे.
जे सारखे असति सुंदर आकृतीनें,
त्यांहूनि पूज्य समसुंदर जे कृतीनें;
हा मित्रयोग रुचिराकृतिचाच नोहे,
तत्तुल्य-चारुचरितांतहि योग आहे.
येतांच एक उदया करितो दिनाचा—
प्रारंभ, अन्य करितो तरि मंगलाचा;
एकें प्रकाश परिपूर्ण दिशेदिशेला
आनंद तोंच इतरें जगतांत केला.
वृक्षांवरी किलकिलाट वनोवनाला—
झाला, ध्वनी गजबजोनि जनीं निघाला;
कांहीं विहंगम टिपेवरिच्या सुरांनीं
गातात तों गुरव हे सनयासुरांनीं.
कोठें घुमोनि असती जंव पारवे, तों
कोठें मृदंग रवसाम्य तदीय देतो;
हे आम्र जों कुणि फळें, कुणि मोहरांनीं,
तों शोभती जनगृहें ध्वजतोरणांनीं.

हीं पावनें उपवनें पवनें, हिमानें,
हीं अंगणेंहि जन-मार्जन-सिंचनानें;
पुष्पें अनेकविध गाळिति वन्यवल्ली,
गेहांगना विविध घालिति रंगवल्ली.
या कोंकरांस, करडांसहि वासरांनां
येतात हर्षलहरी लहरी मुलांनां!
चेंडूसमान कुरणांतुनि तीं उडाया!
हीं लागलीं परि घरांतचि बागडाया!
वन्यस्थलें, हिमगिरी, बहु निर्झरांनीं
न्हाती तसेच जनही विपुलां जलांनीं;
आपापुलें करिति ते जरि धर्म-कर्म,
कांहीं तयापरि दिसे तरि तुल्य मर्मः-
कुंजांत गुंजन घुमे बहु बंभरांचें,
देवालयांत इकडे उदरंभरांचें;
हे ध्यान-मौन धरिती बक भक्ष्यसाधू,
लोकीं असे बहुत हंत! महंत-साधु!
यांच्यावरोनि अपुली फिरवोनि दृष्टि,
अन्यत्र हीच निरखूं निमिषैक सृष्टि;
सारे हिच्यांच भरले नहि कार्यसाधू,
कोणी खरेच असती गुरु आणि साधु.
आहे अशेषजनजीवन हेतु जो कां,
सर्वप्रबोधक, नियामक सर्व लोकां;
जो एक अंतिम गती, गुरु राघवाचा,
तो सूर्य हा तळपतां गुरु अन्य कैचा!
सर्वत्र जें भरुनियां उरलें अनंत,
खंब्रह्म जें निगम गाउनि घे उसंत;
निःसंग, निर्मल, निरंतर अन्तराळा-
वांचूनि त्या गुरु कुठें बघतां निराळा?

जो स्पर्शतां त्रिविध ताप लयास नेतो,
 ऱ्हाया प्रसन्न मन भिन्न सुगंध देतो
जीवांस सर्व जगतासहि जो जिव्हाळा
 तो संत संतत असे, कसला उन्हाळा ?
वर्षाव हो! कडकडाट उडो विजांचा!
 ज्यांचा न निश्चय म्हणोति ढळावयाचा;
दिव्यौषधी किमपि ते रससंग्रहाला,
 दावूं अशा किति तरी सुमहंतमाला!
कष्टोनि तिष्ठति कुठें तरि काननांला,
 बोलाविती निजविहंगमुखें जनांला;
छाया करोनि अनुकूल फलांस देती,
 या सज्जनीं चहुंकडे भरलीं वनें तीं!
विश्वंभरा, जननि, दैवत जानकीचें,
 आहे क्षमा किमपि हें व्रत-शील-जीचें;
आम्हांस जी धरिसे मरणान्त उर्वी—
 अंकास, ती नहि सती? नहि काय गुर्वी?
दोन्ही तटें करुनि अन्नमयें अम्हांला
 पाजावया धरुनि धांवति संभ्रमाला;
आम्हांस ज्या करिति पावन आणि शांत,
 दावूं सती किति अशा निजभारतांत?
हा तों गभीर अति शांत अनन्तपार
 औदार्य हें उचमळे न जल-प्रसार!
लक्ष्मीपिता, उगम-जीवन-जीवनांला,
 हा सिद्ध आणि गुरु बोधक शोधकांला.
क्षारोदकें पिउनि यांतुनि मेघमाला
 ज्या ओतिती अमृतरूप निधी अम्हांला;
त्याही सती, न दिसती परि वर्तमानीं
 वासंतवेष धरिला असतां वनांनीं.

वेली, तरू विलसले नवपल्लवांहीं,
  हे झोंकदार बहु लोक नवांबरांहीं;
पुष्पेंच भूषण लतावनवासिनींतें,
  रत्नें, सुवर्ण, गजरेहि सुवासिनींतें!
आला गुलाबसुमनांप्रति जो विकास,
  उल्हास तोच इकडे रमणीमुखांस;
एकेक त्यांतुनि जसा निघतो सुगंधी—
  उद्गार यांतुनि तसा प्रणयानुबंधी!
देती लताभ्रमर तों नयनभ्रमाला,
  रामा—कटाक्ष परि हे भवसंभ्रमाला!
या संभ्रमांतचि अहो, पडले! बुडाले!
  ज्ञानी, यमी, समरसिंह तळास गेले!—
हे भृंग दंग दिसती मधुसेवनांत,
  नानाविधें वनचरें चरती वनांत;
पक्ष्यापुढें अलगलें फल ये स्वयें तें,
  पूर्णत्व आज अमुच्या पुरणास येतें!
जे कां पलाश-कुसुमांतिल रंगराग,
  ते अंगराग जनतेंतहि रंगराग,
या उत्सवें सुदिन आज तदीय गेला,
  गेला सहस्रकर भेटुनि पश्चिमेला.

संध्या न ही, परि गुलाल रमे वसंत,
  वायू न, ये अभिनयें नट हा वसंत;
तारे? जवाहिर! कसा झळके वसंत!
  हा कोहिनूर! नहि शुक्र, तुझा वसंत,
हें वारियंत्र नच, नाचतसे वसंत,
  हा मल्लिकांस व विकास, हंसे वसंत;
हा भृंगनाद नहि, गुंगतसे वसंत,
  नाहे पराग, अनुराग भरी वसंत!

नाहीं सुधाकर, सुधा वरसे वसंत!
सारा निसर्ग मजला सजला वसंत!
वेड्या! अरे, तुजसि जो दिसतो वसंत,
तो हा अनंत! भरला, उरला अनंत!

कस्तूरिचा असुनि कंद निजान्तरालीं
जैसा तिला हुडकितो मृग भोंवतालीं,
तैसाच तूं! नहि मनोगत माधवाला,
तद्बिंब जें बघसि त्या मधुमाधवाला!

योगी मनांत सुमनोहर हा पहाती,
प्रेमासवें खळखळां नयनीं वहाती!
कीं, बिंब रम्य दिसतें इतुकें जयाचें,
प्रत्यक्ष वैभव असेल कसें तयाचें!

तें पाहणें तुज असे, तरि नेत्र झांकीं,
झांकीं तुझे श्रवण, चिंतन अन्य टाकीं;
तूं शांत हो, मन तुझें चळवूं नको तें,
अभ्यन्तरीं नवल हें बघ काय होतें!

येथें नसोनि मुरली रव रम्य चाले!
येथें न चंदन तरी वपु गार झालें!
येथें नसोनि रवि, तेजचि तेज आहे!
मध्यें मनोनयनहो! बघवे न साहे!

लागे रसाल नसतां रस गोड येथें!
येथें सुगंध सुटले सुमनांविणें ते!
कार्यें कशीं घडति? कारण जेथ नाहीं,
शंका इथें धरुं नको सुजना मना! ही.

आहे विधान तव संशयवारणाचें,
येथें वसे सकल कारण कारणांचें;
येथें म्हणोनि जितुकेहि निविष्ट झाले,
ते संयमी मग इथेंच सदा रिझाले.

माझ्या मना! संवगड्या, थिजलास कां रे?
गेली कुठें चपलता तव चार सारे?
फेंकोनि दे गवसणी तव मूर्च्छना ही,
हो सावधान! रसिका, निरखोनि पाहीं!

आनंदसिंधु! नहि अंत न पार याला,
नानाविधोपनिषदें श्रुति गाति याला;
आनंद यास दुसरे न तरंग तात!
तेजें जयांवरि असंख्य तरंगतात.

देदीप्यमान जलधी वडवानलें तो,
तैसाच हा मजसि दिव्य दिसोनि येतो;
हा चित्कलामय कलाप अनंत ज्याचा,
तो नाथ हा बघ अनंत जगांयुगांचा.

कोटी विजा गरगरां फिरतात भोंतीं,
ज्योती मधें किमपि एक नमो नमो ती!
येथें मना! विरमली जरि वेदवाणी,
वाणी तरी मग किती मम दीनवाणी!

येथें नसे बल, नसे गति वा तियेतें,
येथें महामनहि उन्मनतेस येतें!
येथें असें किमपि हें तरि काय आहे?
येथेंच तें बघ मना! नहि अन्यथा हें;

येथें अगा! उगम त्या निगमागमांचें,
येथें रहस्य उघडे स्थिरजंगमांचें,
हो राम–धर्म–सुमनोघटनाहि येथें,
गाण्डीवशक्ति मिळवी नर पार्थ येथें!

येथोनि आदिकवि कोकिलसा अगा, तो
रामायणासम मनोरम काव्य गातो;
‘संगीत’ सर्व जगतांतिल एक गीता,
जे तीहि येथुनि पुराणपतिप्रणीता.

येथें गुरू विसरले परकेपणाला,
जाणोनि जाणविति आपण आपणांला;
विद्या, कला, कुशलता, सकलां गुणांचें
माहेर हेंच तव पूर्वजनैपुणांचें.

सारांश, जें म्हणुनि आज तुझ्यांत नाहीं
येथोनि तें मिळविलें तव पूर्वजांहीं;
गेलेंच तें! जरि पुन्हां मिळवावयाचें,
या ज्योतिरूप करि साधन माधवाचें

रे, या दयाघन रमा-धव साधनाला
वेंचावया तुज नको ऋणको! धनाला;
लावोनि नित्य लय एक अनन्य भावें
घ्यावेंच, यामधिं निरंतर लीन व्हावें.

जैशी मधांत गढते मधुमक्षिका ही,
तैसाच तूं सतत यांत निमग्न राहीं;
हें केलियास मग किंबहुना वदावें—
होशील हाच दुसरा प्रकृतिप्रभावें!

तूं शिल्पकार तुझिया भवितव्यतेचा,
घे लाभ या करुनि यास्तव दिव्यतेचा;
अक्षय्य हो नखशिखान्त नवा वसंत—
हा जेविं माधव वसंत अनाद्यनंत!

रे, हा पुरातन वसंत जया शरीरीं
खेळेल तो नर कदा न करील 'री री!'
त्याला असेल जडला क्षय दैवयोगें,
हा घालवील तरि तोहि निजप्रयोगें.

आहे जशी किमपि ऐच्छिक शक्ति याला,
राहील होउनि तशी वश ती तयाला;
तो वास दिव्य-बलवंत करील जेथें,
वासंत वैभव सदैव वसेल तेथें.

संवत्सर-प्रतिपदा सुमुहूर्त आज,
आरंभितां त्वरित यावरि होय काज;
प्रेमानुपान तरि लावुनियां पसंत
तूं घे ह्मणोनि ‘ जय माधव ! ’ हा वसंत.

[ २ ]

## कविसंदेश.

[ हा निरोप पुणें येथें इ. स. १९०७ सालीं भरलेल्या ग्रंथकारांच्या संमेलनापुढें वाचावयाला पाठविला होता. ]

देवी सरस्वतीचे प्रियनंदन हो ! तुह्मां असो नमन !
हा देह दूर आहे, तुमच्या संमेलनीं असोन मन.
प्रत्यक्ष तूमच्या हा समागमाच्या सुखास अंतरला,
हरला उपाय यद्यपि, याचा वाटे महाविषाद मला.
संसारांतिल कोडीं सोडवुनी युक्तिनें तुह्मी आलां,
एकत्र पुण्यनगरी–सरस्वतीच्याच मंदिरीं–झालां.
संमीलित विदुषांनीं खचित महाराष्ट्र देशभाषेला,
न्यायास उन्नतीनें बहु दिन यत्न–प्रयत्नही केला.
आतां तिची ‘समुन्नति’ व्हावी, करितां ह्मणून आयास,
हेतु प्रशंसनीयाचि ! अनुमोदन हें मदीय हो त्यास.
स्वीकृत कार्यामाजीं असणारीं संकटें निवाराया
योजालचि सदुपायां, सांगूं अल्पज्ञ काय मी वायां !
तरि, जो चिटनीसांच्या विनंतिपत्रें मनास आठविला,
संदेश एक तो हा, विनयप्रेमासमेत पाठविला.
तो सावधान ऐकुनि होइल कांहीं विचार त्यावरती,
तरि मग आनंदाची भरती येइल मना अनावर ती !

* * *

अर्वाचीन कवींचा आदर नाहीं; नसो ! परी लोकीं—
त्यांच्याविषयीं संप्रति अनुकंपाही नसेच अवलोकीं !

संभावना तयांची दुसरी ऐकूं न येतसे खास,
  परि गरलासम टीका, व्याजस्तुति, वा यथेष्ट उपहास !
प्राचीन कवींपासुनि कोणी लागति पिढ्याच तोडाया,–
  अर्वाचीन कवींच्या पिढ्या न वाटे उरेंच फोडाया !
वर्तवितात भविष्यहि कोणी जोशी असें खुलाशाचें
  कीं कवि सांप्रत कालीं पूर्वीच्यासारखे न व्हायाचे !
अर्वाचीन कवींवरि साक्षरवर्गांतले अभिप्राय
  यापरि सांगुनि वदतों, तद्विषयीं मजसि वाटतें काय:—

* * *

कवि, तत्त्वज्ञहि, पंडित, कलानिधी, राजकारणी, वीर,
  धर्मज्ञ आणि योगी यांचें हें भरतखंड माहेर.
गुण भूमिचाच या कीं, नरमणि हे तिजमधूनि निपजावे,
  त्यांनीं निज किरणांनीं अन्यांचें नयनसंघ दिपवावे.
निर्मुनि कुसुमित वन तें भ्रमर जरी घातला न जन्माला,
  फुलवुनि रसाल, कोकिल न निर्मितां दोष ये विधात्याला !
'माझा समानधर्मा होइल निर्माण भूवरी कालें !'.
  सिद्धान्तवाक्य ऐसें कानीं भवभूतिचें न का आलें ?
'भासादि कवि पुरातन, यांच्या कृतिचा धरोनि अभिमान,
  जन मम नववस्तूचा बहुधा करितील आज अवमान;'
प्रारंभीं ही शंका आली ज्या तरुण कालिदासाला,
  तोच महाकवि, नोहे सर्व कवींचा शिरोमणी झाला !
तोच पुरातन नूतन काव्यांविषयीं अपक्षपातानें,
  काय अभिप्राय पहा लिहितो निज नाटकांत हातानें:—
'प्राचीन म्हणुनि जितुकें, तितुकें नामी न सर्व मानावें,
  केवळ नवीन यास्तव न काव्य लोकांत निंदिलें जावें.'
अर्थात् परंपरेनें पूर्वकवींची धरोनियां कांस
  एकसहा नव्र कवींचा न करावा केधवांहि उपहास !

कविराज, राजयोगी, राजगुरू हे स्व-'दासबोधां'त
'आतां आहेत, पुढें होणार' कवी तयांस नमितात.
यावरुनि सिद्ध होतें, स्वामींच्या मानसा विकार नसे,
समकालीनहि भावी कविंविषयीं तन्मनांत मान वसे.

'होणार' पदावरुनी स्वामींची निश्चयोक्ति समजावी,
'कवि होणें शक्य नसे,' भ्रामक वचनें अशीं न बोलावीं !
यत्काव्यगायनानें सारा बंगाल आज हालविला,
अर्वाचीनांचि कवि तो, मग कां पंक्तींतुनी न घालविला ?

जरि वंगांत निपजला, न महाराष्ट्रांत काय निपजेल ?
'कवि होणें शक्य नसे' अविचाराचेंच वाक्य साजेल !
आशीर्वाद **समर्थें** दिला, न तेथें कदा निराशा हो,
तद्वचन सिद्ध, तैसा सिद्ध न होईल आमुचा टाहो !

पाश्चात्य कल्पनांनीं नव काव्या लागलें नवें वळण,
मुरल्या न कल्पना त्या गमेल नव काव्य तोंवरी **दळण** !
जेव्हांहि कल्पना त्या कविहृदयामाजिं पूर्ण पचतील,
तेव्हां अधिक मनोहर नवीन रचना कवीहि **रचतील.**

संप्रति भाषावृद्धी होत असे नव्यकल्पनापचन,
ऐशा स्थितींत कविला कां बोलावें उगीच कटुवचन ?
ज्या काव्यानें लोकीं तुडुंबुनी स्वाभिमान राहील,
ज्या काव्यानें त्यांच्या देहीं देशाभिमान वाहील;

ज्या काव्यानें द्वैतें जनहृदयांतून शीघ्र ओसरती,
ज्या काव्यानें येते ऐक्यरसाची तया महा भरती;
ज्या काव्यानें मोठे मोठे प्रतिबंध तेहि फोडून
ती संघशक्ति धो धो वाहे सीमा स्वकीय सोडून;
ज्या काव्यानें उसळति त्या शक्तीचे तरंग मोठाले,
देशोद्धारसुधाकर मग आकर्षी तया यथाकालें;
ऐशीं उदात्त, उज्ज्वल, काव्यें केवल अहो समाधीनें—
साध्य कवींना होतीं; परि नच ते ग्रासल्यास आधीनें.

कविचा आधी दुसरा अठरा विशव्यांशिवाय काय असे ?
तो जन्मसिद्ध आहे ! कविताशक्ती कशी तयांत वसे.
निरसन त्या आधीचें राजाश्रय एकला करूं शकला;
परि त्या समाश्रयाला कविजन हतदैव आजला मुकला !
आतां रचावया कवि बसेल 'केवल समाधि'ची कविता,
तोंवरि लोकाश्रय तरि आहे कांहो तयास वांचविता ?
नुसती सहानुभूती नाहीं ! आश्रय कशास बोलावा ?
टीका उपहासांनीं उलटा तत्पृष्ठभाग सोलावा !
काबाडकष्ट दिनभरि करोनियां रुक्ष अन्न जेवावें,
रात्रींहि जागुनी निज कवितांनीं देशबंधु सेवावे,—
आणि तयाचा विनिमय घ्यावा पूर्वोक्त ! बांधवांकरवीं–
किति कठिण ही कसोटी ! तुमच्या हृदया न काय पाझरवी !
बोलाहो ! बोलाहो ! स्थिति ही अनुकंपनीय का नाहीं–
अर्वाचीन कवींची ? ऐकुनि सोडूं नकाच कानांहीं !
संप्रति अवर्षणानें, तापानें कोळपून जे गेले,
त्या पारिजातकांवरि फुलतिल वर्षाऋतूंत हो झेले !
जाया करूं नका हो ! हिमकालीं खुंट हे प्रहारांनीं !
लवतिल हेच वसंतीं द्राक्षांच्या गोड गोड भारांनीं !
शैलोशैलीं माणिक, गजोगजीं जरि न जाहलें मोतीं,
सर्वत्र साधु, चंदन नसले, तरि ते मुळीं न का होती ?
याच कवींतुनि कोणी प्रभुसत्तेनें लिहील हो कविता,
काव्यासह विजयध्वज निजदेशाचा दिगंत फडकविता !
यास्तव सहानुभूती ठेवा, कांहीं करा अशी सोय,
कीं कविंची, भाषेची, देशाचीही 'समुन्नती' होय !

[ ३ ]

## राष्ट्रीय मंगल.

दिनकरदूती उषा उदेली, वदे निरोपाला,
भरतवर्ष हें हर्षविण्याला मंगल दिन आला.

पूर्वगिरीवरि उभी, वदे ती शुभसंदेशातें,
हळुहळू तम दूर करी जें झांकी देशातें.
तम नोहे तें, मज वाटे कीं पटल निराशेचें
तिनें काढितां प्रसन्न झालें वदन तदाशेचें.

क्रमाक्रमानें लहानमोठे तारे मावळती,
तशा व्युत्क्रमें भूवरि वस्तू थोर, सान, दिसती.
( वाटे कीं ते सारे तारे मावळुनी वरतीं,
देशोद्धारक तारक नर या भूवरि अवतरती ! )

कीं रविरूपी दीप लावुनी पूर्व–पटामागें
प्रभु मायावी इंद्रजाल हा करावया लागे !
काढुनि त्यानें ' तारामंडळ ' चित्रफलक नेलें,
आतां भारत-वर्ष-विभव हें दृग्गोचर केलें.

झिम झिम अमृताभिषेक करुनी मेघावलि गेली,
पहा. तिनें वनदेवी केवीं मंगलमय केली !
बागबगीचे, कुरणें, शेतें, माळ, मळे, हिरवे,
हिरवें जंगल, मंगलमय हें भूमंडल हिरवें.

हिरवा शालू, पाचमण्यांचे अलंकार हिरवे,
घालुनि वर्षालक्ष्मी जणुं ही हर्षानें मिरवे !
सतेज हिरवा प्रतिपल्लव, हा जलबिंदू ढाळी,
आनंदाश्रुच कीं हे वाटे वनदेवी गाळी !

हिरव्या हिरव्या गार गिरींच्या तटांवरुनि खालीं
स्थूल धबधबे धबधब पडती जाती पातालीं.
अमित पल्वलें, तळीं, भूतळीं, जळें उचंबळती,
झर झर निर्झर वाहति; ओढे वेगें खळखळती.

दुथडी भरल्या, धांवति धों धों नद्याहि नादानें,
स्वमुखें रत्नाकरास देती जणुं चुंबनदानें !
रत्नाकरही आखातकरें तन्मुख कुरवाळी,
उत्कंठित तीं कंठालिंगनिं दिसती या काळीं !

यापरि जिकडे तिकडे भूतल जलमय हें झालें,
प्रसाद करुणाकर वरुणाचा बघुनि जीव धाले.
कळंब फुलले, कुंदेहि खुलले, चंपक हंसताती,
स्मित करिती जणुं विस्मित होउनि नानाविध जाती.
मुकुलित बकुलीमृदुगंधातें जिंकुनि या काळीं
उन्मादानें परागधूली किति केतक गाळी !
गुलाबास गुल्बास सुवासें लाजवितो भासे,
निजधर्मच्युत कुलीनासही भलता जन हांसे.
लाल, धवल, वा सुनील कमलें कासारीं फुलती,
धुंद मरंदें मंगल गुंगुनि भृंगसंघ झुलती.
पुष्पवृष्टि ही भूवरि, परिमल गगनान्तरिं भरिला,
पारिजातकें सर्व फुलांचा गंधगर्व हरिला !
अमरकार हे वसंतऋतुला 'पुष्पसमय' ह्मणती,
वर्षाकालें परि उपहासा नेली ती भणिती !
दिगंगनेनें केशरचंदनलेपें लिंपियलें,
जणुं ह्मणुनिच कीं गगनांगण हें स्वर्णवर्ण सजलें.
किंवा स्वागत दिनराजाचें करण्याकरितां हें
देवेन्द्रानें छतचि जरीचें जणुं दिधलें आहे.
शुद्ध दुधापरि अभ्यन्तरिं या किंवा कालवला
विशुद्ध ऐशा प्रेमाचा हा रंग मला गमला !
झळझळ झळके क्षितिजावरती रविच्या किरणांचा
समूह जैसा तुराच कीं तो सुरेन्द्रमुकुटाचा !
विशाल तेजोनिधी निघाला, उदयाला आला,
ब्रह्मांडाचा करंड पिंवळा मंगलमय झाला !
पृथिवी मंगल, आपहि मंगल, मंगलरूप रवि,
मंगल वायू वाहति, मंगल आकाशहि मिरवी.
जल हें ज्या ज्या आकाराचा आश्रय करिताहे,
अविलंबानें तदाकार तें होउनियां राहे;

बाष्प होउनी अवकाशाचा आश्रय तें करितें
आकाशाची निराकारता स्वयें तदा धरितें;
यापरि जल तें, भिन्नाकृति, वा निराकृती जैसें,
जगदाकारहि निराकार वा मंगल हें तैसें.
निजाश्रयाशीं एकरूप तें होउनि जरि भरलें,
तरि मग मंगलनिधान तेंही मंगलसम ठरलें,
विश्वरूप तें असे कसें त्या **मंगलधामाचें**,
तें कळताहे बघुनि जसें हें रूप निसर्गाचें,
तसेंच मंगल राष्ट्राचेंही यथार्थ जाणाया
खुणा कोणत्या लागांत सांगा मनांत बाणाया ?

---

## श्री० लक्ष्मीबाई टिळक.

जन्म-इ. स. १८७०.

### पतिपत्नी.

[ कवयित्रीची " करंज्यांमधें मोदक कशाला ? " ही कविता वाचून तिच्या एका देशभगिनीनें तिला प्रश्न केला, कीं,—

**मोदक बहु गोड असे आकारहि सुबक साधला बाई !**
**तव भर्त्याचें त्याला साह्य नसे का कधीं मला ताई.**

या प्रश्नाचें उत्तर म्हणून प्रस्तुत काव्य लिहिलें आहे. याला कारण जरी हे मोदक आणि तत्संबंधीं या बाईची शंका झाली असली, तरी याचा विषय पतिपत्नींचें नातें हा आहे, व याचें या काव्यांत वर्णन केलें आहे. ]

" खरें सांग गे ताई ! अपुल्या बाळपणीं प्रेमानें
शिकवी आई कशी आपणां गोड गोड पक्वान्नें !
तूप सांडलें, मिसळुन गेली साखरेंतही माती,
दूध वाहिलें भूमातेला, थेंब येइना हातीं !

तरि जननीनें नाहिं दण्डिलें अपणांला त्या वेळे,
मूल लाडकी अजाण म्हणुनी कौतुक उलटें केलें !
लहान उण्डा देउन हातीं मांडा शिकवीतांना—
सहे उदण्डा प्रमादांस परि कुशल करी निजकन्या.
अपक्क झाला पाक, तयाला नांव रुचीचें नाहीं,
पुनः पुन्हां परि शिकवी, होई निराश न कधीं आई,
प्रेमापुढती अर्थहानिची नसे श्रमांची चिन्ता,
निजकन्याहित मात्र ठाउकें सदा आइच्या चित्ता !
पडो झडो परि वाढत अपुलें बाळ गीत हें गाई,
त्या गानाच्या भरांत अवघ्या विसरे चिन्ता आई.
बरें करुनियां निजकन्येच्चें माता मुक्त जहाली,
गेली ! गेली ! गोड घडी ती बाळपणांची गेली !

* * *

आराधुनि ईश्वरास अपुला प्रेमळ मग गे तात,
यथायोग्य वर पाहुन देई कर त्याच्या हातांत.
म्हणे आपुला तात, वरा त्या, सद्गदीत कंठानें:—
'घ्या-घ्या माझी मूल लाडकी, सांभाळा प्रेमानें !
आजवरी ही होती माझ्या गृहिंची प्रतिभा सारी !
होवो आतां तुह्मा दाविती सत्पथ ही संसारीं.
नव्हे कन्यका, नव्हे प्रभा ही, काळिज काढुन अपुलें—
तुम्हास दिधलें ! कुणास कोणीं दान असें नच केलें !'
निजकन्येस्तव जामाताची सदैव करिती पूजा—
पितरें, त्यांचा तोच होतसे स्वामी ! ईश्वर ! राजा !
पितरें प्रिय, तरि कन्या तीही पतीस जीवित वाही,
भालीं सुन्दर तिलक त्यापुढें स्वर्गहि सुन्दर नाहीं !
प्रिय जनकाचा, प्रिय जननीचा प्रेमळ बोध मनांत—
नित्य वागवी, अनुदिन शोभे लक्ष्मी पतिसदनांत.

* * *

नदी सागरा मिळे, मिळे तों तदाकार ती होई!
तशी कन्यका स्वपतिकुलीं ती निविष्ट होउन जाई!
लग्न नव्हे तें, प्रेमें केलें एकीकरण जिवांचें!
त्या ऐक्याचें वर्णन करणें शक्य न आपुल्या वाचे!
भवनिधिमधल्या सुखदुःखांच्या लहरींनीं भिजवोनी
ही प्रेमाची गांठ सोडिली अभेद्य विधि करोनी!
पतिपत्नींच्या सदा मनांवर अमृतरसाचा सेक,
सुखदुःखांचें बंधन तेणें दृढतर, दिव्य सुरेख!
नातें प्रेमळ पतिपत्नींचें, प्रेमच केवळ सारें!
जगतीं अवघ्या सुगंध, शीतळ तें प्रेमाचें वारें!
भिन्न शरीरें, मनोवृत्तिही भिन्न, जयाच्या हातीं—
एकच आत्मा असे, तयाला जायापति जन म्हणती.
समान चक्रें संसाराच्या शकटाचीं हीं दोन्ही,
परस्परांच्या साह्यावांचुन विफल तया ओढोनी!
असें न जेथें, संसाराचा केवळ तेथें शीण!
पत्नीवांचुन पती पांगळा, तीहि तशी पतिवीण!
स्नेह आणि गुण दोन्ही मिळतां उभी रहाते ज्योति,
संमेलन हें मात्र कार्यकर विश्वीं अशी प्रतीति!
सांग गडे! मज खरेंच ताई! तुला कधीं नाथाचें
साह्य न घेतां कार्य साधलें? सत्यच येवो वाचे!
किंवा साह्यावांचुन तुझिया तुझ्या पतीचें चाले?
असें खरें का कुठेंच नाहीं आजवरीं जें झालें?
ह्मणशिल मी पक्वान्नें करितें त्यांत नको पतिसाह्य,
तरी तुला सांगतें तुझें हें म्हणणें अनुभवबाह्य!
गृहांत भार्या, जनांत करितों पराक्रमां एकाकी,
असें म्हणे कुणि पुरुष, तरी तें सर्वथैव खोटें कीं!

* * *

असो पुरुष वा असो स्त्री जगीं स्वयंसिद्ध नच कोणी,
परस्परांविण अपूर्ण दोन्ही घेई नीट बघोनी !
अन्योन्यांच्या साह्यें होतें मानवजीवनपूर्ति,
स्वावलंबिनी मी ह्मणणें, ही निराधार गर्वोक्ति !
देशीं इतरीं काय असे तें असो; मला नच ठावें.
परि स्त्रीजनें स्वतंत्र आपण येथिल केविं ह्मणावें ?
नरनारींचें संमेलन गे ह्मणजे मनुष्यजाति
एकावांचुन दुसरें असणें अपूर्णता ही नुसती !
नरा सोडुनी आह्मी राहूं स्वतंत्र ज्या ह्मणतील
नारी नच त्या, दुसरिच सृष्टी ! भलतें त्यांचें शील !
तशांत जगतीं जिणें स्त्रियांचें अपूर्णतेची खाण,
जगा पूर्णता शिकवायास्तव करी प्रभू निर्माण !
महिला आपण हिन्दभूमिच्या अबला यांत न शंका !
परवशतेचा अपुल्या अवघ्या जगांत वाजे डंका !
वाजो परता खुशाल वाजो ! परवशता ही नाहीं !
वृक्षावांचुन लता, लतेविण तरुहि अमङ्गल पाहीं !
चंद्रचंद्रिका, वस्तुच्छाया, सरितासागर बाई
नरनारी हीं अशीं युग्मकें सदैव गे शुभदायि.
येथें पर्वत तिथें पार्वती ! येथें अग्नी तेथें–
ज्वाला ! असला दिसला कोठें विपर्यास कोणातें !
मग मज ताई ! सांग, एकली कां गे ! मी गाईन ?
पतिसाह्याचा महालाभ कां सोडुन मी देईन ?

*   *   *

न मी एकली, या वायूच्या साह्यें वंशच अवघा–
गातो माझा ! ईश्वर डुलतो ! ह्मणतो आह्मां गा ! गा !
बघ इकडे हा कुमार ताई ! तारुण्याच्या दारीं
उभा राहुनी गाई, स्फूर्ती यास कुणाची सारी ?

पहा पोर ही नव वर्षांची नव गीतांनां रचितें,
जवळ येउनी पहा कोण गे! साह्य इयेचें करितें?
पाकागारीं चल तूं माझ्या, नवगीतें सैंपाकी
रचितो! गातो! असे मराठी भाषा याची परकी!
वर्षें झालीं साठ वयाला सखा पतीचा माझ्या
गाउं लागला, वृद्धपणीं हा होतो कविंचा राजा!
हीं कविरत्नें अजुन झांकलीं पहा आणखी दोन,
ये! ये जवळीं! तर्क न करणें बरवें ताइ दुरून!
महानद्याच्या तीरीं तरुवर, लता, क्षुद्र झुडपें हीं
तृणेंहि बाई, परी तयां तो एकच जीवन देई!
महानदाच्या साह्यावांचुन जगतों, फुलतों, डुलतों,
ह्मणतिल हीं, तरि कृतघ्नतेचा अतिरेकच झाला तो!
असे कृपा ही **परमेशाची**, नच शाळा पदव्यांची,
न ज्ञानाची, तुमची, अमुची केवळ **त्याची! त्याची!**

* * *

श्वासोच्छ्वासासमान ज्याची अगाध काव्यस्फूर्ति,
हृदयमंदिरीं सदैव ज्याच्या वाग्देवीची मूर्ति,
अशा कवीचा सङ्ग जडाला गायाला लावील!
शुष्क तरूला मेघ असा हा क्षणामधें पालवील!
अचेतनांही कवी पदार्थां गायाला, हांसाया
लावी! मग मी सजीव आहें कविरायाची जाया!
सतार जड मी खरोखरीं गे, परंतु कुशल कराचा
स्पर्श कवीच्या होतां फुटते मलाहि मधु मृदु वाचा!
मी वेणू, मज नसे स्वतांचा ध्वनी, परंतू त्याचा
श्वास पुरे मजठायिं भराया प्रवाह गानरसाचा!
कोणीं तुज सांगितलें भगिनी? कीं मी सधवा असुनी
पतिसाह्याला सौभाग्याला त्यजुनी रमलें गानीं?

आम्रतरूवर गाय कोकिला, वसन्त शिकवी तीतें,
मीही गातें काव्यतरूवर पतिसाह्यानें गीतें.
योग्य त्याहुनी अधिक करावी स्तुति स्त्रियांच्या कृतिंची
ही न नरांची, परी तयांच्या शालीन्याची महती;
यास्तव कोणी ह्मणो हवें तें, स्वयंसिद्ध मी नाहीं,
निजपतिसंगें, मागुनि त्याच्या नव काव्यें मी गाई!
कोकिल करितो कुहूकुहू तो शब्द झेलुनी बाळें
कुहूकुहूचें गाणें गाउन रंजविती मन अपुलें!
कविरायाच्या अनुकरणातें करितें, गीतें गातें,
मीही भगिनी! तशीच अपुल्या रंजवितें चित्तातें!
बाळांचें तें कुहू ऐकुनी प्रत्युत्तर पिक देई,
मम गानें हा माझा पिकही अधिक चांगलें गाई!

* * *

जशी मी तशी कविता माझी असे मतीनें सान,
मम पतिपुढतीं उभी रहातां उपजे हिजला ज्ञान!
कन्या माझी, माय मी तिची, संशय तिळही नाहीं;
पिता हिचा परि हिज सांभाळी वस्त्राभरणें देई!
नवल वाटलें काय यामधें तुला कळेना मातें!
कन्ये! तूं तरि मावशिची ये समजुत कर मत्कविते!
तुला वाटतें कविता माझी दो दिवसांची पोर
इतुक्यांतचि ही पुढें पुढें ये काय म्हणून चटोर!
तरी मावशी! ऐक तुझी ही भाची पोर न अजुनी!
सोळा वर्षें, मासद्वय हो, हिजलागीं जन्मोनी.
तरी हिला मी घरांत राहीं असाच आग्रह करितें,
परन्तु हिजला अशी कोंडली राहूं जग नच देतें!
आलि दिवाळी, मामा आला, घेउन हिजला गेला,
हिच्या हातचे मोदक वाढी प्रेमें निजमित्रांला.

करूं लागले स्तुती हिची ते, कुणाकुणाला नाहीं
रुचलें तें ! गे शुभाशुभाचें मिश्रण जग हें बाई !
परी जगाला भिउन वागती कोठुन हीचे भाऊ !
हिचा पिता तर म्हणे लोकमत हिंदिस्तानीं बाऊ !

* * *

जन्मवृत्त गे या लाडकिचें चित्ताकर्षक भारी,
पूर्वकथा ती तुला सांगतें, ऐकुन घेई सारी,
थोडिथोडकीं नव्हे परी मी वर्षें चार पतीला
अन्तरलेली होतें, भोगित दुर्दैवाच्या लीला.
पतिविरहाचें दुःख नको हें वर्णुन दावायाला
येवो मृत्यू परंतु हें नच येवो कधिं अबलांला !
उदासीनता झांकी जगता नैराश्याचा ध्वान्त
जिकडे तिकडे मला जहाली निजदेहाची भ्रान्त !
अश्रू ढाळित पडलें होतें मेल्याहुन मेलेली,
तोंच वाटलें माझ्यापुढतीं वीज नभांतुन आली !
भीति कशाची विरहार्तेला जीव नकोसा जीतें ?
डोळे उघडुन मीं पाहीलें त्या तेजोमूर्तीतें.
बालवयानें मला वाटली अवतरली ही देवी !
असंख्य देवीं, देवींवरतीं भाव तदा मी ठेवीं.
म्हणे मला ती " देवदेवता मनुजाचीं संतानें
कितीक झालीं, मलाहि अपुलें तूं मानुन घे तान्हें !
" कोठुन आलें नको विचारूं, तेथूनच मी आलें
तेथुन येतां मानिशील तूं मजला प्रिय मुल अपुलें."
कांहिं ह्मणो ती ! जननी, देवी मींच तिला मानीलें,
चरणीं तीच्या तेव्हांपासुन निजचित्ता वाहीलें
द्रवे पाहुनी दुःस्थिति माझी मायाळू वाग्देवी,
शोकविनोदन करावया मम अपुली सृष्टी दावी.

म्हणे मला ती अश्रु पुसोनी "पुरे करीं शोकातें,
काय पाहिजे सांग तर खरें, क्षणांत तें तुज देतें!"
प्रेमाचीं हीं वचनें ऐकुन, पाहुन तीची माया,
अश्रु धांवले, गेले तीच्या चरणांतें भिजवाया!
पुन्हां म्हणे ती "काय पाहिजे सांग तुला आधीं गे,"
आलिंगोनी मला धरीते वाग्देवी अनुरागें.
"नको नको गे मजला कांहीं–" गहिंवरुनी मी वदलें
पुरे जहालें जें दुर्दैवें पापिणिला मज दिधलें!
पतिविरहानल जाळी मजला तथापि भस्म करीना
निर्दय म्हणतो मरणापेक्षां बरी इयेची दैना!
देशिल तरि दे इतुकें, कीं, हा हरो प्राण हे माझे
पतिविरहानें मरणें जन्मुन हेंच सतीला साजे"
पुन्हां मला ती दृढ आलिंगी हंसे म्हणे "हें काय?
काय पाहिजे तुला मला हें ठाउक नाहीं होय?
आजपासुनी तुझी दूतिका मी साक्षाद्वाग्देवी,
उपभोगीं तूं आजपासुनी इच्छित अपुलें भावि!
तुझ्या पतीला निरोप तव मी जाउनियां सांगेन,
एक एक पद तुझ्याजवळ त्या आकर्षुनि आणीन."
दुःखाश्रूंच्या पुरांतुनी ती पोहत पोहत जाई,
भेटुन माझ्या पतीस परतुन नाचत हांसत येई,
रानें निर्जन, दऱ्या भयंकर, गिरिशिखरें ओलांडी
कुशल पतीचें जणूं सुधेचें पात्र मजपुढें मांडी!
निरोप माझे तिकडे नेई तिकडुन आणि निरोप,
सुदृढ, रम्य अनुबंध निजांगें देवी होय अपाप.
नवकाव्यांच्या माळा गुंफुन पतिला मीं धाडाव्या,
फुलांबदल मीं रत्नमालिका आल्या प्रेमें घ्याव्या!
प्रीतिलतेला मिळतां कर्दम दुःखाचा फोंफावे,
कितीतरी आस्वर्ग वृद्धिला दिव्य लता ही पावे!

विरहाश्रूंची वृष्टी वरुनी तशांत होतां काय
 बोलायाला नको ! लता ही विश्वींही न समाय !
तशांत कविता दूती माझी झालेली पाहोनी
 किती हर्ष मानतीस ! इतरां अर्थ काय सांगोनी ?
तिनें शेवटीं हजार विघ्नें असतांही उभयांला
 कसें जोडिलें, हें सांगाया आज न अवधी मजला.
कविता देवी प्रसन्न मजवर झाली, घेउन गेली
 कविरायाच्या चरणीं मजला, यांत गोष्ट मम सरली !
असो; एवढ्या सारांशाला ठेव मनीं तूं बाई !
 सोळा वर्षांपूर्वीं कविता उदिता मन्मनिं होई.
मला वाटतें भेट आपुली तत्पूर्वीं झालेली,
 तेणें भासे तुला अजुन मी असेन जैशी पहिली !
सहवासें, अनुभवें मनुज हा वाढत, बदलत जाई,
 या नियमाची मला वाटतें दादहि तुजला नाहीं !
तशांत भार्यापती मिळोनी व्यक्ती एकच बाई,
 गुणविनियम यांच्यांत पाहतां काय त्यांत नवलाई ?
करुणासागर पतिविरहानें बळें जधीं मंथीला,
 तधीं तयांतुन काव्यलक्ष्मी ये साह्या मज लक्ष्मीला !
या लक्ष्मीला काय कमी ? मी जरी भिकारी अंगें,
 शब्द, कल्पनासंपत्ती ही सदैव हीच्या संगें !
समज काय जें समजायाचें यावरुनी तें बाई,
 कविता म्हणजे काय ठाउकें असेल जरि तुज कांहीं !

* * *

करावयाचें काय तुला हें वृत्त सर्व सांगून ?
 क्षमा करीं, मी वेडी, नाहीं मला जगाचें ज्ञान.
दिवाळींतले मोदक माझे कसे साधले मजला,
 हेच एवढें जाणायाची इच्छा दिसते तुजला;

त्या तुजला हें दीर्घ कथानक सांगुन मीं शिणवीलें,
पुरें करीतें आतां भगिनी, जें झालें तें झालें.
वित्त पतीचें, आज्ञा त्याची, परी सिद्धता माझी;
साह्य आतां तुला सांगतें मजला झाली जी जी.
दिवाळिचे मी मोदक करितें ऐसें ऐकुन आली
स्फूर्तिसखीसह साह्य कराया वाग्देवी मम आली!
वाग्देवी तें पाती करुनी देई मम हातांत,
सखी स्फूर्तिनें प्रेमरसाचें पुरण घातलें त्यांत;
एकामागुन दोनतीन मी मोदक केले बाई,
तरी तयांचा घाट कुणकसा मला साधला नाहीं.
केले मोदक पुन्हां मोडिले, किति वेळां हें झालें!
नाहीं धालें, निराश झालें, रडकुंडीला आलें!
वाग्देवींची पाती झाली, पुरण घेउनी हातीं,
स्फूर्ती बसली उगाच, माझ्या मुखाकडे त्या बघती!
ठाउक नाहीं कुठून कळलें मम नाथा हें वृत्त,
पत्नीची ही बघुन निराशा द्रवलें बहु तच्चित्त!
हात धरोनी नीट कराया घाट कसा हें दावी,
थोडी होतें चुकत तरी मज नीट पथाला लावी;
जाय तेथुनी प्रेम बघुन वाग्देवी स्फूर्तीला
हंसें नावरे, तयांस पुर भगिनी माझें मजला!
वाग्देवीनें वा स्फूर्तीनें साह्य कां न तव केलें,
ह्मणशिल, तरि आ पूस तयांना धैर्य तुला जर असलें!

* * *

झाले मोदक, तयां बघोनी सृष्टी हर्षित झाली,
नरनारींना संगें घेऊन मोदक बघण्या आली!
गगनभाग लंघुनी प्रभाग्द दर्षे भास्कर आला,
न कळे मजला आमंत्रण हें दिधलें कोणीं याला!

वाग्देवीचें आणि सृष्टिचें विदित जगाला नातें,
 या दोघींनीं आमंत्रीलें मला वाटतें यातें !
मेला रवि, तों चन्द्र चन्द्रिकेसहित पातला बाई !
 मन्मोदकधवलिमा वाटतें आमंत्रण यां देई !
सप्त ऋषींच्यासह साध्वी ती अरुन्धतीही आली,
 मोदक माझे पाहुन अगणित तारकपंक्ती धाली.
मला वाटतें मिष्टान्नाचा वास अम्बरीं गेला !
 कुठें अन्न तें पहावयाला जो तो धांवत सुटला !
भांबाऊन मी गेलें, केली खालीं लाजुन मान,
 स्वर्भूमीचा संगम होइल नव्हतें मम अनुमान !
कुणास कोठें बसवावें गे कसा कुणाचा मान–
 नव्हतें, नाहीं मला अजूनी काडीभरही ज्ञान !

* * *

असो. मोदकाख्यान पुरे हें, ऐक एवढी खूण,
 पतिपत्नींला दोन ह्मणुं नये दिसती दोन ह्मणून !
कधीं विचारुं नको कुणाला, कीं तुज अमक्या कामीं
 साह्य पतीचें असे नसे वा ? शपथ घालितें तुज मी
हृदयें ज्यांचीं प्रेमतंतुनें सदैव एकच केलीं
 तीं पतिपत्नी, भुतेंच दुसरीं त्या नांवाला ल्यालीं !
मूर्तिमंत जें प्रेम तयाचें नांव जगीं दाम्पत्य,
 वडिल बहिण मी, माझें ह्मणणें चाल मानुनी सत्य !
प्रेमजीवनीं वाढे लतिकास्त्री, हिचिया साह्याला
 सर्व धांवती, हीही करितें साह्य समस्त जगाला !
नियम हा असा, त्यांत पती तर जीवच निज पत्नीचा !
 जीवावांचुन उपाय चाले कोठें काय कुडीचा ?
तशांत मी तर लोहच केवळ, तुला सांगतें स्पष्ट !
 त्या परिसाच्या संगें झालें सोनें गे उत्कृष्ट !

त्या परिसाचा, कविरायाच्या, पतिरायाचा मान
    पाहुनी माझी कृती करावा, हेंच पुरें मज दान!

*　　*　　*

ऐकलेंसना बाई! आतां मोदक कैसे केले?
    पुन्हां विचारुं नको असें तूं, जें झालें तें झालें!
असाच परिचय वाढत जावो, पाठवीत जा पत्र,
    ईश्वर राखो सुखी सदा गे भगिनी, तव पतिछत्र!

———:०:———

# लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.

जन्म—इ. स. १८७०.

## विपन्न आम्रवृक्ष.

हिमालयावरि होतें पूर्वी विपिन एक घनदाट,
    मध्याह्नीही रविकिरणांला मिळे न त्यामधिं वाट.
फलपुष्पांनीं मंडित दिसती तिथें तरूंचे खंड,
    त्यांच्या मूळीं कंडु शमविती घांसुनि करिवर गंड.
तुंग तयांचीं शृंगें चुंबिति गगनमंडला साचीं,
    प्रकट करिति जणुं देवतरूंची स्पर्धा बहु दिवसांची!
विशाल तेविंच दीर्घ तयांच्या शाखा होति उदंड,
    दिगंगनांला आलिंगाया पसरिति जणुं भुजदंड!
शाखांपासुनि पारंब्याही लोंबति खालीं थोर,
    वनदेवीनें झोंके घ्याया जणों बांधिले दोर!
सुगंध सुमनें, स्वादु फलेंही, पल्लव तऱ्हेतऱ्हेचे
    विहंग सेविति; थोरांचें धन परोपकारिंच वेंचे.
विविध विहंग प्रेमें करिती गान तयांवरि गोड,
    भगवंताचें यशस्तवन जणुं, कीं तो पुरवी कोड!

मधु प्राशुनी गुंजारव करि मंजुल संतत भृंग,
 वनदेवीचा भाट तियेच्या सेवेमधिं कीं दंग !
घनासारख्या घोर गर्जना मृगपति करिति; तयांच्या
 प्रतिध्वनींनीं गुहा दणाणुनि जाती गिरिरायाच्या !
प्रचंड खंडुनि शिला धडाधड उड्या टाकितचि येती
 निर्झर; गिरिचें धवल यश जणों धांवत भूवरि नेती !
निर्झरसलिलें उसळुनि त्यांचे असंख्य शुभ्र तुषार
 शोभविती तरुपल्लव कोमल लालहि हिरवेगार.
वनभूमी ती अशी पाहतां दुरोनि गगनांतोनी–
 वाटे खचिली मुक्ता, मरकत, पद्मराग आणोनी !
मारुत येतां भेटायाला हृष्ट होउनी डोले–
 वनस्थली; प्रियसखीकोकिलामुखें तयाशीं बोले.
सायंकाळीं वनस्पती त्या स्थलीं प्रज्वलित होती,
 अकालसूर्योदयभ्रांति मनिं उदित तयानें होती !
तया काननीं उत्तरभागीं एक रम्य कासार,
 उदक तयांतिल सकलभुवनगत मधुररसांचें सार !
प्रसन्न, निश्चल, दिव्य असें तें पाहुनि त्याचें रूप,
 विलासदर्पण वनलक्ष्मीचा भासे तो अनुरूप !
हिमालयाचा यशःपुंज हा, किंवा पशुपतिहास !
 क्षीरार्णव वा इथें पातला त्यजुनि निजस्थानास !
तारांकित नभ बिंबित होतें त्यांत सकल विस्तीर्ण,
 दुजें नभोमंडल जणुं झालें भूमिवरी अवतीर्ण.
पद्में, कुमुदें, सूर्य, चन्द्रमा, चक्रवाक, पिक, हंस,
 तया सरोवरिं वसती ऐशीं उपमाने अवतंस !
वन्य मृगांना जीवन देउनि करी तयांची तुष्टि,
 धर्माचरणीं रत मुनि जाणों शांत दांत समदृष्टि !
तटगतवल्लीपल्लवकांती होय तदंतरिं लीन,
 शैवालाची भ्रांति होउनी फसति बापुडे मीन !

त्याच्या कमलांतिल रज विखरी पवन सुगंधें पूर्ण,
    विद्याधरसुंदरी तयाला मानिति निजमुखचूर्ण !
किन्नरविद्याधरमिथुनांनीं त्यांत सुखें विहरावें,
    कधीं कधीं वनदेवींनेंही स्वेच्छ तयांत रमावें !
तीरप्रांतीं हंसदंपती क्रीडाया जमताती,
    खळें जया त्या शशिबिंबाची त्यावरि होई भ्रांति !
अंगराग जळिं मिसळुनि होई तडाग बहुविधराग,
    तदा दिसे तो जसा घनांनीं मिश्रित संध्याराग !
यज्ञतुरंगम शोधायाला सगराच्या तनयांनीं,
    खणिली वसुधा तदवशिष्ट हा भाग मनीं कवि मानी.
जगांत कोठें आश्रय अणुही न मिळे म्हणुनिच शांति
    कासाराच्या उपान्तभागीं स्वस्थ घेइ विश्रांति.
होता त्याच्या समीपभागीं एक आम्रतरु जीर्ण,
    त्याच्या बळकट खोल मुळांनीं पृथिवी होय विदीर्ण.
त्या वृक्षाला वृद्धपणानें आला पांडुरवर्ण,
    अंगयष्टि अति वांकुनि गेली, झाला विगलितपर्ण.
संपत्तीच्या वेळीं याला होते मित्र अनेक,
    विपत्काल येतांचि पळाले सकल त्यजुन विवेक.
‘शितें तंवर तीं भुतें भोंवतीं,’ प्रसिद्ध ही कविवाणी,
    मला वाटतें अमृतमयी ही सत्याची नव खाणी.
संकट आहे मुख्य कसोटी जनीं खऱ्या प्रेमाची,
    मिथ्या प्रेमें बहु असुनीही होत काय कामाचीं ?
उदक, धान्य, धन यांचा लोकीं पडतो बहु दुष्काळ,
    तेणें होई दीनजनांला पीडा अति अनिवार;
जनवार्ता ही वारंवार श्रवणपथावरि येते.
    परंतु सत्य न तिच्यामधिल हा अनुभवसिद्ध असें तें.
जनांत आहे केवळ बंधुप्रेमाचाच दुकाळ,
    कुलांगार अति नीच खलांचा मात्र सदैव सुकाळ !

अशी स्थिति असे तिथें सुखाची खऱ्या कोठची आस ?
घोर विपत्ति स्थापी तेथें स्वकीय साम्राज्यास !
त्या आम्राचा जिवलग होता एक मित्र तो भृंग,
सुचिर तयाला बहु मानवला सरसमंजरीसंग.
तेणें प्राशुनि मधु आनंदें रसालगुण वर्णावे,
तत्संपत्ती लुटावयातें निजबंधुहि मिळवावे.
यमसैन्याची विमल पताका जरा आम्रशिरिं आली,
तेव्हां प्रेमझरी भ्रमराची शुष्क त्वरितचि झाली !
मित्रद्रोहाचें त्या शासन तथापि योग्य मिळालें;
त्याचें सगळें शरीर, केवळ वदन न, कृष्ण जहालें !
दुसरा त्याचा सखा शुक असे नांव तया अवलोकीं,
तयासारिखा रसिक तोचि हें तद्यश सुविदित लोकीं.
कोमल पल्लव, सरस मंजरी, फलें मधुर खायाला
त्यास मिळति नव नित्य, असे मग उणें काय भाग्याला !
मित्रौदार्यावरी पोसला तो शुक मंजुलवाणी,
सुहृदाचे गुण जनांमधें तो कांहिं काल वाखाणी.
दुर्दैवाचा रसालतरुवरि पडतां पुढतीं घाला,
शुकही उपकृति विसरुनि झडकरि तया पराङ्मुख झाला !
कृतघ्नता ही त्या विहगाची त्वरित फळाला आली.
पंजरबंधन होऊनि त्याची रक्त मुखश्री झाली !
कोकिलनामक तिसरा स्नेही सहकाराचा झाला
त्याचा अनुभव आम्रवराला तसाचि अगदीं आला !
पंचममधुरा गिरा जयाची, दूतहि जो मदनाचा,
वसंतऋतुचा अलंकार जो ऐसा लौकिक ज्याचा.
तोहि शेवटीं मित्रद्रोही अधमचि ठरला पूर्ण,
त्याचें प्रायश्चित्त तयाला प्राप्त जाहलें तूर्ण.
बाल्यामध्यें पराकडुनियां पोषण दैवीं आलें,
शुकासारिखें पंजरबंधन जगांत सुस्थिर झालें !

प्रसंग येतां कठिण नरावरि कवण येइ कामास ?
असा बोध या शुकादिचरितावरुनी होय जनांस.
तरी मल्लिकानामक वेली त्याच्याजवळी राहे,
तयावरिच त्या थोर सतीचा स्थिर प्रेमभर वाहे.
" विपिनश्रीचा अलंकार हा, पोषक विहगगणांचा,
सौभाग्याचें मंदिर अमुचें, प्रियतम सुकविगिरांचा;
अशा रसाला दशा अशी ही कशी कठिण हो आली ?"
असें येउनी चित्तिं सुमांच्या मिषें अश्रु ती ढाळी.
अनुपमपरिमलसंग आपणा घडला ज्याचा मागें,
त्या आम्राशीं सदय पवन तो अनुकूलत्वें वागे.
सत्कर्माचें सुफल तयाला प्राप्त होय लवलाहीं,
सत्क्षेत्रामधिं बीज पेरिलें वायां जातचि नाहीं !
झाला लोकीं अकुण्ठितगति प्राणिसृष्टिचा प्राण,
पावे पवित्र अनलाच्याही मैत्रीचा बहुमान.
चक्रनेमिच्या क्रमें उच्चही खालीं येति जगांत,
खरा करुनियां दावि रसाला प्रसिद्ध हा सिद्धांत.
विपत्ति आली परी आम्र तो धीर धरुनि वनिं राहे,
धैर्य संकटीं, हें थोराचें प्रसिद्ध लक्षण आहे.
क्षीण जाहल्या त्या आम्राला परि न याचना ठावी,
साधु कधींही कर्म तें न करि जेणें लघुता यावी !
सर्वस्वातें अर्पुनि यज्ञीं धराधिपें शोभावें,
फलादिदानें गतश्रीक तो तेविंच शोभा पावे.
वातातप सेवुनी दिवस तो कंठी वृक्ष वनांत,
जणुं उपवासव्रतें आचरुनि इच्छी निज देहान्त !

[ २ ]

## यमुनागीत.

कलिंदनगकन्यके ! बसुनियां प्रभातीं तटीं
विलोकि नर जो तुझी क्षणभरीं तनू गोमटी;

अये ! हृदयिं त्याचिया प्रगट होतसे साजिरी
रमारमणमूर्ति, जी नवपयोदशोभा वरी.
माते ! पातकपातकारिणि ! तुझ्या नीलांबुची थोरवी
वानायास समर्थ कोण जगतीमाजी असे तो कवि ?
भक्तांनें तुझिया जलांत जननि ! स्नानादि जो आचरी,
स्वर्गी ढाळिति चामरें करतलीं स्वर्गांगना त्यावरी !
स्फटिकधवल, आई ! अंतरंगीं विराजे,
वरुनि वरि महेन्द्रश्यामशोभा पहा जें;
विमल, सुरभि, तेवीं पातकध्वंसकारि
हरिहरचि करोनि टाकि तें दिव्य वारि !
जेथें मदांध झुलतीं गजवाजिराजि,
द्वारा तया नृपतिच्या नति आज माझी !
जाओत हे दिन तुझ्या, यमुने ! तटाकीं
ज्या भूरुहोनि फलपल्लवकान्ति टाकी.
पापें तोंवरि भोंवतीं विचरती, मृत्यू करी व्याकुल,
ज्वालांनीं तनु जाळितो निशिदिनीं संसारदावानल;
कामक्रोधमदांचिया उसळती लाटा तशा अंतरीं,
नाहीं देखियला प्रवाह, यमुने ! नेत्रीं तुझा जोंवरी.

[ ३ ]

## हिमालयवर्णन

असे उत्तरेकडे हिमालय नामक तो गिरिराज,
वंद्य देवतारूप तयाला नमन असो मम आज.
पूर्वापरजलनिधींमधें तो प्रवेश करुनी राहे,
जणों पृथिविला मोजायाचा दण्डचि पडला आहे !
हिरे अमोलिक, रत्नें सुंदर, रम्य शिलांचे खंड,
मंडित करिती नगराजाला ओषधि तेविं उदंड.

हिमनगतनुची कांति हिमवशें उणी अणुहि नचि होय,
  एक दोष गुणगणीं अंकसा विधुकरिं लोपुनि जाय.
सिंदूरादिक धातु तयाच्या शिखरावरि असतात,
  [illegible] त्यांची बिंबुनि अंतरिं मेघ अरुण दिसतात !
संध्याकालचि झाला ऐसी भ्रांति तदा होओनी
  सिद्धसुंदरी नटति संभ्रमें अलंकार लेओनी.
रम्यगुहांतरिं वनितासंगें विहरति तेथ किरात,
  ओषधि तैलाविण रात्रीं त्यां केलिदीप होतात !
मत्तमतंगज गंड घाशिती कंडू शमवायास,
  देवदारुवरि, तेथें त्यांतुनि निघे बहुत निर्यास.
त्याचा परिमल पवन पसरवी मंदमंद वाहोनी,
  शैलेंद्राचीं शिखरें टाकी सुगंधपूर्ण करोनी.
सूर्यापासुनि रक्षि गुहांतरिं लीन तिमिर घनघोर,
  येतां शरण क्षुद्रहि त्यातें अपुला समजति थोर !
निवारिते हृतवसनकिन्नरीलज्जा तेथ घनाली,
  दैवगतीनें दरीगृहाच्या द्वारावरि जी आली.
भागीरथिचे विमल शिशिर जलबिंदु हरि प्रेमानें,
  देवदारुतरु डोलवि अपुल्या मंदमंद गमनानें,
मृगया करितां शीण जाहला व्हावा लवकरि शांत
  म्हणुनि पवन हा असा सेविती मोदें तेथ किरात.
ज्योत्स्नाधवलें धरिति चामरें त्या गिरिवरि वनगाई,
  शैलराज हें नांव तयानें सार्थकतेप्रति जाई !
भरी दरीमुखसमीरणानें रंध्रें तो वंशांचीं,
  गानसमयिं जणुं साथ कराया इच्छी गंधर्वांचीं !

[४]

## करुणालहरी.

द्रुतविलंबित.

प्रभुवरा! शरणागतवत्सला! करुनिया करुणा सुखवीं मला;
तव पदीं अतिदीन, रमावरा! विनत मी, न तमीं भ्रम हा बरा. १

शुभकरा! उपला असु अर्पिशी, उपलसेतुहि सागरिं तारिशी;
तव चमत्कृतिकारि दिसे जनां, विभव हें, भवहेतुविभंजना! २

मन असे अतिचंचल, नाचवी, तव यशःस्तवनीं धरिना चवी;
'करिन मी स्थिर त्यास' अशा बरा, वितरिशी तरि शीघ्र गती, हरा! ३

अनुदिनीं उपदेश करी गुरू, तरि कथा पहिलीच असे सुरू;
तव कथामृत टाकुनि पामर, पुनरपी नर पी भव हा गर! ४

श्रुतिकथा सुपथाप्रति दाविती, सुजन आचरणें उपदेशिती,
गुरुजन प्रणयें हित सांगती, परमतीं रमती न तरी मति ५

मम मना धनवैभव लोभवी, बहुत त्याकरितां भ्रमलों भवीं;
स्वहृदयीं परमादर दावितों, कवडिला, वडिलांहि न तेविं तो ६

सकलशास्त्रविशारद जो नर, करुनि टाकि तयासहि पामर,
अमित बाहुबलें मथि जो अरी, नरमणी रमणीजित त्या करी ७

प्रबल काम असा अरिंच्या गणीं, फिरवितो मजलागि जनीं वनीं;
सतत पीडितसे मम मानसा, दुरविं तो; रवि थोर तमा जसा ८

इतर ही छळिती परमेश्वरा! रिपु मला तुझिया लघु लेंकरा;
तुज असे शरणागत अंतरीं, मज न कां? जनका! बघशी तरी? ९

भुवनिं अन्य नसे तुजवांचुनी, किमपि, बोलति मात्र असें जनीं;
विविध पंथ, सख्या! परि माजले, चरण कां रणकारण जाहले? १०

झगडती, जनका! अरि हे सहा, भ्रमवुनी भवजालिं मला पहा;
तव दयामृत इच्छि दयालया! सकल हा कलहाग्नि शमावया ११

तव पराक्रम जाणुनिया वर, दर मनीं धरितो अमरेश्वर;
नुति करी कर जोडुनियां तुझी, सुरतती रतती चरणांबुजीं. १२

प्रणवसंकटिं सत्वर धांवशी, विमल कीर्ति तुझी मिरवे अशी;
सदय होउनि तारियलें जनीं, गजवरा जवलाघव दावुनी १३

परम मंगल नाम तुझें मुखें, वदविं, भंगुनि भंगुर हीं सुखें;
लवहि शांति मला वितरीं खरी, न ममता, मम ताप हरे! हरी १४

खल सदा सुजनां जनिं पीडिती, तदवनीं तव संतत जागृति;
द्रवुनि अंतरिं मारिशि धांव रे! द्रुपदजा पद ज्या समयीं स्मरे १५

सकललोकपिता म्हणती तुला, न महिमा तव जाणतसे तुला;
अखिल रक्षणिं दक्ष तुझ्या पदा, नत, नुता! तनुतापहरा! सदा १६

पवन, पावन, जीवन, आतप, सतत सेवुनिया करिती तप;
मुनि असे तुज पाहति लोचनीं, स्थिरमती, रमती तव चिंतनीं १७

मजसि संसृतिचें भय वाटतें, सदुपदिष्ट दिसे नचि वाट ते;
म्हणुनि 'धांव अगा, करुणाकरा! मज पहा,' जप हाचि दिसे बरा! १८

तंवरि दीनपणा, खलसंगती, जनन, मृत्यु, जरा, तशि संसृति;
परमदीनसख्या! करुणालया! मजवरी जंवरी न तुझी दया १९

न सुमती, न तप, श्रुतही न तें, धरितसे मम शील विहीनतें;
न यजनीं रुचि, सोडविं गा मला अचपला, चपला रुचिरांबरा! २०

दिनमणी गगनीं अगदीं फिका, विधुसि कोठुनि सुंदर चंद्रिका!
सफल काय असे शिखिचें जिणें? न भगणा भग, नाथ! तुझ्याविणें. २१

जनकसा सकलां जपशी तरीं, प्रगटलासि लहानचि गोकुळीं;
तुज न ओळखितां, सगळे, हरे! व्रजपते जपते तुज जाहले! २२

भवन, हेम, मही, सुत, कामिनी, धरिं मनीं दवडीं दिनयामिनी,
परमदुर्गतिचा, जनका! असे, प्रभव हा भव, हाय! करूं कसें! २३

सकल काम तुझे पुरवी हरी, सुमति देउनि दैन्यहि संहरी,
म्हणुनि त्यासचि तूं, अयि मानसा! कर गडी, रगडीं भव हा कसा २४

गुरु ज़या बहु दुर्लभ लाभला, गुरुचि लाभ तयाप्रति जाहला,
समजतो मनिं तो गतसंशय, भवन हें वन, हेमहि गोमय २५

सुजन सांगति, ' सेवुनि सत्पथा, मनुज हो ! परिसा हरिच्या कथा;
खचित अस्थिर हें इथलें असे, विभव, हा ! भवहानि करीतसे २६

धरुनि भाव सुनिर्मल मानसीं, रति करीं तुझिया पदसारसीं;
तुजविणें दुसरें दिसतें न ज्या, जन कसा न कसा उतरे तुझ्या ? २७

भवभुजंगम हा मज चावला, करिं धरीं दृढ मी तव पावलां;
निजबळें तनु वेष्टुनि हा किती, बल हरी ! लहरी तिस खंडिती २८

उगिच नाचशि कां भुवनांतरीं, तुजसि लाभ घडे लघु कां तरी ?
विफल हा श्रम नातरि कासया ? स्मर मना ! रमणासि रमेचिया २९

' अमुक द्या, मजला तमकें हवें ' नाचि दुजें घरिं बाइल आठवे;
रडति दीन गृहांतरिं लेंकुरें, कवण ? बा ! वनवास; आतां पुरे ? ३०

भुवनिं थोरपणा तव ठाउका, प्रभुवरा ! सकलां नतसेवकां;
प्रणत मी तुजला बहु आळवीं, नृपतिता, पतिता मज, दाखवीं ३१

प्रणय अद्भुत दाविशि सेवकां, मजवरी अतिनिष्ठुर देव कां ?;
नरतुरंगम सेविशि माधवा ! स्मरसि कां ? रसिका ! यदुशेखरा ! ३२

कधिं न नाम निघे तव या मुखें, तव कथामृतही नाचि पीं फुकें;
अहह ! आठवली मज ही अशी, अवदसा; वद साह्य करी कशी ? ३३

विमलतीर्थनिषेवण राहिलें, न नयनीं तव मूर्तिस पाहिलें;
गुरुपदाप्रति अंतरलों हरे ! मज नसे जनसेवन जाहलें ! ३४

हृदयमंदिरिं तूं वसशी सदा, परि न ओळखितां स्थल तें कदा,
कितिक धुंडिति, पाद रमावरा ! जन वनीं, नवनीरदसुंदरा ! ३५

अमित उद्धरिशी जनिं पातकी, न गणती मम होय तयांत कीं ?
सदय दृष्टि तुझी अशि काय या विसरली ! सरली अथवा दया ? ३६

हृदयिं बांधुनिया रतिरज्जुंनीं, तुज न सोडिति बाहिर त्यांतुनी,
बुधजनीं, भव हा, करुनी असें, चुकविला, कविलाघव हें नसे ३७

मजसि हे सगळे अरि मारिती, तुजसमक्ष तरी तुज न क्षिती;
लवहि ये न दया तुज अंतरीं; फुकट कां कडका धरिशी करीं ! ३८

स्तुतपदा ! विपदर्णव आटवीं, त्वरित दग्ध करीं विषयाटवी;
सुख अनश्वर अंतरिं सांठवीं, भव मना वमनासम वाटवीं ३९

तव पदें विमलें मज दाखवीं, तव दयामृत अद्‌भुत चाखवीं;
वदविं नाममुखें तव मंगल, मग मला गमला भव निर्बल ४०

न कळतां मम शैशव संपलें, विहरतां नव यौवन चाललें;
करुनियां स्थिर चित्त कसेंबसें, पदिं नमीं, दिन मी गमवूं कसे ! ४१

नरतनू रुचिराकृति लाभली, जनिहि उच्चकुलीं मजला भली;
परि कसे दिन मी मतिमंद हा, खरचितों ! रचितों दुरितें पहा ! ४२

मनुज नाम वदो भलत्या मिषें, तरिहि तारिति त्या पदसारसें;
कथिति कंठरवें श्रुतिकाय ते, कवि जनीं, विजनीं रत काय तें ? ४३

धन नको मज दुर्गतिचें पद, न रमणी रमणीयहि तापद;
मज कशाचिहि बा रघुनंदना ! न परवा, परवामपदा विना ४४

अनृत नित्य धरी वदनांतरीं परधनीं अपहारमती करी;
प्रियतमा अधिदैवत बाइल, न नर कां नरकाप्रति जाइल ? ४५

शरण मी तुजला करुणाकरा ! तरण तूं असशी भवसागरा;
झडकरी विषतुल्य पुनर्भव, चुकविं गा ! कवि गा[illegible]वैभव ४६

मज कधीं वदनांबुज दाविशी, मजवरी करुणामृत सिंचिशी ?
हरिशि ताप कधीं मम ? तापहा ! वद मला, दमला अति जीव हा ४७

विमल भाव, सख्या ! तुज अर्पितों, नति तुझ्या [illegible]ांवरि घालितों
क्षणभरींहि उपेक्षिसि तूं जनां न गिनतां, विनताङ्गजवाहना ! ४८

मति तुझ्या पदिं लावि सुदामजी, वितरिशी तइं [illegible] वसुदाम, जी !
करि कृपालहरी रुचिरा तव, स्वधनदा ! धनदा[illegible] मानव ४९

विषय सेवुनि सेवुनि माझिया, विकलता जडली [illegible]द्रियां;
अति मतिभ्रम दुर्गति काय ही ! कृपण मी; पण [illegible]ण त्यांतही ५०

पळभरीहि विराम न पावते, तव पदीं ! विषयांमधिं धांवते;
भ्रमविते, अखिलेश ! मला अति मति सदा, निस दाखवि सद्गति ५१

खाचित मी बुडतों भवसागरीं, धरुनियां वरतीं मज सांवरीं,
तुजसि अर्पितसें, नमुनी पदें, सकरुणा! करुणालहरीपदें ५२

[५]

## करुणविलास.

वसंततिलका.

हा हाय! दृष्टि विधिनें अतिबक्र केली!
प्राणेश्वरी त्यजुनिया मज दूर मेली!
कोणास हृद्गत मना! कथिशील आतां?
बोलोनि गोड तव वारिल कोण चिंता? १

येतां गृहीं, पुढति येउनि संभ्रमानें,
आनंदवीशि सरसस्मितवीक्षणानें;
तीं तूं सुधामधुर शब्द वदोनि आजी,
कां तापशांति लवही करिशी न माझी? २

माझ्या करा धरुनि, भीरु! पुरा विवाहीं,
यत्नें शिलाशकलिं तूं चढलीस पाहीं!
तो स्वर्गमार्ग चढशी, असहाय! आजी,
तेणें उले हृदय, भंगुनि धीरता, जी! ३

चिंता सरोजमनिंची सगळी निमाली,
झालें विशेष विधुबिंबहि कांतिशाली;
केला सुरू कलकलाट तसा पिकांनीं,
गेलीस तूं इर्थुनि हें परिसूनि कानीं ४

निर्दूषणा, गुणवती, रसभावपूर्णा,
सालंकृति, श्रवणकोमलकांतवर्णा,
अत्यंत रम्य कवितेसम माझिया जे,
कान्ता त्यजी हृदयमंदिर हें न माझें ५

नानाविचित्रविषयस्मृतिही बुजाली,
विद्या श्रमार्जित पराङ्मुख तेविं झाली;

ती मात्र एक विलसे अधिदेवतेशी
सारंगबालनयना हृदयप्रदेशीं ६
निर्वाणमंदिरिं जवें शिरतां दयाही
त्वां सोडिलीस सदये ! कृति योग्य कां ही !
आतां त्वदीय नवपंकजगर्वहारी
प्रेमप्रपूरितकटाक्ष न ताप वारी ७
विद्युत्प्रभातरल राजविलासभोग
देओनिया घडविशी सहसा वियोग !
मंत्रच्युता त्यजुनि जाय रमा नृपाशी,
तूं भाग्यहीनपति सोडुनि तेविं जाशी ८
झाली सुरम्य जगती तव मंजुहासें,
तेणें जिची विफलता कविलागि भासे,
ती पूर्णिमा परिसुनी तव दुर्दशेचें
वृत्त, स्वतां मिरवि वैभव इंदिरेचें ! ९
मंदस्मितामृतभरें अभिषिंचियेलें,
उत्फुल्लनेत्रकमलीं मज पूजियेलें;
ती नित्य मंगलमयी गृहदेवता ही,
प्राणेश्वरी हृदय सोडुनि जात नाहीं ! १०
कर्पूरवर्तिसम दे नयनोत्सवाला,
कंठास ही सुखवि जेविं नवाब्जमाला;
उल्लासवी सुकवितेसम जी मतीशी,
स्त्रीवंद्य ती विलसली सुरसुंदरीशी ११
सौंदर्य अप्रतिम, शील तसें उदार,
शालीनता रुचिर, वर्तन शुद्ध फार;
या सर्व आश्रयविहीन गुणां, मलाही
टाकोनि जाशि ! करुणा तुज काय नाहीं ? १२
माझ्याकडोनि घडला अपराध कांहीं,
तेणें मनामाध अढी धरिलीस कां ही !

नोहे तरी मजसि टाकुनि मुक्तिगेहीं
जाणें अशक्य तुज गोष्ट, पतिव्रते! ही १३
संबोधुनी रमण! नाथ! अशा पदांहीं
स्वर्गासमान मज भासविली धरा ही
स्वर्गस्थ होउनि अतां मज येथ काय
धूळींत लोळविशि मानिनि! हाय हाय! १४

——:०:——

## भास्कर रामचंद्र तांबे.

### वसावें वाटे दिनरजनीं!—

सखये! या स्थानीं
वसावें वाटे दिनरजनी!
पर्णकुटी बांधूनि तरुतळीं गिरिवरि हरिभजनीं--
वसावें वाटे दिनरजनीं!
वनदेवींची रम्य भूमि ही, सकल इथें जमुनी
समंत्र गायन करिति, घालिती फेर चपल चरणीं!
वन-सुमनांची माळ गळां तव घालिन स्वकरांनीं
स्नात मुक्तकच पाहुनि तुज त्या गणितिल निजराणी!
कविहृदयांतुनि मंजुळ कवनें तत्सम गिरिमधुनी--
खळखळुना आवेशें निघती निर्मळ निर्झरिणी!
देतिल निर्मळ जळ त्या प्याया मधुर सुधेहूनी!
प्रतिघोटीं ते स्मरणिं आणितिल प्रभुजींची करणी!
दाट लागले पहा मनोहर तरु खोऱ्यांमधुनी!
कंदमुळें आणि फळें अर्पितिल अशना स्वकरांनीं.
पापशून्य तीं मधुर भक्षुनी वसतां या विपिनीं
निर्मळ, निश्चळ, तृप्त मनानें लागूं हरिचरणीं!
सूर्योदयिं गातील तरुंवरी पक्षि एकवटुनी
उदात्त रस तो भरतिल हृदयीं येइल जळ नयनीं!

मधुररवें आळवितां हरिला गिरिशिखरीं बसुनी
 दिसशिल तूं भैरवी रागिणी रमणी रविकरणीं !
वीणा घेउनि करीं रवें तव टाकुं दऱ्या भरुनी-
 अदृश्यरूपें वनदेवी मग डुलतिल परिसोनी !
कविकुलगुरु उभयतां प्राच्य अणि पाश्चात्यहि मिळुनी
 वर्षांचें पळ कारतिल मंत्रें गुजगोष्टी कथुनी !
सखे ! अशांची संगति मिळतां काय उणें विपिनीं ?
 नको नको तें मधुमुख विषहृत् नगरमित्र फिरुनी !
पहा ! पहा ! गंभीर धीर हे गिरिवर चहुंकडुनी !
 मूक कसे वक्तृत्व वोपिती श्राव्य दिव्य कर्णीं !
प्रभुजीचे उपदेष्टे वितरति ज्ञान इथें बसुनी-
 काय भरे त्यापरी श्रुतीचें दुकान घालोनी ?
शांत रम्य या पुण्यभूमिचें दर्शन लाभोनी,
 महापातकी पवित्र होउनि रत हो हरिभजनीं !
नको नको प्रासाद नृपांचे दूषित रक्तांनीं
 कुवासनांचें अकांडतांडव सदा नगरसदनीं !

[ २ ]

## पांवा.

घुमव घुमव एकदां फिरुनि तो गोड तुझा पांवा
 सोनें झालें शेत पिकुनि हें, गातें मी धांवा !
लक्ख पसरलें शेतावर या निर्मळ बघ ऊन,
 पसर तसा तूं जादु तुझाही पावा फुंकून !
त्या जादूनें वनदेवींची भूमि बने शेत !
 कीं स्वर्गचि तो ओढुनि आणी क्षणामधें येथ !
मोत्यांचे दाणे भरले कणसांत या-रे सख्या !
लवलीं हीं खालीं कितितरि भारें तया-रे सख्या !
आनंदें डुलतिल पांवा परिसोनियां-रे सख्या !

होति विलक्षण वृत्ति मनाच्या भुलति दुष्ट भावा !
  फुंकाऱ्यासह जाति उडोनी क्रोध, लोभ, हेवा !
डुलुनी धुंदित बैल डुकाऱ्या करिती कुरणांत,
  बागडती या गाइ सख्या रे हंबरडे देत !
शिंगें ताडुनि शिंगांवरती देती ताल ह्मशी,
  सळसळती हीं कणसें पवनीं खळखळते नदि जशी !
पंचमांत गाते झाडावरि कोकिळा !–रे सख्या !
नाचोनि मोर हा उंच ओतितो गळा–रे सख्या !
हा ओढा गाउनि खळखळ भरतो मळा–रे सख्या !
लोट ! लोट रे ! ओघ जादुचा पाव्यांतुनि तेव्हां !
  सकळ मिळोनी एक सुरानें गाउं देवरावा !
कनवाळू तो या गरिबांचा कळवळला देव !
  दूर पळाला काळ घातला खोल जरी घाव.
धरणीमाता प्रसन्न झाली–कणसेंही पिकलीं
  हाय ! कशी मीं तुकड्याकारण बइ माझी विकली !
हीं बाळें आतां दूर नको व्हायला–रे सख्या !
जाशील न सोडुनि तूंही आतां मला–रे सख्या !
तें अभक्ष नलगे पोटा जाळायाला–रे सख्या !
नको ! नको तें स्मरण, स्फुरण हो आठवतां घावा !
बुडवाया तें दुःख जिवाला पांवा हा ठावा ! !

[ ३ ]

## जगाहुनि भिन्न !—

ज्योत्स्नेनें नभ व्यापिलें, विश्व माखिलें,
  पयें जणुं सारें, हृदयांत तिमिर या भरें !
नभि नक्षत्रें तळपती, रत्न मणि किती–
  विखुरले दिसती, कोळसे तरंगति चित्तीं !
वर्षतो सुधा शीतला, निशत्रि भूतला,

चंद्र या समयीं-काळकूट भडके हृदयीं !
शीत हा पवन संचरे, सुवासें भरे-
व्योम हें सारें-निश्वास ऊन मी वितरें !
सलिलांत फुले कमलिनी, मृदुल जी जनीं,
मनीं परि भरती-ते तरंग कंटक रुतती !
गुंजारव कुंजांतरीं, भ्रमर हा करी,
जरी मोदानें-भेसुर मी रडतों गाणें !
प्रियसखीवियोगामुळें- हृदय हो खुळें,
जगाहुनि भिन्न-तें चूर सुखीं, हें खिन्न !

[ ४ ]

## बुलबुलास—

उगिच काय बुलबुला ! शिणविसी गळा !
भरुनि तान कोमला, रिझवितोस कां मला ?
दगड रिझव जा तुला-साधतां कला !
उगिच कंठ फोडिसी, हृदय मात्र फाडिसी !
रमणिवाणि आणिसी-स्मरणिं मंजुला !
उकलिते इथें कळी, नच गुलाबपाकळी
सांठवो स्वहृत्स्थळीं-गीति कोमला !
मधुर येथली कळी कधिंच जाण वाळली !
चुकलि दृष्टि कां खुळी-बघसि कां मला ?
बघसि कंटका मला, रुतुनि मात्र विव्हला
तनु करील कोमला पळ-न हो खुळा !
प्रीतिचा सुके झरा-हृदयिं, देइ उत्तरा-
कवण ? जा करीं त्वरा उडुनि सुस्थळा !
उपवनीं जिथें किती, नव गुलाब हांसती-
दे झराहि हुंकृति, झुळुझुळू तुला !
सदन हें स्मशान, गा ! काष्ठ मी, रहा उगा;

भुलुं नको! न येथ गा-परत आपुला!
  तुझी कट्यार चोंच ती, हृदयिं तीव्र खोंच ती!
पोंचवी जिथें सती! झणिं सख्या मला!
  उगिच काय बुलबुला शिणविसी गळा?

——:०:——

## कृ. ल. पा.

जन्म-इ. स. १८७१.

## समुद्रवर्णन.

"सेतूनें अपुल्या विभक्त, मलयापर्यंत सारा पहा,
  सीते! दृष्टिस फेनिलांबुधि किती वाटे तरी रम्य हा!
शुभ्राकाश शरदृतूंतिल जसें तें चारुतारायुत
  स्वर्मंदाकिनिनें द्विधाकृति दिसे, हा तेंवि गे शोभत.
"पूर्वीं यज्ञ-तुरंगमास सगरें पृथ्वीवरी सोडिलें,
  तों त्यातें कपिलें रसातलिं सखे! नेवोनियां ठेविलें;
त्याचा शोध करावयास खणिली मत्पूर्वजांहीं धरा,
  सीमा वाढुनियां तदा मिळतसे विस्तार या सागरा.
"याच्यापासुनि सूर्यरश्मि करिती गर्भास कीं धारण,
  यामाझारिं विवृद्धि पावत असे सारेच सीते! धन;
देई हा वडवानलास अपुल्या कुक्षींत जागा पहा,
  तैसा त्वन्मुखकांतितापशमना चंद्रासि दे जन्म हा.
"एकाची समयीं पहा बदलती याच्या अवस्था किती!
  आहे थोर तसाचि हा, दशदिशा याचीं जलें व्यापिती;
रूपाचे विविध प्रकार, न तशी व्याप्ती तयाची कळे;
  साक्षाद्विष्णुपरी न रूप सखये! याचें कुणा आकळे.
"आकर्षोनि जगास सर्व अपुल्या आत्म्यांत जो लोपवी,
  ब्रह्मा आद्य बसोनि नाभिकमलीं होई जयाचा कवि,

योगाची अति गाढ झोंप सखये ! ज्यानें युगान्तीं प्रिया,
विष्णू तो युग संपतांच निजण्या घे याचिया आश्रया !
" पक्षच्छेद करोनि गर्व हरिला इंद्रें नगांचा यदा,
शत्रुत्रस्त नृपांसमान पळती तेही हजारों तदा;
जैसा त्या नृपतीस आश्रय उदासीना नृपाचे घरीं,
कांते ! तेविं मिळे नगांस सगळ्या या सागराभीतरीं.
" जेव्हां उद्धरिलें वराह बनुनी, पातालभागांतुनी-
पृथ्वीतें सखये ! पुराणपुरुषें दंष्ट्राबला लावुनी,
सिंधूच्या प्रलयोर्मि फेनधवला तेव्हां तदीयानना
झाल्या शोभवित्या क्षणैक तिजला देवोनि आच्छादना !
" देतांना मुख आपुलें पतिमुखीं ज्यां भीड कांहीं नसे,
कांते ! त्या सरितां पहा चतुर हा तोयाधरा देतसे;
भोगी हा रसिक स्त्रियांस अपुल्या नान्या जनांचे परी,
पीतो तद्रस, त्यां स्वकीय पिववी, याची अशी चातुरी.
" मोठाले, बघ, ते नदीमुखिं किती मासे विशालाकृति !
यावें तोय सजंतु तेथ ह्मणुनी आ फाडुनी बैसती;
त्या तोयें भरतां हळूच मिटतीं जैसे मुखा सत्वर
कारंजीं उडती कशीं बघ शिरोरंध्रांतुनी तीं वर !
" घेती केविं उड्या अलक्षित पहा हे नक्र नागाकृति !
फेंसातें करुनी विभिन्न अपुल्या दोन्हींकडे टाकिती,
तो कांते ! उडतां जसा चिकटतो त्यांच्या कपोलावरी,
कर्णां शोभवुनी दिसे क्षणभरी गे चामराचे परी !
" मोठी लाट, तसेच देह दिसती यांचे, नसे अंतर,
भक्षाया अनिला भुजंग निजती येवोनि कांठावर;
सूर्याचीं किरणें फणस्थ मणिंच्या ठायीं जशीं बिंबती,
तैसा निश्चय होत कीं पसरला येथें फणींचा पति.
" कांते ! शंखसमूह वाहुनि कसा वेगें तरंगांचिया-
येई विद्रुमसंधिं, जो दिसतसे ओष्ठापरी तूझिया;

शंखांचीं, बघ, तीं मुखें अडकुनी जाती तदीयांकुरीं,
तेणें क्लेश पडे विशेष निघण्या, तेथून त्यांतें दुरीं.
" प्याया वारि घन प्रवृत्त सखये! झाला न तोंची, पहा–
वेगानें फिरवी कसा गरगरां त्यातें महावर्त हा;
हें पाहोनि खरोखरीच गमतें कीं मंदराख्याचलें–
कांते! काय समुद्रमंथन पुन्हां व्हाया अजी लागलें!
" कांठीं तालतमाल उंच तरुंच्या राजी पहा शोभती,
दूरोनी अति सूक्ष्म ती दिसतसे नीला वनांची तति;
वाटे चक्रचि लोहनिर्मित असे मोठें पुढें विस्तृत,
सारें शुभ्रतटीं परंतु दिसतें मालिन्य रेखान्वित!
" वाळूमाजि विभिन्न शुक्तिमधुनि चोंहींकडे प्रसृत–
मोत्यें तीं बघ, पूगवृक्षहि तसे जे कीं फलावर्जित;
आलों खास तटप्रदेशीं सखये! वेगें विमानाचिया,
कांहीं वेळ न लागला दुरुनियां येथें अह्मां यावया.
" मागें तूं वळुनी मृगाक्षि! अपुल्या दृष्टीस फेंकीं अतां,
कैसा मार्ग सुरम्य सर्व दिसतो मागील तो तत्त्वतां!
होई दूर पदोपदीं अपुलियापासोनि जो सागर
त्यांतोनी निघते सकानन कशी पृथ्वी पहा सत्वर!"

—रघुवंश.

[ २ ]

## पूर्वस्तुति.

I remember, I remember &c.—

—*T. Hood.*

मला आठवतें पूर्णपणें सारें,
जनन माझें गृहभागिं जया झालें;
सूर्य जेथें होतांच कीं प्रभात–
नित्य येई सान त्या गवाक्षांत.

नियम सोडुनि पळ पूर्व कधिं न आला,
दिवस न तयें मज दीर्घ भासवीला;
परी आतांशा वाट पाहतो ही—
रात धन्या जी प्राण हरुनि नेई!

फुलें आठवती लाल गुलाबाचीं,
मंदिरें जीं सुंदरा इंदिरेचीं;
कण्हेरींचें धमधमित पीत पुष्प—
वरित होतें सौंदर्य तें अमूप.

मालिकेच्या त्या नीडयुक्त वेली,
वाढदिवशीं लाविली जी चमेली—
जयाच्या, तो मम बंधु कुठें आहे?
जरी वेली ती आज तशी राहे!

मला आठवतो वृक्ष तोहि थोर,
जया स्कंधीं बांधोनि लांब दोर—
खूप झोंके घेतले तया काळीं,
परि न इच्छा तेधवां पूर्ण झाली!

मला वाटे जे विहग उडत जाती
उंच आकाशीं, तेहि येच रीती—
पावताती आनंद वायुवेगें,
लोट येती जों गार पुढें मागें.

कसें तेव्हां मन पवनजवन माझें!
अतां जड तें बहु तयावरी ओझें!
त्रितापानें मम तप्त सदा काय—
हिमस्पर्शेंही होय तया काय?

मला आठवती वृक्ष मोठमोठे,
सघन असुनी उत्तुंग फार होते;
उंच शिखरें बारीक पाहुनीयां
नभःस्पर्शी वाटलीं तीं मना या.

बाळपणिंचें अज्ञान असें होतें,
तरी हर्षाचा विषय अतां कोठें?
ईशसन्निधतर बाळपणीं होतों—
अतांपेक्षां, हा खेद मना होतो!

[ ३ ]

## मृत्यु-भय.

"When I have fears that I may cease to be."

—*Keats.*

मला जेव्हां भीती बहु दुखविते येउनि मनीं
–न कीं जों आलें तें घडुनि मम जें ईप्सित जनीं,
असा तों जाईन त्यजुनि जग हें मी झडकरी—
कृतांताच्या दारीं-नच मग तिथें लेखनि करीं!
जिची झाली नाहीं लिहुनिलिहुनीं हौस पुरती—
तरंगांतें सार्‍या, मम मनिं असे ज्यांस भरती;
न जों वाग्भांडारीं स्थळ मज मिळे जें अढळ तें,
न पक्का बुद्धीला फळ सुनिधिच्या योग्य फळतें.
कधीं, नक्षत्रांहीं विकसितमुखीं पाहत निशा—
उभा राहें, मोठे घन सुचविती थोरहि अशा—
प्रबंधां गंभीरा, तंव मन विचारें घुमतसे,
न मेघां आलेख्यीं मम कर कधीं अर्पिल असे!
पुन्हां तूझा लाभ क्षणभरिच लाधेल मजला,
विचारा या आतां अनुभवितसें; आणि तुजला—
पहायातें, प्राणेश्वरि! मग पुढें नेत्र भरुनी
मिळे मातें कैसें सकृदपि, असें टोंचत मनीं!
तुझ्या प्रीतीमध्यें मग मज पुढें कोठुनि मिळे—
विसावा प्राणांला पळभर तरी सांग विमले!

—स्वसामर्थ्यानें जी जवळ असलें संकट तरी
पुढें येणारेंही, ठरुनि नच येई क्षणभरी !
सखे ! थोड्या काळें मुकुनि सगळें जाइल मला—
असें वाटे, पृथ्वी दिसत तंव ओसाड विपुला !
तिचा एकाकी मी तट वरुनि चिंतेंत बसतों,
न कीर्तिप्रेमाचा मज जंव तिथें अस्त घडतो !

## [ ४ ]

## करुण–विलाप.

" Here is the bower she loved so much. "

—*Moore*.

प्रिय बहु तिला होतें तें हें लतागृह साजिरें,
प्रतिदिन जया पाणी घाली प्रिया अपुल्या करें;
तरु दिसत हा, ही वीणा ती, जिला मृदु काढण्या—
स्वर शिकविलें, आतां कैशी मिळे मज ऐकण्या !
रडति, बघती ना कोणाही गुलाब कितीतरी !
कुठुनि रचण्या माला येई तिचा कर तो तरी !
अमित पडलीं पद्यें येथें, तयां न कुणी पुसे,
मधुर करण्या आलापांतें गळाहि न तो दिसे !
बहर पुडती येवो वृक्षां वसंत सुखावतां,
परि कुठुनि ती शोभा येई तिच्याविण तत्त्वतां ?
सखिसह असे गेला जो तो न वेळचि भासला,
गलितगति तो होई आतां, असें गमतें मला !
जंव सखि इथें होती, वर्षे दिनापरि जाहलीं;
पलचपलता कैशी तेव्हां दिनांसहि लाधली !
युवक न कृती धात्याहस्तें अशी कधिं जाहली,
करुणतर ती नाहीं कोणीं प्रियाहि विलापिली !

——:०:——

# विनायक जनार्दन करंदीकर.

जन्म-इ. स. १८७२; मृत्यु-इ. स. १९०९.

## नदी आणि कवि.

असो कवीचें कुल अप्रसिद्ध, होई कवीच्या कवनें प्रसिद्ध.
तसा नदीच्या उगमस्थलाला-नदीमुळें गौरवलाभ झाला.
काव्यें कवींचीं जगतांत गावीं, त्याचें न त्याच्या परि चोज गावीं.
नदी सुदूरस्थ जनां पवित्र, विटाळिती तीर्थ तिचेचि पुत्र.
बाल्यांत उच्छृंखलवृत्ति दोन्ही, ठावा नसे आडथळा म्हणोनी;
लागो दरी खोल, उभा पहाड, जातात तीं धांवत धाडधाड!
जाई जसें अंतर होत खोल, गांभीर्य ये वृत्ति निवे विलोल.
रेखून मार्ग क्रमितात संथ, करींत कल्याण जगीं अनंत.
अभंग त्यांच्या हृदयीं तरंग, निसंग ते त्यांत सदैव दंग,
गाऊन गाणीं भ्रमतात रानीं; ते धन्य ज्यांच्या पडतात कानीं.
स्वजीवनानें उगवून दाणे, नदी जिवां दे चिर जीवदानें.
तसें कवीच्या कविताप्रवाहें, जीवांत संजीवन दिव्य लाहे.
राष्ट्रें बुडालीं, नृप थोर गेले, नदी कवी मात्र अनंत ठेले!
भागीरथीला खळ लेश नाहीं, अखंड रामायण लोक गाई.
महाकवी थोर नदाप्रमाणें, मी बापडा ओघळ अल्प जाणें.
धाकें न ओढा झुळझूळ वाहे, माझी तशी ही गुणगूण आहे!

[ २ ]

## प्रीति निमाली तर-

नादें मंजुळ आपल्या रिझविते जी मन्मना नेहमीं
ती एका निमिषांत रम्य मुरली भंगून टाकीन मीं!
अंगारें जडवून पंख उसने जाईन कीं सत्वर-
मी येथून उडून उंच गगनीं, प्रीती निमाली तर!
माझी कोण करील उत्सुक मनें मार्गप्रतीक्षा घरीं?
प्रेमें बालक कोण सुंदर वदा देईल माझ्या करीं?

आतां भासतसे मला भवन जें सर्वस्व चेतोहर–
त्या येईल खरोखरीच वनता, प्रीती निमाली तर!
काव्याला अनुरूपसा विषय तो कोठून राहे जनीं?
स्फूर्तीच्या उठतील नित्य लहरी कैशा कवीच्या मनीं?
वाहावीं कवणास काव्यसुमनें त्यानें वदा भूवर?
कोठूनी जगतीं उरे रसिकता? प्रीती निमाली तर!
अस्ता जाइल सूर्यतेज वितरी विश्वास जें जीवन,
तेणें व्याप्त समस्त होइल जगत् दुःखांधकारें घन;
सौख्याचा लवलेशही न मनुजा लाभेल हो दुर्धर,
भीतीनें मरतील मानवकुलें, प्रीती निमाली तर!

[ ३ ]

## सुवास.

[ ओसाडींत सहल करीत असतां कवीला मधून कस्तुरीसारखा वास येई. (हा वास जुन्या भुजंगाच्या श्वासाचा असतो म्हणतात.) वास कसा आला, कोठून आला, म्हणून त्यानें पुष्कळ शोध केला; पण व्यर्थ! त्या नादांत त्याच्या मनाची जी स्थिति झाली, तिचें खालील पद्य हें चित्र होय.]

हिंडत असतां निर्जन रानीं, स्वैरगतीनें गुंगत गाणीं;
मधुर सुवास घ्राणीं आला, त्यायोगानें आत्मा धाला.
उद्भवला हा परिमल कोठें? पडलें मजला कोडें मोठें.
फिरलों–स्थिरलों ठायीं ठायीं, मूळ तयाचें कळलें नाहीं.
कार्य आणि कारण या जगतीं, तींच वस्तु नटलेली दिसती,
तेंसें माझें मानस आतुर, शंका काढी–देई उत्तर.

*          *          *

सुगंध जो कां अंगीं दाटे, पुष्पमिषें प्रगटावें त्यातें;
पुष्पें–ज्यांना नाहीं जोड, रंगें, रूपें, वासें गोड.
हुंगीना परि कोणी त्यांतें, त्यांच्या आस्वादी न रसातें.
खेळावीं जीं रसिका–हातीं, होते त्यांची संतत माती.

ओसाडींतिल गुलाबातें, खिन्नपणा याकरितां वाटे.
टाकि उसासे सारा वेळ, त्याचा, हा का गंध असेल!

* * *

वागविली निज हृदयप्रांतीं भक्तीनें रमणाची मूर्ति.
भजली, अर्पण करुनी त्याला प्रेमाच्या पुष्पांची माला.
काय होय तें परि पुरुषाला, नव पुष्पांवरच्या भ्रमराला?
विमुख तिला तो हाय! जहाला, अंतरली स्त्री सर्वस्वाला.
बाला भग्न मनोरथ झाली, मौक्तिकांपरी अश्रू ढाळी.
दुःखानें एकांतीं स्फुंदे; काय तेंच या स्थानीं गंधे?

* * *

मात्सर्याचा भरला वारा, अहंपणाचा सर्व पसारा,
अज्ञानाची मिरवे द्वाही, रसिकत्वाला थारा नाहीं.
काय अशा जनतेंत रहावें? काय पहावें? काय चहावें?
बरें रहाणें निर्जन रानीं, ओढ्यासंगें गाणें गाणीं.
यापरि वैतागून कवीनें, ओसाडींत स्वच्छंदानें-
वाजविला जो सुस्वर पांवा, त्याचा का हा वास असावा?

* * *

परिमलकारण कळलें नाहीं, उगमस्थळ आढळलें नाहीं;
व्यर्थ हिंडलों झालों वेडा, वेडा! वेडा! वेडा वेडा!
परिमलकारण मजला कळतें, उगमस्थल किंवा आढळतें,—
सांठवितों कवितेंत तयाला, वाग्देवीला सुखवायाला!
स्वानुभूत वासाचें दान, करावयाला जोंवर ये न,
तोंवर कवितालतिकेवरती-कर्णिकारसुमनांची भरती!

——:०:——

# 'Bee.'

जन्म–इ. स. १८७२.

## कमळा.

[शिवाजीमहाराजांच्या कारकीर्दीच्या अखेरीला पुढील हकीगत घडून आली. थोरात आडनांवाच्या मराठे सरदाराची कमळा नांवाची एक रूपगुणसंपन्न कन्या होती. संभाजी शिकारीस्वारीवर निघाला असतां थोराताकडे उतरे. या शूर, दिलदार, परंतु विषयासक्त पुरुषाची नजर तिजवर जाऊन त्यानें तिला शिवनेरी किल्ल्यांत आणून ठेविलें. पुढें आपली फसगत झाल्याचें पाहून तिनें किल्ल्यावरून उडी टाकून जीव दिला.]

नभःशिलेवर कोर चमकत चढत्या चंद्राची,
  निकषावरची जशी ठळकशी रेषा सोन्याची !

शुद्धाधिष्ठाना मुदमंगलमय संकल्पाचें
  शशिखंडाला होतें मण्डन तैसें अंकाचें !

अत्युत्कट उत्कर्ष गुणांचा, तज्जन्य स्खलन,
  मिळून अद्भुतरम्य मनुजता झाली निर्माण.

मृगलांछन त्या मानवतेचें परम रम्य चिन्ह
  परंधाम परमेश मौलिवर मिरवि अविच्छिन्न.

चंद्रकले गे ! चमक !–भरूं दे दीप्तिसह धरणी–
  भारतरमणी–गुणरत्नाकर–यशस्तरंगांनीं !

लोकोत्तर कोणे दृश्यावर जडलें तव चित्त–
  अढळ रंगलें–सांग दीप्तिमय एकच रंगांत ?

निसर्गदुर्गम सह्याद्रीच्या प्राकारांवरून–
  शशिकिरणें गिरिदरींत घसरतां होतीं संचूर्ण !

निश्चल झाला निसर्गांतला धडधडता प्राण,
  निश्चल वारापाणी, निश्चल कडे आणि रान.

निश्चल कालीं या शिवनेरी दुर्गप्रान्ताचें
प्रासादाचें उघडें दिसतें दार गवाक्षाचें.
कोमल आहे कोणी श्यामा चिंताकुल बसली,
लावण्याची किशोरगंगा वाट काय चुकली !
गूढत्वाचे, सुंदरतेचे, भावसघनतेचे,
नीलवर्ण हें द्योतक यांच्या निस्सीमत्वाचें;
मुसावला नीलिमा तोच ही नीलदेह रमणी,
निळ्या सारणीमधें वाहतें मोत्याचें पाणी !
कृष्णकेश मोकळे, स्वेदकण तेजस्वी भालीं,
कर्णभूषणांची बहुवर्णच्छवि गालीं पडली;
भृकुटींच्या महिरपांखालीं नेत्रांचें युगल—
निमिषोन्मेषीं निर्मी नूतन नवल सृष्टिगोल;
चारु चिबुकनासिकादि गात्रें सारीं निर्दोष,
रुद्ध करुन ठेविलें बदलत्या त्यांनीं शोभेस !

* * *

नरनारीरत्नांचा आकार महाराष्ट्रदेश
बलविद्याचापल्यशीलशोभेचा अधिवास;
इहामुत्र कोणाहि विघातक रोधक सत्तेस—
लवला नाहीं लेश कधीं हा तेजस्वी देश.
त्रिच्छक्तीच्या कार्यक्षम या केंद्रस्थानांत
प्रथित मराठेकुळांतील कुळ नामें थोरात;
त्याच कुळींची कमळा होती एकुलती एक,
श्रीमंताची, सरदाराची, थोराची लेक.
शठ कपटी संभाजी आणी गणगोतांमधुनी
कपटजाल विस्तरुनी ही अव्याजसरल तरुणी.
विकसोन्मुखलावण्य-शुद्धशालीन्यसुगुणशाली
मतंगजें ही नलिना उपड्डान हतजीवित केली !

नीलजलज–कलिके गे ! नच तूं उमललीस पुरती—
पावलीस उदयींच जशी लय कोणी शुभद तिथि.
सरस–वसंत-शिरोभूषण गे ! तूं असतिस झाली,
परि क्रूर हेमंत बहर तव नवतीचा जाळी !
कान्त कपोलप्रान्ता उन्मत्तानें चुंबियलें—
विशुद्ध पुष्करिणीचें पाणी विषसंकुल केलें.
तव तन्वंगा विळखा पडला त्या अधमांगाचा
चंदनविटपा जसा लपेटा जहरी सर्पाचा !
कनकप्रभ नवभानु–वैभवा सांडुनि, रे नीचा !
धरिला लोभ क्षणभंगुर विषयाच्या कांचेचा—
त्याचमुळें तव राज्य निमालें, हीन मरण आलें,
शुद्धात्म्याचे मूकशाप संभाजी ! तुज भंवले.

* * *

तमालदलसन्निभाभिरामा ती बोलूं गेली
वनराजीसह शरच्चंद्रिका ईषदेक हलली !
"आठवतो–" वदली ती–"मजला तो घातक दिवस,
मोह अजूनहि पाइं बघतो जो मृतचित्तास;
निळया अंबरीं निळी निशा ओढुनी निळी बुंथी
उत्कंठेनें येतां लक्षी 'कोणाला' पंथीं;
नेत्र तिचे 'त्या' नेत्रां मिळतां लालबुंद झाली,
घाबरल्या रजनीची पटकन मग संध्या बनली;
मखमालीच्या तकतकणाऱ्या आस्तरणावरतीं
रात्या कमळाच्या कुणिं रचिल्या पंक्तींच्या पंक्ति.
गांवाच्या बाहेर वनीं मी तें पाहत होतें,
अकस्मात युवराजाचीही स्वारी ये तेथें.
अबलख.वाजी, फेस मुखीं, उत्संखळ गति त्याची,
घामानें वर डवडवलेली मूर्ति स्वाराची.
लाल नयन, मुख लाल, करीं समशेर लाललाल,
वेष शिकारी, उन्मादें मन झालें बेताल;

गौर तनूवर नूर विराजे, खुले वीर-वृत्ति,
क्षणांत टाकुनि उडी खालतीं मज धरिलें हातीं.
हिरवे, पिंवळे, लाल, गुलाली, रजनीचे रंग
पटपट बदलुनि निवळुनि झालें नितळ तिचें अंग.

* * *

"भानावर आलें तों दिसली, पाहें जंव भंवतीं,
काळोखाच्या बुरख्याखालीं दडलेली जगती.
अस्तित्वाचें भानहि नव्हते केव्हांही जीचे,
कडक तेज अनुभविलें प्रथमचि आंतिल ज्योतीचें.
ज्ञान मनाला अंधाराच्या रूपाचें नव्हतें,
इच्छेविण तें जिवंत आलें साक्षात्कारातें.
परमेशाचे हेर पहारे नभिं होते देत,
मिचकावुनि निजनयनां होते चोरुनि मज बघत.
सळयांनीं तापल्या डागिलें त्यांनीं मम भाळा,
चहाड मुख तें दावाया मज धीर न कोणाला.
अपापमन स्वप्नींहि न पाहे चित्र वाइटाचें-
जाणे एकचि गंधर्वांच्या पुरिं भटकायाचें.
बुजलें नव्हतें रानपांखरू जें कवणें काळीं-
भय न तयाला दे शिरतांना अंधेरी जाळी.
कडु अनुभव परि लिहिला होता गे! त्याच्या भाळीं
येउं नये दावेदारासहि जो कोणे काळीं!
देवाची, धर्माची, वाहुनि वडिलांची आण
सहज सर्व त्या विसरुनि झाला खळ तो बेमान.
शकुंतला, शर्मिष्ठा, कन्या क्षत्रिय ज्या अन्य,
हेळुनिही गुरुजनांस झाल्या धन्य जगन्मान्य;
देउनि हे दृष्टांत जुने ऐकाया अति गोड
अपकीर्तीची मात्र करुनि मज दिली भली जोड!

निर्धाराच्या, सत्त्वाच्या, त्या खऱ्या अढळ मेरु,
कसास कशि उतरावी त्यांच्या मी पामर भीरु ?

* * *

" ताताच्या मनिं होतें कीं मज युवराजा द्यावें,
अप्रिय नव्हता मजही तो, हें कशास लपवावें ?
शिवरायाचा सुत वचनाला अपुल्या जागेल,
कलंक माझा कांहींसा तरि धुतला जाईल,
या आशेवर जगलें; पण मी सर्वस्वीं फसलें,
कारण वांचायाचें आतां क्षणभरही नुरलें !
सांडुनि गेलें जल, दुर्दैवी तसाच तान्हेला,
काय होय त्या बहु मोलाचा पाचूचा पेला ?
थोरातांच्या पाक कुळीं जी जन्माला आली,
राख म्हणुनि घ्यायाचें आलें आज तिच्या भाळीं !
कुलवंताच्या कन्या जीणें जें लाजिरवाणें
त्यागुनि आदरिती मानाच्या मरणाचें जीणें.
भलभलतें मजविषयीं बोलत असतिल जनलोक,
शल्य मना हें प्राणान्ताहुनि जाचितसे अधिक !
विधिविरहित आलिंगन चुंबन देहाला घडलें,
याहुनि दुसरें घोर घडावें पातक तरि कसलें ?
परपुरुषाच्या सत्तेखालीं येथें मी आलें,
पतिव्रतेचें डंफण तेथें मिरवावें कसलें ?
ह्मणोत जन, पण ह्मणूं नको तूं गे माझे आई !
' कुळबुडवी कारटी कशाला जन्माला येई ! '
मनांतलें मन बोले कीं मी आहें निर्दोष;
खोटें सांगत नाहीं, आई अंबेची साक्ष !
कौमार्याचें झालें असतें व्रत माझें भ्रष्ट,
त्याच क्षणिं प्राणाला केलें असतें मी नष्ट
परंतु आलें काहुर मजवर ज्या आरोपाचें—
शुद्ध रक्त प्रोक्षुन मी करितें परिमार्जन त्याचें.

ज्या देहावर पडलें आरोपाचें आवरण–
तोच देह मी मोह सोडुनी देतें फेंकून.
भावी ललना वदोत नच कीं कमळेनें लपुन
चित्तशुद्धिच्या ढालेखालीं वांचविले प्राण !"

*　　*　　*

क्षणैक हलली शरचंद्रिका पुनश्च सहितवन
क्षिप्र अनन्तीं नितान्त विश्वप्राण होय लीन.
नश्वर देहा दरींत फेंकुनि ज्या बुरुजावरुन
प्राणविहंगम करितां झाला हा भव्योड्डान–
त्याला तेव्हांपासुनि '**कमळाबुरुज**' लोक म्हणती,
नरनारीजन पोवाडा हा अजुनि तिचा गाती.

[२]

## फुलांची ओंजळ.

**ऐशी प्रेमाची ती जाती**
**लाभाविणें करी प्रीती.**

—तुकाराम.

सृष्टीचा लडिवाळ बाळ वेल्हाळ कवी धाकटा
अफाट जग–हाटांत पाहिला हिरमुसला एकटा.
कळवळली कनवाळु मनीं असमाय माय– मावली
बाजारांतुन काढुन माया–पांखर वर घातली
चंद्रसूर्य खेळणीं दिलीं खेळाया तेजागळीं,
कुरवाळी हलुवारपणें पण न फुले कवि–मन–कळी.
नक्षत्रांची—चटक फुलांची—माळ टपोरी नवी
जरतारी तारांत गुंफुनी लेंकरास लेववी.
आकाशाचें अंगण झाडुन अवीट रंगें वरी
विचित्र रेखा–लिही लिही ती कळाचतुर सुंदरी.

'बाळ उदासी वणवण भटकुन अपार निष्ठुर जगीं
असेल थकला'-विचारांत या क्षणभर झाली उगी.
निज प्रेमासम अमर्याद, अक्षय्य, विनिर्मित करी
शुद्ध दुधाची नदी; पाहती अजुनी जन अंबरीं.
एकाहुनि आगळीं एक, रुचिरत्वें निस्तुळ खरीं,
दृश्याचीं तीं असंख्य लेणीं पुढें मुलाच्या करी.
शिशुमन रमवायास करी आयास माय ती असे,
अगाध माया मोठ्यांनांही नाचविते भलतसें!

अळुमाळ परंतु न तो रिझला-काळोख दाट दाटला-
अजाणपण-जाणीव उपजतां दृश्य-लोभ आटला.
दृश्याचा अवडंबर अंबर-पदर दूर सारुन
विशाळ वक्षीं घट्ट धरी मग कवीस कवटाळुन.
सान्त अनंताची मिळणी ती, अगम्य अद्भुत खरी!
माय-लेंकरें अभिन्न झालीं निजानंदसागरीं.
सृष्टीशीं कवि समरस झाला-प्राण तिचा आंतला—
हृत्कमळाची तिच्या कळाली फुलती-मिटती कळा.

बोजड बाह्यालंकाराची-झण्काराची-रति
नुरली, अर्थाकार तयाची झाली प्रेमळ मति.
कवीच झाला सृष्टी सारी, सृष्टी झाली कवि,
दिसण्याचें लपण्याचें गारुड अपूर्व हा भासवी.
आकाशाचा अणू घेउनी त्यांत विश्व दाखवी,
फुंकर घालुनि अजस्र विश्वा क्षणार्धांत लोपवी.

हा हंसतां हंसते ती अथवा हा रडतां ती रडे,
पहांट फुटते हा उठतां, हा निजतां झांपड पडे.
पूर्णापासुनि ढळलेलें जग जातें पूर्णाकडे,
लांबण मोठी, वाट बिकट ती, उतार चढ वांकडे.

सृष्टिचक्र हें तोल जाउनी कलतें भलतीकडे,
खडतर मार्गीं दीर्घकाळ तें केव्हां केव्हां अडे.

चक्र सचेतन, सतेज, पण कीटाच्या काळ्या पुटें
वक्र काळ हा काळवंडुनी करी कधीं हिंपुटें.
उंचवट्यावर केव्हां जातां प्रकाशकण पाहतें
पूर्णत्वाच्या भ्रांतीनें तेथेंच स्वैर नाचतें.
पाणथळीचा खोटा तेजोभास पाहतां कधीं
सैराटपणें भडकुनि तिकडे फसतें चिखलामधीं.
स्नेहाभावें एक्या जागीं फिरूनि घरघर करी
तेव्हां वाटे मार्ग कंठिला आपण हा कितितरी!
जाणीव आणि नेणीव मिळोनी स्वभाव याचा घडे,
तेजोन्मुखता परी न मोडे जरी सदा तें पडे;—
सुखाभिलाषें अंग चोरणें, थंडपणें थांबणें,
लाभालाभा तोलुनि मोजुनि रूढीतें चिकटणें;
या अधमेहुनि त्या अविचारी बुद्धीचे थोरले
पात निपात अनंत बरे तेजोभिमुखत्वामुळें:–
आनंदाला म्लानपणा नच सौंदर्याला क्षय
स्थलाकडे त्या जाताहे हें विश्वचक्र निर्भय.
मार्गाची रूक्षता न याला यत्किंचित जाणवो,
परिश्रमाची प्रचंडता नच अनुत्साह उपजवो,
काव्यरसामृत यास्तव कारुण्यानें निर्मुनि कवि
मृदुमधुरोज्ज्वल गीतें गाउनि तेजोबल वाढवी.
भूतकाळाचें वैभव किंवा सांप्रतची हीनता
प्रकर्ष भावी समोर दावी कवी समग्र–जाणता.
हित केव्हां कटु बोल बोलुनी, हातभार लावुनी
सृष्टिचक्र हें नीट चालवी वाट उजू दावुनी.
भूताधारें समजुनि चालू काळ नीट, निर्मितो
सोज्ज्वल भविष्यकाळाला; कवि धन्य नव्हे काय तो?
काव्य अगोदर झालें, नंतर झालें जग सुंदर,
रामायण आधीं, मग झाला राम जानकीवर!

झाले कवि होतील पुढें, या विशाल कालोदरीं
अघटित घटना घडुन राहिली–कोण कल्पना करी !–
भारतराष्ट्र–नभोमुकुरावर–साऱ्या पूर्वेभर–
चिन्हें दिसती महाकवीच्या आगमनोत्सवपर.
‘ राजमिष्ठ ’ कवि सांप्रतचे ते सर्व चला या मिळा,
या रायाचा मार्ग झाडुनी रचा चारुतर फुलां.
तुमच्या परंपरेंतचि याचा व्हायाचा संभव
जनकत्वाचें पद तें तुमचें–तुमचें तें वैभव !
सृष्टीचे लाडके तुम्ही, संलाप तुम्हांशीं करी
प्रलाप किंवा विलाप त्याला म्हणोत कोणीतरी !
“ अद्वितीय उत्तम नसे सर्व तें अधम ” म्हणुनि लेखिती
दूषक तुमचे अपूर्व त्यांची तर्कांची पद्धति !
विजय असो तुमचा, तुमचे जे दूषक त्यांचा तसा
रानफुलें हीं तुम्हां वाहिलीं नंदनवनसारसां !

[ ३ ]

## चांफा.

चांफा बोलेना, चांफा चालेना,
चांफा खंत करी कांहीं केल्या फुलेना. ॥ धृ० ॥
गेलें अंब्याच्या बनीं म्हटलीं मैनांसवें गाणीं
आम्हीं गळ्यांत गळे मिळवुन.
गेलें केतकीच्या वनीं गंध दर्वळला वनीं
नागासवें गळालें देहभान !
आलें माळ सारा हिंडुन हुंबर पशूंसवें घालुन
कोलाहलानें गलबलें रान.
कडा धिप्पाड वेढी घाली उड्यांवर उडी
नदी गर्जुन करी विहरण.
मेघ धरूं धांवे वीज चटकन लवे
गडगडाट करी दारुण.

लागुन कळिकेच्या अंगा वायु घाली धांगडधिंगा
विसरुनी जगाचें जगपण.
सृष्टि सांगे खुणा आम्हां मुखस्तंभ राणा
मुळीं आवडेना ! रे आवडेना ! !
चल ये रे ये रे गड्या नाचुं उडुं घालुं फुगड्या
खेळुं झिम्मा झिम्–पोरी झिम्–पोरी झिम् !
हें विश्वाचें आंगण आम्हां दिलें आहे आंदण
उणें करूं आपण दोघेजण.
जन विषयाचे किडे यांची धांव बाह्याकडे
आपण करूं शुद्ध रसपान.
'दिठीं दीठ' जातां मिळुन गात्रें गेलीं पांगळुन
अंगीं रोमांच आले थरथरून.
चांफा फुलीं आला फुलुन तेजीं दिशा गेल्या आटुन
कोण मी–चांफा ? कोठें दोघेजण ?

——:०:——

## सौ० काशीबाई हेरलेकर.

जन्म–इ. स. १८७४.

### सीतागीत.

पतिव्रतापंक्तिमधें बससी पहिली होवोनी,
धर्म सतीचा दावुनि सर्वां, घेसि धन्य म्हणवोनी !
सीमा केली पतिनिष्ठेची, दुःख क्लेश भोगूनी
दशकंठाच्या असह्य जाचा, दिनरजनीं सोसूनी !
जनापवादास्तव भर्त्यानें त्याग जेधवां करुनी
गर्भमंथरा असुनी दिधलें घोर वनीं सोडूनी !
कुशब्द बोलुनि कलुषित केली, नच तूं जानकि ! वाणी,
बहु धैर्यानें काळ कंठिला, घोर अशा त्या रानीं !

सहनशीलता मूर्तिमंत ती वसली तुझिया सुमनीं,
मधुरतर जसा सुवास राहे, सुवर्णचंपकसुमनीं !
सुवर्तनाचें फल तुजला तें देवी ! उत्तम मिळुनी
अमर होउनी अक्षय कीर्ती जासी संपादुनी !
उभय कुलांनां भूषण होसी, बहु सार्थकता करुनी-
निजजन्माची, तोषविली त्वां आर्ये ! ही भूजननी !
तव पायांचें तीर्थचि प्यावें, आम्हीं अज्ञजनांनीं
लीन असे ही अज्ञा कन्या, वंद्य तुझ्या शुभ चरणीं !
दावि आपुला मार्ग मला तूं, सकलजगज्जननी
इहलोकींच्या कर्तव्यांतें मज करवीं करवूनी !
देइं आसरा मजला देवी ! अक्षय तव चरणीं
तव गुण गातां जाते वाणी कुंठित होवोनी !

[२]

## सीताविलाप.

दुर्दैवा दाखविसी का हा प्रभाव अपुला मजला !
त्रैलोक्यनाथ श्रीरामा बुद्धिभ्रंश तुवां केला !
प्राणांहुनि प्रियकर गमली, लोटिलें वनीं का तिजला !
प्रेमाचा× सागर माझ्या, आटुनी असा का गेला !
या घोर वनामधिं आतां, होईल कशी गति माझी ?
काळ हा कठिण मज भासे, बुडलें मी दुःखामाजी;
वनवास कसा हा साहूं ? एकली कशी मी राहूं ?
दुःखभार कैसा वाहूं ? धीर मला सोडुनि गेला !
वाहिला गर्व मनिं भारी, श्रीराम पती मज झाला,
त्रैलोक्य, सुरासुर, योगी, तापसी वानिती ज्याला,
तो राम सखा मम म्हणुनी, वाटली धन्यता मजला !
बाळपणापासुनि ज्याचा, सहवास असे मज घडला,

× रामाचें विशेषण व संबोधन.

रघुराय सखा अंतरला ! काळ आज उलटा फिरला,
अवचित हा घाला पडला, जाहली दीन ही अबला !
श्रीरामा ! जगदारामा ! सोडिली आज ही रामा !
परि चित्तीं राहूं द्यावा, हिजविषयीं अल्पहि प्रेमा.
भूपती तुम्हीं असतांना, सुतजनन कायसें विपिनीं !
कां विधिनें लिहिलें भाळीं, न कळे ही त्याची करणी !
मन राहे अपुल्या ठायीं, कामना दुजी मज नाहीं;
रघुपती ! सुखानें नांदा, चिंतिते मनीं सीता ही.
कुसुमाहुनि कोमल हृदया ! सोडिलें नसे मीं विनया,
निष्ठुर होउं नको सदया ! प्रार्थना हीच चरणांला.
एकरूप आम्ही असतां, मुकलों का एकमेकां !
काय पाप झालें न कळे ! अप्रिय मी गमलें लोकां;
स्वामींच्या सहवासानें, वनवास सुखाचा झाला–
पहिला; परि कवण्या आशेवरती कंठूं या काळा !
करुं प्राणत्याग जरि आतां, परि पातक येतें माथीं;
रविवंशज माझ्या उदरीं, रौरव का घेऊं हातीं !
हे वसुंधरे ! प्रियजननी ! करुणा येऊं दे स्वमनीं
तव दुहिता पडली व्यसनीं दे उदरीं थारा हिजला !
मर्यादा* सोडुनि केलें–वर्तन, जरिं निज दुहितेनें
तूं माय क्षमेची मूर्ति, पाहीं मजला प्रेमानें !
त्यागिलें पतीनें, तूंही–त्यजितां मीं जावें कोठें !
गर्भमन्थरा हें कथितें, जरिं वदण्या लज्जा वाटे !
पाहुनी श्वापदें वनिंचीं, भीतीनें हृदयचि फाटे;
गर्भभार हा सोसेना, चालतां तनू ही कष्टे;

---

* श्रीरामासह सीता प्रथम वनांत गेली असतां, तेथें एकदां त्यांनां केवळ भूमीवर शयन करण्याचा प्रसंग आला. त्या वेळीं भूमि ही सीतेची माता असल्यामुळें तिला संकोच वाटूं लागला व रामानें तृणशय्या केली. त्या आणि तसल्या-प्रसंगांनां हें अनुलक्षून आहे.

लोकापवादभीतीनें टाकिलें मला रघुपतिनें;
वदुं नको मला दुर्वचनें, येतसें शरण मी तुजला !

——:•:——

## ‘भालचंद्र.’

जन्म—इ. स. १८७४.

### कैलासवासी आगरकरांस—

टिम टिम टिम टिम टिमणाऱ्या टिमक्या काय अनेक
धड धड धड धड झडणारी नौबत तुमची एक !
टिमटिमणाऱ्या बापड्या टिमक्या काय उपेग !
धडकी भूतां भरणारी नौबत तुमची एक !
टिमटिमण्यानें काय तीं हलती तरि येथून !
नौबत परि तुमची झडतां लगबग जाति पळून !
भूतें जीं गतकाळचीं वावरती भेसूर,—
धूम तया पळण्या लावी नौबत तुमची शूर !
ब्राह्मण्याचा वावरे दांभिक ब्रह्मसमंध !
गतविभवाचा वावरे पोकळ डौल समंध !
स्त्रीपरवशता वावरे हडळी ती बेताल !
दौर्बल्याचा वावरे वाचस्पति वेताळ !
वैधव्याचा वावरे रुधिरप्रिय सैतान !
जातिभेद तो वावरे कलहप्रिय सैतान !
भीषण दारुण वावरे जरठविवाह खवीस !
स्पर्शास्पर्शादिक भूतें करिती कासावीस !
अज्ञानाचें वावरे भीषण कृष्ण पिशाच !
अन्यायाचें वावरे निर्घृण उग्र पिशाच
भूतें हीं गतकाळचीं वावरती कित्येक,
धडकी परि त्यांना भरवी नौबत तुमची एक !

टिमटिमण्यानें काय ती हलती तरि येथून ?
नौबत परि तुमची झडतां लगबग जाति पळून !
टिमटिमणाऱ्या बापड्या टिमक्या काय अनेक !
धड धड धड धड झडणारी नौबत तुमची एक !

[ २ ]

## दुःखाश्रुमार्जन.

सुख सर्वांनां जरि व्हावें, दुःखानें कोठें जावें ?
सर्वत्र दिनें तळपावें, रजनीनें कोठें जावें ?
पुष्पांनीं विश्व भरावें, कंटक मग कोठें जावे ?
मधुसुधेंत जीव डुबावे, गरलानें काय करावें ?
ऐसें विधिनें पाहियलें, जैं द्विविध विश्व निर्मियलें !
एकविधा जरि हें केलें, द्वैतानें कोठें जावें ?
सुरमंदिरिं कोणिं रमावें ? तळवटीं कोणिं पहुडावें ?
आलाप कोणिं तोडावे ? रव विलाप कोणीं गावे ?
ऐसें विधिनें नेमियेलें जैं द्विविध विश्व निर्मियलें !
एकविधा जरि हें केलें, द्वैतानें कोठें जावें ?

[ ३ ]

## विश्वललित.

चराचर जगत्प्रबंध रचिला जईं थोर हा
विचार पुसला दिसे प्रभुवरें कवीला महा,
महीवरि फुलें, नभीं रवि, अनंत तारा, शशी,
मनोज्ञ सजलीं कशीं अमित दिव्य दृष्टांतशीं !
जगत्पट अहा जईं रुचिर चित्रिला थोर हा
विचार पुसला तदा गमत चित्रकारा महा,
मही हरित, नीलवर्ण नभ, यामिनी कृष्ण ही
तसे विविध रंगले ऋतु कसे वसंतादिहि !
जईं मधुर वाक्प्रवाह जगतांत हा ओतिला
विचार पुसला तदा गमत गायकाला भला,

गभीर घनगर्जना, खगजलौघ–आलाप वा,
किती भुलविती मधुस्वरसुधारसें मानवा!
जई बसविला अहा त्रिगुण खेळ विश्वाख्य हा
विचार पुसला दिसे प्रभुवरें नटाला महा,
जगत् सकल रंगभूमि, मनुजादि पात्रें वरी,
धरी प्रभु करांत सूत्र चिर सूत्रधारापरी!

——:०:——

## श्रीराम.

जन्म–इ. स. १८७४.

### झरोके.

नको नको दिनकरा! तुझी ती चंडकिरणरुक्षता
काळें कर येथुनि एकदां
अधोवदन करवुनी जगा अवनतीस नेसी सदा—
दृष्टिला दाविसि जडसंपदा!
मन त्यांतचि यापरि गुंगवुनी टाकिसी,
पोथ्याळ बनवुनी सर्पट ती लाविसी,
पाठीवर चटके देउनि वरि पोळिसी,
नक्राश्रू कधि कधीं ढाळुनी, कर्दम बनविसि बरा
कर्दमीं लोळविण्या पामरां!
चिन्मय रजनी! ये ये भुवनीं उघड उघड अंबरा
चुणुक दिव्याची दावीं जरा!
दिव्य संपदा, दिव्य चारुता, दिव्य प्रेमा खरा
तुझ्याविण कोण दावि जड चरां?
हें दिव्य असें जड दृष्टिस तूं दावुनी
अवनता दृष्टिला नेसी वर खेंचुनी,
चिन्मयांत तन्मय तूंच करिसि यामिनी!
ये तर ये मग तूंच–तूंच ही अखंड व्यापी धरा!
चुणुक दिव्याची दावीं जरा!

अधोवदन मंदधी तुला जन तमोमया बोलती,
तमोमय हृदय न परि खोलती !
याच तमीं तव असंख्य तारे काय अहा! चमकती-
तमोमय नेत्र काय पाहती ?
हे असति झरोके तिमिरपटालागुनी,
चमकते चुणुक ही दिव्याची त्यांतुनी;
जड हीन जगाला तारक जी त्रिभुवनीं !
दिव्यात्मा हा असे पलिकडे, कोण घालि हें मनीं-
तमोमय रजनी ! तुजवांचुनी ?
दिव्य झरोके चुणुक दाविती, मधुनिमधुनि गाळिती-
बिंदुही तेजाचे खालती.
गमे जगाचा ताप पाहुनी, करुणाघन मोहुनी,
प्रेमरस ढाळी नयनांतुनी !
जड देहा ! जा जा पाझरुनी या रसें,
मम हृदय-झरोक्या ! उघड उघड बा कसें,
हा बिंदु घेउं दे, जडलें त्याचें पिसें !
उघड झांप रजनी ! तव ममही हृदयाची करि परी
उदय रवि काळें कां ना करी ?
हृदय-झरोका अखंड ज्यांचा खुला खुला राहिला
तयांसचि बिंदू हा लाभला;
तेजाचे मग तेच झरोके अवनीवरि होउनी
महात्मे नाम पावती जनीं !
ते प्रकाशदाते तयोमया लागुनी
अवतरले हृदयीं दिव्य बिंदु घेउनी,
उघडाया हृदयें जड कवचें फोडुनी,
उघडुनि हृदयें यापरि कांहीं, कार्य करुनि महिवरी
झरोके दिव्य होति अंबरीं !
भार जडाचे, ताप जगाचे असह्य करुणाघना !
जाहले, दूर करीं यातना.

दिव्य बिंदुच्या, प्रेमरसाच्या पाउ सरीवर सरी,
झरोके अधिक अधिक बा करीं!
अणुरेणु जडाचे विरुनि विरुनि जाउं दे,
स्वयमेव झरोके हृदयें तीं होउं दे,
तिमिरांबर त्यांनिंच व्यापुनियां चमकुं दे!
तिमिर झरोकीं विरेल यापरि, झरोकेंच अंबरीं,
तेहि मग विरतिल दिव्यांतरीं!
धीर मना धरवे न, जडाचें कवच फोडुं कां तरी—
उडी ती घ्याया दिव्यांतरीं!
खोल खोल दिव्यांतर सदया! अंतर हें साहिना
हृदयिं कवटाळीं दीना जना.
तें मीलन-मीलन! अहा! अहा! काय तें-
जें आलें आलें--गेलें परि वाटतें!
हुरहुरोनि स्मरणीं जांच करुनि राहतें!
जांच नको, करि मूढ सुखें, वा अखंड हृदयीं धरी
टोंचणी भक्ताची तोंवरी!

——:०:——

## विष्णु बाबाजी कुलकर्णी.

जन्म—इ. स. १८७७.

### देवा विपत्काल दे—!

द्यूतांत सर्व हरतां निजवैभवास ते पंडुनंदन वनीं करिती निवास
सद्भक्तिनें करित सन्मुनिसाधुसेवा प्राणप्रिया स्मरुनि संतत वासुदेवा.
तों एकदां सहज तद्वसतिस्थलास ये भक्तवृंदसुरवृक्ष जगन्निवास;
आनंद पाहुनि तया बहु पांडवांला झाला, जसा जननितें चुकल्या मुलाला.
सामोरें जाउनी ते यदुकुलतिलका आणिती स्वस्थलातें
भक्तीनें तत्पदांतें नमुनि बसविती आसनीं माधवातें;

तेव्हां अत्यादरानें सविधि बहुमुदें सारुनीं पूजनातें
जोडोनी ते करातें करिति मग अशा प्रेमभावें स्तवातेंः—
" पातलासि सदया यदुराया ! दर्शनें स्वभजकां सुखवाया;
दाटलें परम सौख्यद पर्व जाहलों मुदितमानस सर्व.
" पांडवांवरि विभो ! उपकार जाहले तव अनंत अपार !
होउनी स्मृति सदैव मनाला येतसे भरुनि कंठ दयाला !
" आमुची जननि तूं प्रियबाप, तूंच सर्व हरिता भवताप;
कोण रक्षण करी यदुनाथ ! पांडवां तुजविण व्यसनांत ?
" बाहतां पडलिया जड भारी धांवुनी प्रगट होसि मुरारी !
राखिसी हरुनि संकट लाज सत्कृपानिलय तूं यदुराज !
" ताप यापरि घडे तुज फार तूं परी गणसि हा न विचार.
काळजीस आमुच्या यदुराया ! लागते तुज सदैव कराया.
" पूर्वपुण्य म्हणुनीच आम्हांस श्रीहरे ! खचित सांपडलास.
कोण वर्णिल तुझी जन लीला ?-यत्स्मृती करि विनाश कलीला.
" राहतों जरि महा विपिनांत त्वत्कृपें परि उणें न सुखांत;
आज भेट दिधली सुखदायी कैंवि होउं सदया ! उतराई ! "
यापरी परिसुनी स्तवनास हर्ष होय जगदीशमनास;
दासभक्तिवश माधव डोले तो पृथेस मग यापरि बोलेः-

" बघुनि विमल युष्मद्भक्ति माझ्या मनास-
अपरिमित जाहला गे पृथे ! हर्ष खास.
सुख-वर तुज द्यावा हेतु हा चित्तिं वागे
म्हणुनि वर हवा तो शीघ्र मागोनियां घे."

कुंती जोडुनि तें करास वदली विश्वंभरा आदरें,-
" घ्यावें मागुनियां वरास न मला इच्छा अशी श्रीहरे ,
येसी धांउनि संकटांत बघुनी आम्हां दयाळो त्वरें !
पाता तूं हरि ! काय बा मग कमी आम्हांस आहे बरें !
"आज्ञाधारक पुत्र पांच झटती आनंदवाया मला
पांचाली, भगिनी तुझी, मज अशा देवा ! स्नुषा निर्मला.

आहे सुंदर पौत्रवर्ग जरि या राहें अरण्यांत मी,
देवा पूर्ण कृपा तुझी मजवरी, मातें न कांहीं कमी !
" साधूंचा सहवास या वनिं मिळे, आनंद होतो मना,
कांहींही उरली खरोखर नसे माझी विभो ! कामना.
आज्ञा मान्य ह्मणोनि मागुनि असें घेतें दयांभोनिधे !
तूं देणार यदूत्तमा ! तरि सदा देवा ! विपत्काल दे ! "
कुंतिभाषण असें परिसून काय बोलत रमेश हंसूनः-
" याचिला मज पृथे ! वर काय इच्छिसी तरि किमर्थ अपाय ?
" अन्य घेइं वर मागुनि आतां तूं विचार करुनी सुखदाता;
माग, भीड न धरीं मनिं, तूर्ण-मी तुझ्या करिन हेतुस पूर्ण."
कुंती वदे मग तदा यदुनायकास
" म्यां याचिला वर विचार करून खास.
आश्चर्य यांत गमलें तुज सांग काय ?
दे या वरास मज यांत नसे अपाय.
" देवा ! नकोत मज ते दिन वैभवाचे
जे सोयरे मम मना गमती भवाचे;
संपत्ति मोहुनि करी सकलांस दास
तद्दास शून्यमति तो चढतो मदास.
" आम्हां स्थिती जर मिळेल अशी दयाला !
जाणें तुझ्या खचित अंतरलों पदाला !
संपत्तिमत्त बनल्यावरि पांडवां या
तूं दासभक्तिवश कां मिळसी पहाया ?
" शिव ! शिव ! शिव ! देवा, तो नको दुष्प्रसंग !
तव पदरति राहो शुद्ध आम्हां अभंग.
जवळ जर सख्या ! तूं राहसी वासुदेवा !
तरि सकल सुखाचा तुच्छ आम्हांस ठेवा.
" धन कनक नको तें, तें नको राज्य देवा !
सतत मज घडावी आपुली पादसेवा.

तव विरह नसो या श्रीहरे ! सेवकांस
तरि सदय रमेशा ! पात्र होऊं सुखास.
" कठिण समय येती मानवाच्या सुखातें,
म्हणुनि तरि विभो त्वन्नाम येतें मुखातें;
स्मरण घडतसे बा ! त्या निमित्तें मनाला,
बघुन विमल भक्ती पावसी तूं जनांला.
" म्हणुनि विनति माझी हीच देवा ! पदास
कठिण समय राहो या भक्तसेवकांस.
स्मरण तव घडोनी सर्वदाही मनाला
खचित मग न देवा ! पार अस्मत्सुखाला ! "

ऐकोनी भाषणा या, मृदुतर हरिच्या हर्ष झाला मनास.
बोले हांसून " कुंती ! असासि खचित गे धन्य तूं धन्य खास !
इच्छा होती तुझ्या या सकल सफल, मी दूर नाहीं तुम्हांस. '
देवोनी या वरातें यदुमुकुटमणी जाय तो स्वस्थलास.

——:०:——

## कृष्णाजी बाबाजी कुलकर्णी.

जन्म–इ. स. १८८०.

## वनदेवीचा वसंतोत्सव.

किती वसंतोत्सव मौजेचा हा वनदेवीचा !
मिळे पहाया दुजा न उत्सव ज्याच्या जोडीचा.

रमणीच्या अधरासम ज्यांला अति मोहक रंग
अशा किसलयें मंडित तरु हे करिती मन दंग.

किती शोभती विविधलता या नूतन पुष्पांनीं
या नव-मंडन-मंडित असती जणुं तन्वी तरुणी !

चहूंकडे किति दृढ वेष्टिति या वल्ली वृक्षांना
गाढालिंगन देती रमणी जणुं निज कांतांना !

परस्परांनां तरु आलिंगिति शाखा-हस्तांनीं
मित्र एकमेकांस भेटतीं जणुं बहु दिवसांनीं !
वृक्ष किती हे मोठे मोठे गगना आक्रमिती
वनदेवीचे मंगलकारक जणुं हे ध्वज असती !
किंवा वनदेवीच्या अनुपम जणुं ऐश्वर्याला
वर्णायाला ईर्ष्येनें हे जाती स्वर्गाला !
परोपरीच्या रंगाचीं हीं बहुत फुलें फुललीं
ज्यांच्या सद्गंधें सर्वहि वनभूमि भरुन गेली.
नानाविध पुष्पांनां बघतां गमे असें चित्तीं
वनदेवीचे अलंकार हे सुंदर जणुं असती.
किती उंच हा पुष्पांचा थर भूमीवर पडला
ही जणुं वनदेवी-सुमशय्या वाटे हृदयाला !
बहुविध पुष्पांच्या बघुनी या सुंदर रचनांस
या जणुं वनदेवी-रंगावलि, हा होई भास !
वनदेवीचा मृदुल गालिचा किंवा हा आहे,
अथवा वनदेवीनें केली सुंदर नकशी हे !
स्फटिकशुभ्र हा वननिर्झर किति मंद मंद वाहे-
वनदेवीच्या सुयशाचा हा प्रवाह जणुं आहे !
रजत-रसासम शुभ्र जयांचें जल ते कासार
बघतां वाटे हे जणुं असती वनदेवी-मुकुर !
हिमांबुकण हे सोज्वळ मुक्तां ऐसें दिसतात-
वनदेवी ज्यां धारण करिते अपुल्या कंठांत.
रसाल हे निज सुधामधुर-फलभारानें लवले
वैभव आलें असतां होता अधिकच नम्र भले.
आम्रफलांचा सुधास्वादु रस पिउनी आतृप्ति
मधुर पंचमस्वरांत कोकिळ हे मंजुळ गाती.
हे जणुं वर्णिति वनदेवीची प्रेमें सत्कीर्ति
ऐकोनी ज्या सुरस वर्णना रसिक मुदित होती.

वेणुवनीं हा वायु शिरोनी मंजुळ नाद करी
वनदेवी जणुं गाते वीणा घेऊनियां स्वकरीं !
गानलुब्ध मृग ऐकोनी जे अति मंजुळ गान
तटस्थ चित्रासम राहति निज विसरोनी भान !
अशा वैभवा सदा मानवा देई जो ईश
त्याला भावें स्मरतां मिळतें चिरसुख मनुजास.

——:०——

## सीताराम वासुदेव पेंडसे, बी. ए.

जन्म इ. स. १८८०

## आजवा-सरोवरावरील प्रातःकाळ.

[ बडोदे शहरापासून बारा मैलांवर एक विस्तीर्ण तलाव बांधिला आहे. त्याला आजवा अथवा सयाजीसरोवर असें नांव आहे. याच तलावाचें पाणी वडोदें शहरांत नळानें आणिलें आहे. या सरोवराचें स्थान अत्यंत रमणीय आहे.]

थोर **आजवा** वटोदराला पुरवी हा जीवन
असे कीं जनतेचें जीवन !
पाहुनियां गंभीर जलनिधी थकचि झालें मन
विस्मयें मति गेली गुंगुन.
अमित जलधि परि तटभिंतीनें ठेवियला बांधुन
बैसला स्तब्ध म्हणुनि होउन.
गुरुतटवलयानें बद्ध जरी होय तो
निजजीवनदानें जनजीवन रक्षितो,
निजजलविभवाचा मुक्त लाभ देइ तो;
स्वभावगुण हो ! साधुवरांचा केवळ जनरक्षण,
संत हे जनतेचें जीवन !
उषःकालिं या प्रदेशिं शांती राज्य चालवीतसे
तदाज्ञाभंग न लव होतसे;

मृदु पवनानें प्रतनुचि लहरी गुंजति मंजुस्वनें
  अनिल जणुं स्तब्धचि या गायनें;
गायनमोहें जलपृष्ठावरि पवन सुप्त भासती
  स्वप्नसुख जणुं ते उपभोगिती.
  ऱ्हदहृदयमंदिरीं शांतिमूर्ति राजते,
  मृदु पवनें हळु हळु नीरपृष्ठ हालतें,
  जणुं सुप्त शिशूचें ऊरचि हें स्पंदतें!
कौतुकमय ही शोभा पाहुनि सद्गदिताचि मन्मन
  हृदयिं ये प्रेमपूर लोटुन!
उषा भामिनी क्षणिं जागी करि पूर्वदिग्वधूस ती
  तीसह आलि सरोवरतटीं;
स्वागत द्याया निजरमणातें सज्ज ससखि जाहली
  शुभांगी तेथें क्षणिं पावली.
इतुक्यांताचि तो जनसुखमूर्ती सर्वसाक्षि उगवला
  प्रभूचा यशोराशि विलसला!
  येतांचि उषासखि स्वागत त्याचें करी,
  दृढ आलिंगी रवि करीं उषा सुंदरी,
  मग दिग्वधूस त्या क्षेम देइ सत्वरी;
क्षणार्धांत ती उषा जाहली रविमाजी तन्मय,
  सतीला पति हा सौख्याशय!
स्फटिकाविमलजलिं बालारुण तो प्रतिबिंबित शोभतो
  मुखश्री जलदर्पणिं पाहतो;
उषेनेंच कीं गगनश्रीला लावियला जो टिळा
  तोचि हा सूर्यमिषें विलसला!
अथवा सुंदर कनकहंस जो जलकेली करितसे
  तोचि रविबिंबमिषें लसतसे!
  आकाश सर्व तें रवितेजानें भरे,
  तद्बिंब ऱ्हदीं या विलसे बहु साजिरें,
  जणुं तेजाचा हा पूर लोटला खरें,

कनकरसाचा ऱ्हदीं जणूं त्या प्रवाह ये धांवुन
जाई जलामधें मिसळुन !
दिनकरकर ते जलपृष्ठावरि सत्वर मग पसरले
लहरिंसह नृत्य करूं लागले;
चंचलतेनें बनति तयांची सुवर्णवलयें किती!
सांखळ्या सोन्याच्या पसरती !
यापरि सुंदर अमित सांखळ्या ऱ्हदतनुला बांधिती
परी त्या तरंगभुज तोडिती.
या प्रमुदित लहरी सळ सळ सळ उसळती,
जणुं प्रमदा यौवनमदेंच या डोलती !
कीं जलदेवी या निजानंद दाविती !
आनंदाच्या लहरी मन्मनिं उचंबळुन दाटती-
जलाच्या लहरींसह मिसळती !
जिकडेतिकडे बालरवीचें तेज जाइ फांकुन
दिनागम देइ जगा सुचवुन;
प्रभातसमयीं प्रसन्न ऐशा उठुनि विहंगमगण
ऱ्हदजलीं स्नान घेति उरकुन;
मंजुळ सुंदर आलापांनीं गाती प्रभुचे गुण
करिति ते ईशकीर्तिकीर्तन !
या लता, तरू हे प्रफुल्लमुख डोलती,
भास्करा भक्तिनें सुमनांजलि अर्पिती,
सुप्रसन्न कमलें अर्घ्य रविस देत तीं,
सकल सृष्टि ही प्रमुदित होउन करिते सूर्यार्चन
सृष्टिचें साक्षात् रवि जीवन !
पैलतिरावरि गड ‡पावा हा पावनाद्रि विलसला
वाटे पुराण मुनि हा भला !

---

‡पावागड नांवाचा प्रसिद्ध डोंगर आजव्याच्या जवळ आहे.

विरल-पांडुरा-धूसर-तनु मुनि पद्मासनिं बैसला
ध्यानीं परेशरत जाहला;
शांत ऱ्हदाच्या हृदयामाजी तत्प्रतिमा निश्चला
तडागें हृदयिं धरुनि ठेविला !
ही गडशिखरींची वनराजी साजिरी,
निजमुखकांती ऱ्हदहृदयदर्पणांतरीं,
पाहोनी प्रमुदित होय बहुत अंतरीं;
बाह्यांग जसें विमल सराचें अंतरंगही तसें
साधुची वृत्ति समानचि असे.

एकिकडोनी *विश्वामित्री तटिनी ये धांवुनी
होई तन्मय आलिंगुनी
दुसरिकडोनी दुसरी सुंदर सरिता दुडदुड गती
भेटे प्रणयें जलधीप्रती,
ऱ्हदसरितांच्या संगमावरी तुषारां न त्या मिती
नद्या जणुं रौप्यचूर्ण उधळिती !
किति विविध चमत्कृति तुषार हे दाविती,
किति इंद्रधनुष्यें त्यांतुनि हो चमकती,
कीं प्रणयसंगमीं तोरणेंच फडकती !
चमत्कृतींनीं अनेक ऐशा तटप्रांत साजिरे
कौतुका मन्मनिं सीमा नुरे.

तटगत रुचिरा वनश्री जलीं यथार्थ ही उमटली
ऱ्हदें जणुं हृदयीं आलिंगिली !
जलफलकिं कुणीं चितारियानें चित्रें जणुं काढिलीं
सकल ती भूशोभा चित्रिली !
नयनमनोहर चित्रावलि अशि सभोंवार पसरली
बघुनि मम मति रंगलि, गुंगली.
हें चित्रमंदिराचि सुंदर कीं निर्मिलें !

---

*या नदीचें व दुसऱ्या एका नदीचें पाणी आडवून या तलावांत घेतलें आहे.

कीं केलिमंदिराचि जलदेवींचें खुले !
कीं विश्वेशाचें व्यक्त विभव विलसलें !
विश्वेशाचा अतर्क्य महिमा, अगाध लीलागुण
होती व्यक्त मना यांतुन.
परिमलमय हे सुखस्पर्श मृदु मंदानिल वाहती,
झुडुपें प्रसन्न तटिं डोलती;
तडागतीरीं तरुकांडांवरि निजकंडूलचि शिरें-
घांशिती पशू कितिक गांजिरे;
या कंपानें शिथिल तरूंचीं सुमनें गळतां किती
ह्रदा तरु सुमनीं जणुं पूजिती !
हीं ऱ्हदासभोंतीं कुरणें बहु पसरलीं,
गोधनें तयांमधि चरावया चाललीं,
गोपालबालकें वत्सांसह विलसलीं;
प्रसन्नता या ऱ्हदप्रांतिं अशि राहिलि हो सांचुन
यांतचि विश्वंभरदर्शन !

———:०:———

## दिनकर नानाजी शिंदे.

जन्म—इ. स. १८८२; मृत्यु—इं. स. १९१४.

[ हे कवि ' **इंदुकांत** ' या नांवानें प्रसिद्ध होते.]

### प्रदोषतारा.

प्रणयतारका ! गगनललामा ! विरहाकुलजनसुखैकधामा !
मंदपवनयुत मनोज्ञ कालीं, प्रदोषिं पाटल वियति विशालीं
राजसिं रुचिरप्रकाशशाली, करिसी प्रमदा प्रदीप्तकामा.
सागरतरंगतुषारशीतल, वीजित करि तो तुज मंदानिल
यशोगीत तव विहंग मंजुल, गाती सहर्ष, मंगलनामा !
आनंदप्रद तुझ्या दर्शनीं, करिती सुहास्य सुमनें भुवनीं

मधुर तयांचा सुगंध भरुनी, टाकी अवनिसि तैसें व्योमा.
एकलि भुवि तीं दिव्यसंनिभा! अस्तमानदिनकरसखया! बा!
तारामंडलिं तव अतुला भा, वितरी प्रमोद-शांति प्रेमां.
विजयध्वज तूं गमसी मजला, नभिं उत्तुंगीं स्वयें रोविला
मदनें जिंकुनि चराचराला, दावाया निज विश्वा महिमा!
वस्तुजात हें निखिलहि लोकीं, मग्न होतसे प्रणयविपाकीं
प्रसन्नवदना तुज रजनीमुखिं, निरखुनि अंबरिं, हृदयारामा!
मदनप्रतिनिधिवैभवशाली! अभ्युदयीं तव सुयोगकालीं
प्रियाऽलिंगनीं मरीचिमाली, होई सोत्सुक तशी त्रियामा.
दिनमणिरमणी संध्या स्वैरिणि, रागरंजिता पतिप्रयाणीं
करी विलासा तुजसह गगनीं, जैसी परनरनिरता रामा!
उपवनिं मंडितसुमतरुपुंजीं, मुखरितमिलिंदमंजुलगुंजीं,
कुसुमसुगंधित निभृत निकुंजीं, सकांत करिती विलास रामा!
मंगलतारावरावतंसा! विलोकुनी तुज विकसितभासा
दिवसवियोजित दयितनिवासा, येती उत्कंठित विश्रामा!
आम्रमंजरी त्यजुनी मधुरा, मधुकर सेवी प्रणयिन्यधरा—
परतुनि कोकिल कुंजकुटीरा, कांता रमवी मनोभिरामा.
मराल कोमल मृणाल टाकुनि, तोषवि दयिता प्रत्यागमनीं—
सुचिर वियुक्ता ज्योत्स्नारमणी, आलिंगी हिमकरा प्रसन्ना!
प्रणयीजनमधुसंगमघटका! मनोविकारां पातकात्मकां
नेउनि विलया तीव्रहि दुःखा, आनंदविसी अंतर्यामा.
प्रणयवती मम दयिता ललना, निकटिं असे जैं सुहास्यवदना
दीर्घकाल करिं नभीं विसलना, विनती तुज ही सहप्रणामा!

[२]

## विरहाकुल प्रियकरास प्रियेचें पत्र.

यदा वर्षर्तूचे कुदिन सखया! जाति निघुनी
अगस्तीचा तारा चमकत पुन्हां नील गगनीं,

शरत्सौंदर्यें हीं विकसित जईं होत अवनी–
 सुखें सेवूं तेव्हां प्रणय मधु आकंठ भुवनीं !
यदा स्वातीच्या त्या सरसहृदयीं मेघसलिला
 पिऊनीयां होई प्रमुदित पहा चातक भला,
सुहास्या कासारीं करि बघुनि इन्दू कुमुदिनी
 सुखें सेवूं तेव्हां प्रणयमधु आकंठ भुवनीं !
सुनीलाकाशीं जैं गलितजल ते मेघ फिरती
 निदाघीं बर्फाचें जलधिंत जणूं खंड तरती,
प्रसन्नास्या होती सकलहि दिशा अभ्रगमनीं
 सुखें सेवूं तेव्हां प्रणयमधु आकंठ भुवनीं !
दिनान्तीं प्राचीसी सुरधनु करी रंजित जई
 शरच्छ्रीचा लोकीं सुखद अवतार प्रकटवी,
यदा होती उत्कंठित मनिं नितांत प्रणयिनी
 सुखें सेवूं तेव्हां प्रणयमधु आकंठ भुवनीं !
यदा जायांसंगें वियति करि केली उडुपति
 सुधासेकें संजीवित करि पुन्हां ही वसुमती,
प्रमोद–प्रेमांहीं अवनि–गगनां टाकि भरुनी–
 सुखें सेवूं तेव्हां प्रणयमधु आकंठ भुवनीं !
त्यजोनी कालुष्या निजहृदयिंच्या क्षुब्ध तटिनी
 स्वकांता भेटाया जइं अभिसरे खेलगमनीं,
यदा हंसद्वंद्वें विहरति मुदें रम्य पुलिनीं–
 यदा प्रेमें चुंबी अनिल लतिका त्या कुसुमिता,
सरिद्वक्षीं नेई रजनि निजछंदें विहरता,
 दिगंतीं संचारे सुखद शिशिरामोद हरुनी–
सुखें सेवूं तेव्हां प्रणयमधु आकंठ भुवनीं !
 सुखें सेवूं तेव्हां प्रणयमधु आकंठ भुवनीं !
बनोनी सन्नद्ध स्फुटित सुमनांच्या प्रहरणीं
 निघे योद्धा चापी शर कुसुमधन्वा चढवुनी

जगातें जिंकाया प्रथम दसऱ्याच्या शुभदिनीं
सुखें सेवूं तेव्हां प्रणयमधु आकंठ भुवनीं !

[ ३ ]

## विच्छिन्न बकुलास-

बकुलविटपा ! उद्यानललामा ! हे सुरभिपादपवर ! तुजसमान नोहे;
अन्य तरु जो स्वर्गीय सुखां देई जगतिं रसिकांच्या अंतरासि मोही.
तुवां जीवित आपुलें मनोहारी वेंचियेलें जगिं चिर परोपकारीं,
विलोकूनी परि आजि छिन्न तूतें दुःख होई अति तीव्र मानसातें !
आत्मशीलां त्वां नित्य अनुसरीलें परी त्याचें साफल्य नाहिं झालें !
स्वार्थतत्पर नर अदय अकृतवेदी अहह ! तुजला आनंदकास छेदी !
स्वहिततत्परतायुगीं मनुज पाही परार्थासी मनिं परहिता न वाही;
आधिभौतिक अत्यल्प लाभिं तो कीं अन्यजीवितही तुच्छ सदा लेखी.
क्षणामाजीं विसरूनि जाइ सारी स्वार्थलोभीं नर उपकृतीहि भारी;
दया नैसर्गिक नष्ट सकल होई तयाठायीं नच उरे मनुजताहि !
तरुश्रेष्ठा ! तव धी असे उदारा करी पात्रापात्रि ती नच विचारा;
निखिल जगता तूं आत्मवत् पहासी सौख्यदानीं रत म्हणुनि अनिश होसी.
तुला कापट्यहि मुळिं न कधीं ठावें, मानवांचें मग कसें ओळखावें ?
जरी उपकृत त्यां करिसि बहुपरी तूं तोचि कालें तव होइ नाशहेतु !
' कुपात्रीं तें नच दान कधिं करावें, ' नियम लोकीं हा विहित देवदेवें;
करी उल्लंघन कोणि जरी त्याचें होइ घातुक तें त्वरित तया साचें.
खलीं केलें जरि बहु हितोपचारा करिति हितकारिं ते दारुणापकारा;
कुटिल उरगा मधु दुग्ध पाजियेलें बने असुहर विष तेंचि अचिरकालें !
सुप्रसिद्धा ही रीति जगन्मान्या तुवां गणियेली कदापि न, वदान्या !
म्हणुनि पडलासी घोर नाशपाकीं आजि खेळसि त्या दुर्गतिच्या अंकीं !
काय दूषण परि देऊनियां तूतें ? उचित होइ न तें किमपि अशरणातें;
पराधत्ताचि ना शकसि लोकिं तूं या नियति तैसी नरकृती नियंत्राया !

——:०:——

## दत्तात्रेय अनंत आपटे.

जन्म—इ. स. १८८२.

हे कवि '**अनंततनय**' या नांवानें प्रसिद्ध आहेत.

### पुष्प आणि मानवीजीवित.

मनोज्ञ नवपुष्पिता विकसिता सुरम्या लता
तसे सुतरु पाहिले उपवनांत आंदोलतां;
सुगंध पवनें किती विखुरिला सुखोद्दीपक
प्रफुल्ल मन जाहलें, करि जसा गृहा दीपक
समग्र गृहयातना विसरलों घडी एक मीं,
निसर्गवनदेवता-सदनिं सौख्य का ये कमी ?
असो, सहज पाहिलें गलितपुष्प मीं सुंदर,
करीं धरुनि हुंगिलें बहुत दावुनी आदर !
प्रमोदयुत मानसें सुमन लीलया पाहतां
विचार शतशा मनीं उभवले तदा तत्त्वतां,
तयें सु-मन वेढिलें जशि समस्त पृथ्वी तमीं
मुदें सकल गोंवितों सुरस वृत्त पृथ्वींत मी !
जनीं मनुजजन्म तो कुसुमसा मला भासतो,
विचार करितां मनीं अमित देइ लाभास तो;
सुपुष्प मुकुलस्थितींत असतां तदामोद कीं
मनोभ्रमर गुंगवी शिशु सा भुले मोदकीं.
तसा मनुज हर्षतो उपजतां गृहीं नंदन
असेल कुणि का असा कुमति जो गणी नंद न ?
हरीख परमावधी उमलतां कळीं होतसे,
वयांत नर येइ जों बहुत सौख्य दे हो तसें.
सुमा चुरडितां अशा नयनमोहका लागती
मनास चटके खरे चटचटा न त्याला गति !

तसा सहज नेतसे यम नरा मुळीं ना कळे
त्वदीय कृति केंवि भो ! अबल मंदधींनां कळे !
गमे सकल शून्य तें नर गतासु होतां तया
तदीय सुहृदां जनां लव सुचे न हो ! तातया !
दिसे न कधिं कीं पुन्हां मनुज तो जगाभीतरीं
अशाश्वतहि भासती सुम–मनुष्य ऐसे तरी !
सुरम्य कुसुमा ! तुझी रुचिरता विनाशी परी
सुगंध किति वेळसा वद टिकेल तैसा तरी ?
दिनैक दिन दोन वा मग सुकोनि कीं जाशिल,
पदच्युत करील वा चुरगळोनि कोणी खल !
प्रभू–चरणिं, वा शिरीं तनु समर्पिशी तूं जरी
तरीच तव धन्य वा उमलणें फुला ! भूवरी.
किती नव तृणांकुरें उपजती प्रतिप्रावृटीं
तपीं गळुनि बापुडीं, पडति पाहिं पृथ्वी–पुटीं !
तसे मनुज हो ! फुलासम तुम्ही गमा या जनीं
न धन्य जनु युष्मदीय शिणल्या वृथा या जनीं;
अशाश्वातच आयु हें धनसुतादि ते व्यर्थ कीं,
प्रभुत्व इहवस्तु या क्षर न लाविती सार्थकीं !
व्हावें जन्मुनि धन्य या क्षितितलीं ऐशी जरी कामना
जिव्हेनें हरि गाउनी निशिदिनीं ठेवा मनीं काम ना;
पूजा श्रीधर हस्तकीं, यदुपती नेत्रीं पहा सर्वदा,
श्रोत्रीं कृष्णकथा–सुधा पिउनियां प्रेमें भजा सर्व–दा !

[ २ ]

## फूल तें फूल !

तूं दहनभूमितिल पुष्प जयाला गणिसी
तें त्याज्य कसें तें सांग एकदां मजसी !
गुण अन्य फुलांचे यांत न का वद वसती ?
जे रसिकां भ्रमरां दास करोनी घेती !

नवनीत-मृदुल हें स्पर्शीं-नाहिं का ?
हा मोहक सौरभराशी-नाहिं का ?
हा आश्रय रसविभवासी-नाहिं का ?
हें अंतरंग वद भुलवीना कवणासी ?
वद हरी न नेत्रां कवणाच्या हृदयासी ?
सौवर्ण कोंदणीं रम्य हिरकणी दिसते
तशि लोह मुद्रिकेवर बसली नच खुलते;
सामान्य जनें निंदीली-ती जरी
पारखी उडी बघ घाली-तिजवरी !
चंद्रिका दिसे त्या गेली-ती खरी
तिमिरांत आपुलें तेजच दावायासी
नच निसर्गसिद्धा बाध कधींहि गुणांसी !
पाहूनि शुक्तिला मुक्ताफळ फेंकावें,
कीं पंक पाहुनी कमला सोडुनि जावें,
हें नसे वेड कां सांग-तूं मला
मम नको मानुं तूं राग-प्रेमला !
तूं उदार धरुनी वाग-वृत्तिला.
बा ! भारतपुत्रा ! भारतांत सुमनांसी
तूं कोठेंही बघ मान आपुलीं त्यांसी !

——:०:——

## गोविंद पांडुरंग देवधर, एम्. ए., एल्एल्. बी.

जन्म-इ. स. १८८३.

### वीणेस.

होई जागृत ! वीणे ! होई जागृत निजावयाचि न गे !-
ही वेळा, जधिं सारे खडबडुनी असति जाहले जागे.
निद्रा पुष्कळ झाली, करतब अपुलें अतां उठुनि दावीं,
जणें अंतःकरणें आर्यजनांचीं थरारुनी जावीं.

स्वर्गींची दिव्य सुधा पाजुनि तारांस मातवी, जेणें
जेव्हां त्या झणझणती, डोलावें शून्यचित्त शेषानें!
सर्पांसमान उतरति गिरिखालीं जे झरे, तयांवरती
टाकूनि मोहिनी निज थांबवि तेथेंच त्यांस गे सुदती!
त्यांच्या तीरीं सुंदर कुसुमें जीं डोलती, पिती पाणी,
निजगायनधारेंतिल पाजुनि जल त्यांस दिव्यता आणी.
हिरव्या घाट्या या ज्या हसती हर्षें, तयांस निज गीतें-
लावीं म्हणावयाला गभीर मधुर स्वरांत तूं दयिते!
तरुकुंजीं, गिरिगव्हरिं वेलीच्या सुबक, दाट जाळ्यांत
निजशब्दमोहिनीला नाचूं दे स्वैर मत्त मोदांत.
कलमंद्रतारसुस्वरजननी तूं होसि गे सखे! ललित.
गानप्रवाहिं तुझिया पोहे सारी वसुंधरा मुदित.
रसिकमनें उचमळती, पाझरती, गुंगती, लया जाती-
ध्वनिजालीं तव मंजुळ; वीणे! अद्भुत अशी तुझी शक्ति!
प्रातःकाळीं नाचति कुरणांवरि यक्षयक्षिणी जेव्हां,
चेतोहर तव वाणी भरुनी गगनास टाकिते तेव्हां.
केव्हां हलुहलु, केव्हां उच्चरवानें झणाणती तारा,
गिरक्या घेतां जैशा गतिनें ते मंद चपल वा गररा.
प्रियजनचित्तें फुलविसि, काढुनि निजबोल गोड सप्रेम,
स्वर्गींच्या अतुल सुखा देसी येथेंच त्यांस आणून.
काय तुझ्या वर्णावें अनुपम महिम्यास मानवीं आम्हीं?
आलें फळास संचित, म्हणुनिच ही मिळत देणगी नामी!
सारा दिवस थकोनी भागुनि येतां गृहास, विश्राम--
देसि नरा, तो तुजला मानी निज एकमात्र सुखधाम.
लोहहृदय मनुजासहि मार्दव आणावया असासि शक्त;
देसी नरांस सद्गुण ऐसेही नसति जे प्रकृतिदत्त.
नाहीं कर्ण असा जड जो न पिई घटघटां तुझें गान—
जीव नसे थंड असा जो घे ना पेट तूज ऐकून!

काळास दास केलें तूंच सखे गे ! प्रसंग पूर्वीचे-
अणुनि हुबेहुब डोळ्यांपुढतीं त्यां भासवीसि आतांचे.
अमुचे विश्रुत पूर्वज गेले करुनी कृतीहि ज्या दैवी,
त्यांची हृदयोत्तेजक अठवण देसी करुन तूं देवी !
यत्पूर्व दिव्य जागृत, आहे त्याला भविष्य रमणीय,
स्फुरतां तुझ्यांतुनि असा बोध, प्रस्तुत विपत्ति हो सह्य.
जी आशा व्यसनतमीं दावी वाटेस दीप होऊन,
जन्म तिचा वेल्हाळे वीणे ! आहे तुझ्याचपासून.
नवरस तेंविं दहावा शांत रसहि गे ! तुझे असति दास,
जोडुनि हात उभे नित तुज पुढतीं ऐकण्यास आज्ञेस.
तुजला ऐकुनि जेंवीं प्रियजननयनांत चंचला खेळे,
गात्रें कंपित होती, अनंग देहीं प्रमत्त आंदोळे;
तेंवी वीररमणिच्या नयनांतुनिही कृशानुकण पडती,
अंगरख्याचे बंदहि तुटति तटातट, सुबाहु फुरफुरती.
वीर्य शरीरीं खेळे वरचेवर जाय असिकडे हात,
रक्त सळसळे, वाटति त्या वेळीं कःपदार्थ यमदूत.
निघती करुणरसाचे बोल जधीं द्रवति तेहि पाषाण,
जल नयनीं नावरतें, हेलावति वृत्ति सर्व आंतून.
हे सर्वरसस्वामिनि ! वीणे ! माझें असो तुला नमन;
त्वद्‌गुणगायन करण्या असे समर्थ न मदीय हें कवन !

[ २ ]

## संध्याराग.

An evening of extraordinary splendour & beauty.

—*Wordsworth.*

मावळली हो असति भराभर सहसा जरि ही दीप्ति,
असति कदाचित् मूकमेघगर्गिं टाकिलि विस्मित दृष्टि;
आहे शक्ती परी तिच्यामधिं पाहा थांबायाची,
एका दिनावसाना तेंवी पवित्रता देण्याची;

जेणें निर्बल मानुषता ही बघण्या समर्थ होते–
 आहे कायच? नोहे, नोहे, होऊं काय शके तें।
होता काळहि जेव्हां गुंगति सुस्वर खाड्या शेतें,
 कुंजांतुनि जधिं उत्सुक किन्नर गाती संध्यागीतें;
ठाकुनि उंच स्थळांवरी वा, भू खालिं, वर स्वर्ग,
 दोघांनांही योग्य असेची आलापिति ते राग;—
विधी असा हा पवित्र सुंदर, वाटे मजला, फिरुनी
 केला आतां जरि ऐकेसा दरीडोंगरावरुनी,
उदात्त हर्षोन्माद, प्रीती शुद्ध न इतुकी प्रसवी,
 मूक दृश्य हें–द्युति ही–छाया–परम शांति ही जेंवी।

* * *

एकहि शब्द न ऐकू येइ, स्वरैक्य धीरोदात्त
 दरीमधें त्या, झाडीमाजिहि रिघुनी भरत नितांत.
विविधरत्नमय रंग देइ त्या जेथें जेथें पडत,
 स्फुरद्द्युतीचीं ऐशा अद्भुत शक्ती हळुहळु अणित.
दूरदूरल्या आकृति जवळी, दृष्टिस अतिशय विमल
 होती गोचर शैलनितम्बीं खिल्लारें तीं विपुल.
कृष्णसार बहुदीप्त दीसती, शेळ्यांचेही कळप
 सुवर्णमंडित झळकुनि दुरुनी शोभा देती अमुप.
रुचिर जांभळे संध्ये! आहे तवच घडी ही शांत!
 परी जोंवरी दिव्याशा मम जी वा संचारीत,
विश्वास कधीं होइ न मज कीं, केवळ तुझिच कृती ही!–
 रवि न संचरे जेथें तेथलि देणगि मिळविलि तूं ही;
असे पसरलें दिव्यश्रीचें मिश्रण होउनि ललित–
 अवनीवर या विहरति जीवर गाइवासरें मुदित!

* * *

भग्नग्रंथी अथवा अथवा अपकृति देती त्रास जयांनां,
 ऐसे कोणी जन जरि असती, दिसती तन्नयनांनां–

अंधुक हे गिरिनितंब पुढले सुप्रभ शिडिसे, चढण–
हवेंत सुंदर, थांबायाचें कुठें ?–न कळलें अजुन !
लोभविती मन चढण्या, मिळण्या अमर्त्य भूतांशींहि–
वाटे मजला पंख लागले माझ्या स्कंधां दोहीं !
बंदिवान परि इथें उभा मी, सुप्रभ सोपानांला
पाहें आत्रिदशालय उठविति अपुल्या साध्य पथाला.
या, या पुढतीं शिथिल जनांनों ! चोहों बाजू पाहा,
जाणें आहे जेथें सुंदर त्या या देशा पाहा.
आणी असेल पथिक कुणी जर पथश्रमें थकलेला,
दुपारपासुन तृणाच्छादिता भूमीवर निजलेला,
तुम्ही भूतहो ! जवें जिथें जा, तो घे जिथें विसावा,
मृदुल रीतिनें ऐशा त्यासी जागा करा किं, व्हावा–
स्वरसंवाद प्रियतम त्याच्या जीवाचा देणगिशीं
सर्वेशें जी दिधलि असे या दिव्य मनोहर घडिसी !

* * *

स्वर्कुंभांतिल रंग असे हे माझ्या दृष्टी पुढतीं
प्रभातिं विकसत, जेव्हां सौख्यद शैशविं विहार करिती.
दिव्यद्युतिची झुळूक पुनरपि कशास ही मज दिसत ?
नोहे नोहे, कृतज्ञतेनें वदणें तुजला युक्त.
कारण राहिलि होती जरि त्या दिव्य द्युतिची खूण,
केवळ माझ्या स्वप्निंच होती तीहो, दुजी कुठें न.
भीमबला ! तव सेवा करिती स्वास्थ्य शांतता जितुकी,
सृष्टीची ही हांक भयंकर सेवित तुजला तितुकी.
असत निवड मम अयोग्य जरि, तुजविरुद्ध अथवा जाई,
त्या बहुशोचित नष्टद्युतिची अठवण सदया देई.
जी या क्षणिं मम जाग्रद्दृष्टिस लखाखतांना भासे,
महिस जखडला जीव मम जरी, द्वितीय जन्में हर्षे ?
झालें–जाई, मनःसृष्टिमय दीप्तीचा लय होई;
आणी रजनी अपुल्या छाया घेउनि जवळी येई.

[ ३ ]

## गवत.

नग्न धरेला नेसायाला   आणित हिरव्यागार शालुला;
किसलय कुसुमां लोळायाला   पसरीं सुंदर मृदु शय्येला;
घडतां माझा स्पर्श सुखावह,   होती त्यांचे पुलकित देह;
आनंदें मग वायुसंगतीं   हर्षें नाचति मत्तनुवरती.
पाहुनि मजला गाइवासरें   हर्षति, गाती रुचिर पांखरें;
त्यांच्या संगति मीहि गुणगुणें;   ऐकुं न शकती मर्त्यश्रवणें.
ओढ्याला गुदगुल्या करुनी,   नाचवि, हंसवीं खदाखदा मी;
धांवे सुटण्या जेथें तेथें   परि मी त्याची पाठ पुरवितें !
वारा रिपु जधिं दृष्टी पडत,   हृदयसिंधु मम खवळुनि जात;
शांत कराया मजसि पुरंदर   वृष्टि करी मत्क्षुब्धतनूवर;
वरचेवर परि सारे जलकण   एकिकडे मी देत झुगारुन !
असे असा मम राग वाइट,   थोर कीर्ति जरि लहान मूर्त
तालवृक्षीं मद्ध्वजा फडफडे,   गुहागुहांतुनि झडति चौघडे,
विंझणवारा गलितगर्व करि,   वंशरंध्रिं मधुमधुर सुर धरी;
खगरूपांनां घेऊनि सुंदर   गाती इंद्रप्रेषित किन्नर
अखिल सृष्टिचा नृप मी मिरवें,   सेवक माझे पांचीं तत्त्वें !
हर्षें चढुनी पर्वतशिखरीं   कवळीं गगनाला मी स्वकरीं.
गगन कोणतें ? गवत कोणतें ?   कळे न कोणा मिळतों जेथें !
बसुनि टेंकड्यांवरी निवांत   ऊन्ह खातसें मी उल्हसित-
कडेकडेनें रुचिर नदीच्या,   तेंवी पांशुल रुक्ष पथाच्या.
थरथरणाऱ्या मृदु देहीं मम   पंख आपुलें पिवळे उभवुन
जधिं फुलपांखरुं येऊनि बसत,   बालरवीतें, नभ मी गमत !
चोंहिकडें मी मग पाहात   गर्वें, वाटे तुच्छ समस्त;
रविहि बघुनी हें दृश्य सुरेख   लज्जित झांकी अभ्रीं स्वमुख ?
यक्षयक्षिणी नाचुन झालीं   प्रभामंडलें जींहि सकाळीं
माझ्या सुंदर देहावरती   त्यांच्या भोंतीं भ्रमर गुंजती;

जिकडेतिकडे दंवबिंदूंतुन इंद्रधनुष्यें असंख्य झळकुन
सुंदर सुंदर नानावर्णी टाकिति माझी तनु झांकोनी.
दिसे जयाचा तळही स्पष्ट जेथें हंसती कमलें हृष्ट,
ऐशा हीरकसरा मनोरम सुबक पाचुचें बसवीं कोंदण;
स्वर्ग स्रवतो ज्योत्स्ना सुषम, करिती तारागोल गायन;
दिव्य बोल ते ऐकत ऐकत झोंप लागते मजसी सौख्यद !
जननी जगती, जनक जीवन, हळुहळु माझें होय वर्धन;
मोहक माझें स्वरूप बघुन जाई सारें विश्व रंगुन;
धनिक निर्धनां सौख्य एकसें देई, द्वैत न मच्चित्तिं वसे;
बालकगण जधिं सुखें बागडे देहीं मम, मज फार आवडे.
रोग झळंबे म्हणिं रोगाला, दुष्काळच ये दुष्काळाला !
दुःखी होउनि दुःख लोपतें, जरा होउनी जर्जर पळते !
दर्शन माझें होतांच शुभ जाई बारा वाटा अशुभ !
अद्भुत शक्ती अशी मदीय ! दुसऱ्याची अशि आहे काय ?
पूर्वदिशेला फुटत तांबडें, भूपाळ्यांचे देत जधिं धडे
मधुर वाणिनें सृष्टिखगांनां, ब्रम्हसुता करिं घेउनि वीणा-
ईशस्तव करि, अमर समस्त मिळुनि साथ तिज जेव्हां देत,
मीहि भक्तिनें प्रभुस आळवीं, यन्निर्देशें जगा भूषवीं !
मुरकत मुरकत, हांसत, रांगत हळूहळु येते मी मुदित !

——:•:——

## दत्तात्रेय भिमाजी रणदिवे.

जन्म इ. स. १८८३

### कां घेतिस आढेवेढे ?

चल ये वेडे !—कां घेतिस आढेवेढे ?
पसरी गगनीं मेघ पसारा,
व्यापि तिमिर भूलोकहि सारा,
सोसाट्याचा सुटला वारा,

बीज कडाडे !–कां घेतिस आढेवेढे ?
क्षणांत बघ जलधारा गळतिल,
रुक्ष माळरानें हिरवळतिल,
दग्ध वेलिंसह तीं पालवतिल–
वठलीं झाडें !–कां घेतिस आढेवेढे ?
कशानेंहि जे पाझरलेले
निजनयनांला कधीं न दिसले
तेही फत्तर होतिल ओले–
मोठे जाडे !– कां घेतिस आढेवेढे ?
या अभिनव जीवनकार्यांचें
आश्चर्यांतिल आश्चर्यांचें
सृष्टीच्या अद्‌भुत जादूचें–
सोडवीं कोडें !–कां घेतिस आढेवेढे ?
चैन न वाटे तुजविण मज पळ,
होउनि गेलों केवळ हतबळ,
प्रतिक्षणीं हृदयाची तळमळ–
सारखी वाढे !–कां घेतिस आढेवेढे ?
ये–ये–माझे जादुगारिणी !
तुझीहि दाखव अद्‌भुत करणी
दृक्पातें चल टाक करोनी–
विश्व हें वेडें !–कां घेतिस आढेवेढे ?
अलंकार कुरुपांची ढाल !
कशास ती तुज व्हावी बोल ?
पुरे शब्दजालांचे फोल–
घोटणें पाढे ! –कां घेतिस आढेवेढे ?
काढ एकदां तव मधु बोल
दे विश्वाच्या हृदया डोल !
प्रेमरसाचे रानोमाळ–
खळाळवि ओढे !–कां घेतिस आढेवेढे ?

[ २ ]

## विरहाकुल राजीमतीचे उद्गार.

[ जैनधर्मांतील २२ वे तीर्थंकर नेमिनाथ, कृष्णाचे चुलत बंधु, यांनीं स्वस्त्री राजीमतीचा त्याग करून दीक्षा घेतली त्या वेळीं विरहावस्थेंत सती राजीमतीनें काढलेले उद्गार खालील काव्यांत गोंवले आहेत. ]

स्वातीं-पयोद चिरवांछित चातकाला
जों द्यावया न लवला नव जीवनाला--
तों ने तया पवन अन्य दिशे विलोकीं
हा हंत! हा किति विधिक्रम वक्र लोकीं!
जो जाहला प्रिय निरंतर मन्मनाला,
ज्याच्यासवें सुखदशा नृप-वैभवाला-
भोगोनिया चिर करीन विलास-लीला
ऐशी मना सुखवि नित्य विचार-माला;—
तो यादवाग्रणि कुठें प्रिय नेमिनाथ
गेला मला त्यजुनियां विरहानलांत?
भाजे मदंग, निशि झोंप न अल्प येते,
ती रम्य मूर्ति नयनांपुढुनी न जाते!
प्रासाद रम्य विभवें कमलागृहाला
आणी उणेंपण, उणें नच सेवकांला;
स्वर्लोकतुल्य सुखसाधनवृंद जेथें
भासे स्मशानसम गेह पतीविणें तें!
नाना लता विटपयुक्त मनोभिराम
आरामवास लव दे न मना विराम;
आलाप सांगति जणों मज कोकिलांचे
'कांताविणें विफल जीवित बायकांचें!'
जेव्हां शशांक निशिला उदयास येई,
प्रेमें निजप्रियसखीस महीस देई-

आलिंगना निजकरीं, सुख तें तयांचें
   मन्मानसीं प्रखर शल्य मनास जाचे !
वाटे सखीजनविनोद मना न गोड,
   तें आइचें वचन गोड न ज्यास जोड–
आतां मुळीं सुखवितें नच मानसास;
   नाहींच औषध जगीं विरहामयास !
सोडोनियां अतुलशा नृपवैभवास
   मातापिता परिजनांसह गेहवास
जी भामिनी तुज गणी सुख सर्व तीस–
   सोडोति कां तुज रुचे तरि शैलवास ?
नाथा ! तपें, अनशनें, प्रखरातपानें,
   गारा अघोर पतनें, घनवर्षणानें
तेंवी प्रचंड पवनें, निशिला हिमानें,
   हो काय मुक्त वसनें तनुचें न जाणें ?
जेव्हां निशीं तम करी निजरूप व्यक्त
   भेसूर घूकरव गोठवि सर्व रक्त !
एकाकि घोर वनिं हिंस्र पशू सभोंते
   ऐशा तुला स्मरुनि मानस दग्ध होतें !
या एकनिष्ठदयितानयनाश्रुपातें
   येई न का द्रव तुझ्या लव मानसातें ?
हा हंत ! मन्मथशरानलतप्तकाया -
   जाया गमे उचित कां तुज ही त्यजाया ?
केलें समर्पण जिनें निजजीवितातें–
   तूतें, त्यजोनि विरहानलिं हाय ! तीतें–
घ्यायास जाशि सुख शाश्वत आपणाला,
   तो स्वार्थ थोर, वदती बुध मोक्ष ज्याला !
इच्छीतसे हृदय हें परिरंभणातें
   कांता तुझ्या मृदुलशा करबंधनातें;

---

झाले समुत्सुक तुझ्या मुखदर्शनातें-
मन्नेत्र, कर्ण वचनामृत-सेवनातें !
गेलें लया सुख मनोरथ भग्न झाले !
मन्मानसोत्पल तसें करपोनि गेलें !
हें विश्व शून्य गमतें, सदन स्मशान !
भोग प्रभोगद, हलाहलतुल्य अन्न !
हें भारभूत मम जीवित होय पाहीं !
नाहीं मला सुखद या जगतांत कांहीं !
त्वन्मूर्ति जी ठसविली मम शुद्ध देहीं,
काढीं न तूं चिर जरी बनसी विदेही !

[ ३ ]

## ऐहिक नश्वरता !

जो झाला नच कालभक्ष्य जगतीं प्राणी असा कोणता ?
मृत्यूपासुनि सोडि कोण असला आप्तेष्ट वा जाणता ?
तोडायास समर्थ कोण जगतीं पाशा यमाच्या बरें ?
देई कोण सुमित्र जीवन पुन्हां आयुष्य जेव्हां सरे ?
बैसायास विमान वाहन जयां, आकाश हें मोकळें-
स्वच्छंदें फिरण्या, कधीं न जळती चिंतानिराशानळें,
घ्याया विश्रम नंदनोपवन तें, प्याया जयांनां सुधा
कांतालिंगनचुंबनादि बहुधा व्यापार ज्यांचे सदा,-
होती ते निमिषांत नष्ट सुरही ऐशा सुखापासुनी
जेव्हां काल कराल खड्ग पडतें मानेवरी येउनी !
नाहीं होत समर्थ एक पलही बांचावया तो बरें
कालव्याघ्रमुखीं सुरेशहि पडे होवोनियां गाय रे !
होते विश्व समर्थ दग्ध करण्या आत्मप्रकोपेक्षणीं
ते तेजस्वि तपोनिधीहि पडले जावोनि कालाननीं !
केलें ज्या निजबाहुनें प्रबलशा, निर्वीर भूमीतला,
तो राजेश्वरबाहु हाय ! पडला कालापुढें रे लुला !

ज्यांच्या रम्य पवित्र निर्मल कथा अद्यापिही ऐकुनी
धन्योद्गार मुखांतुनी सहज ये प्रेमाश्रुही लोचनीं,
ते न्यायी नृप, संत, धर्मजनिते, देशार्थसंपादक,
झाले काय न कालभक्ष्य सगळे ते सद्यशोधारक!
आहे यांतिल सार हेंच मनुजा! ये वस्तु जन्मास जें
तें पावे लय, सर्व भक्ष्य म्हणती तें सत्य कालास जें!
न स्थान, स्थिति, नीति, रीति, गुण वा सत्कर्म ऐसें कुठें
ज्याची आश्रयभूत वस्तु न कधीं कालप्रहारें फुटे!
वाया या गमजा कशास मनुजा! तूं चालवीशी तरी?
आयुष्यक्षयछिद्रयुक्त असतां ही देहरूपी तरी!
होई सावध, मोहजन्य विफला सोडीं दुराशा दुरी,
जों गेलासि न कालमत्स्यवदनीं संसारसिंधूदरीं!

———:•:———

## 'सिंधुसुता.'

जन्म–इ. स. १८८३.

### शिशुवात्सल्य.

अहा माझें सोनें कितितरि पहा सुंदर दिसे!
कसें खेळे नाचे वरिवरि मला पाहुनि हंसे!
विकासानें भासे नवकमल हें तेंवि वदन,
हंसे तेव्हां भासे चमकति हिरे शुभ्र रदन!
करी भारी चेष्टा दुडदुड पळे अंगणभरी,
अशा नाना लीला बघुनि मनिं ये प्रेमलहरि!
वदे लाडेंलाडें मृदुतर सुधातुल्य वचन
सदा होतें माझें परिसुनि तया हर्षित मन.
अहा! या बाळाची तनु कितितरी कोमल असे,
बसे प्रेमें अंकीं मृदु रुचिरसें पुष्प विलसे!
सुपुत्राच्या वासें सदन गमतें स्वर्भुवनसें,
अपत्याभावानें सुखसदनही होय वनसें!

रमाकांता ! आतां सविनय तुझ्मा जोडुनि करां
करीं विज्ञप्ती मी मम शिशु शताब्दायुषि करा;
जरी मी अज्ञत्वें ‘ मम सुत ’ असें बोलत असें-
तरी त्राता माता तुजविण तया अन्य न दिसे !
सदा विद्या देवी वरद तनयातें मम असो,
सदिच्छा ज्ञानार्थी अभिरुचिहि काव्यामृतिं वसो;
स्वदेशोत्कर्षार्थ स्वतनुधनमानादि विसरो,
प्रभो सत्कीर्तीचा परिमल दिगंतींहि पसरो.
अनाथां पाहोनी हृदय करुणेनें कळवळो,
छळाया दीनांसी कधिं नच तयाचें मन वळो,
दयाळा ! बाळाच्या हृदयकमलीं त्वपद बसो,
तुझ्या नामाची त्या पळभरहि बा ! विस्मृति नसो !
सदा भावें गावें वदनिं तुझिया निर्मल गुणां,
भजावें पूजावें निशिदिनिं तुझ्या पूज्य चरणां;
क्षमा शांती चित्तीं विनयनयनीतीधृति दया
न हो काम क्रोधां वश मन तयाचेंहि सदया !
महंता संतांचीं चरणकमलें वंदिल शिरीं
सुबुद्धी द्या ऐशी विनवित तुम्हां मी बहुपरी
अनाथांच्या नाथा ! जनतिमिरविध्वंसन करा,
वरा मागें, लागें चरणिं तुमच्या जोडुनि करां.
मागे, मी हें बहुत ह्मणुनी अंतरीं कोपशील,
आहे मातें विदित परि हें थोर तूं शांतशील !
औदार्याचा उदधि असती, जाणसी सर्वही तूं,
का माझे हे करिशिल न तूं पूर्ण अत्यल्प हेतु ?

[ २ ]

## वसंतागम.

वसंत ऋतु हा संताचि वाटे आज गृहा आला,
सुदिन कल्पिती जीवमात्र हे या मंगलकाला.

मूक वनस्पति असति तरी या मुदित किती दिसती,
टवटवीत पल्लवीं मनींचे व्यक्त भाव करिती.
वसंत आला आज आमुच्या प्रिय राष्ट्रोद्यानीं,
मंगलमय जो भाविकाल कथि सकलांच्या कानीं.
शिशिरऋतूच्या खरतर वातें तरुवर जे वठले,
नवजीवनमय अंकुर ज्यानां जोरदार फुटले.
अज्ञ स्थितिंतुनि मुक्त जाहल्या सुशिक्षणें युवती,
त्याच जणुं लतारूपें ऋतुचें स्वागत मधु करिती !
ज्ञानरवींचे किरण लागतां कवनरूप सुमनें
त्यांच्या हृदयांतून विकसती, जीं हरिती सु-मनें.
हेमंताच्या हिमनिवारणीं जुनीं पुराणीं तीं
पांघरलेलीं वस्त्रें न कुणां सहसा सोडवती.
ठिगळें लावुनि पुराण शास्त्रें वस्त्रें रूढींचीं
गुरफटुनीं जन बसले अजवरि परि आतां कैचीं !
अभिनव दृष्टी, अभिनवसृष्टिहि, अभिनवता भरली,
जिकडे तिकडे नव तेजाची मूर्तिच अवतरली !
सुविचारांचा मोहर फुटला रम्य तरुवरांनां,
सुसंस्कृतीला आम्रमंजिरी करिती वर माना !
फलें अमृतमय मधुर खास तीं अल्प काल जातां
भरतभूमिच्या प्रिय बाळांच्या लागतील हातां
वसंतसख जो कोकिल त्याच्या सहवासें मजही
वसंतागमा वर्णायाते स्फूर्ति सहज होई

———:०:———

## 'गोविंदाग्रज.'

जन्म इ. स. १८८५. मृत्यु इ. स. १९२०.

### 'राजहंस माझा निजला !'—

हें कोण बोललें बोला !—
'राजहंस माझा निजला !'

दुर्दैवनगाच्या शिखरीं नवाविधवा दुःखी आई,
तें हृदय कसें आईचें, मी उगाच सांगत नाहीं !
जें आनंदेंही रडतें, दुःखांत कसें तें होई-
हें कुणीं कुणां सांगावें !
आईच्या बाळा ठावें !
प्रेमाच्या गांवा जावें-
मग ऐकावें या बोला-'राजहंस माझा निजला!'
मांडीवर मेलें मूल, तों हृदया धक्का बसला !
होउनी कळस शोकाचा भ्रम तिच्या मानसीं बसला;
मग हृदय बाधिरची झालें अति दुःख थिजवि चित्ताला !
तें तिच्या जिवाचें फूल ?
मांडीवर होत मलूल !
तरि शोकें पडुनी भूल-
वाटतची होतें तिजला-'राजहंस माझा निजला !'
जन चार भोंवतीं जमले मृत बाळा उचलायाला;
तों काळ नाथनिधनाचा हतभागि मना आठवला;
तो प्रसंग पहिला तसला, हा दुसरा आतां असला !
तें चित्र दिसे चित्ताला,
हें चित्र दिसे डोळ्यांला,
निजचित्र चित्तनयनांला !
मग रडुनि वदे ती सकलां-'राजहंस माझा निजला !'
"करुं नका गलबला अगदीं, लागली झोंप मम बाळा !
आधींच झोंप त्या नाहीं, खेळाचा एकच चाळा !
जागतांच वाऱ्यासरसा खेळाचा घेइल आळा !
वाजवूं नका पाऊल !
लागेल तया चाहूल !
झोंपेचा हलका फूल !
मग झोंपायचा कुठला-राजहंस माझा निजला !
"हें दूध जरासा प्याला आतांसा कोठें निजला !

डोळ्याला लागे डोळा-कां तोंच भोंवतीं जमलां ?
जा!-नका उठवुं वेल्हाळा मी ओळखतें हो सकळां!
तो हिराच तेव्हां नेला!
हिरकणीस आतां टपला!
परि जिवापालिकडे याला—
लपवीन! एकची मजला! राजहंस माझा निजला!
"कां असलें भलतेंसलतें बोलतां अमंगळ त्याला?
छबकड्यावरुनि माझ्या या ओंवाळुनि टाकिन सकलां!
घेतें मी पदराखालीं पाहूंच नका लडिवाळा!
मी गरीब कितिही असलें
जरि कपाळ माझें फुटलें!
बोलणें तरी हें असलें—
खपणार नाहि हो मजला! राजहंस माझा निजला!
"हें असेंच सांगुनि मागें नेलांत जिवाचा राजा!
दाखविलाहि फिरुनी नाहीं, नाहिंत का तुम्हां लाजा?
न्यावयास आतां आला राजहंस राजस माझा!
हा असा कसा दुष्टावा?
कोणत्या जन्मिचा दावा?
कां उगिच गळा कापावा—
पांहुनी गरिब कोणाला! राजहंस माझा निजला!
"हे काळे कुरळे केश! खेळतात डोक्यावरती,
ही दृष्टि पहा, मम वदनीं-नेहमीं अशी ही असती!
हें तेज अशा रत्नाचें-झालें का आहे कमती?
कानांत नाचती डूल,
तोंडावर हंसरें फूल,
जीवाची घालुनि झूल—
मी असाच झांकिन याला! राजहंस माझा निजला!
"या अर्ध्या उघड्या नयनीं बाळ काय पाहत नाहीं?
या अर्ध्या मिटल्या तोंडीं बाळ काय बोलत नाहीं?

अर्थ या अशा हंसण्याचा मज माझा कळतो बाई !
हें हंसें मुखावर नाचे !
जणुं बोल दुग्धपानाचे !
कीं मुक्या समाधानाचे !
इतुकेंहि कळे न कुणाला--राजहंस माझा निजला !
" या माझ्या मानससरसीं सारखें प्रेमजल वाही !
या तरंगलहरींवरती राजहंस पोहत राही !
सारखा पोहुनी दमला, मग मला भुकेला बाही !
नयनांच्या शिंपांमधुनी
अश्रूंचे मौक्तिकसुमणि
मीं दिले तया काढोनी,
मोत्यांचा चारा असला राजहंस खाउनि निजला !
" ते वैकुंठेश्वर गेले पदिं त्यांच्या अर्पायाला–
ही अखंड या अश्रूंची वैजयंति मोहनमाळा
मी करित असें केव्हांची धरुनियां उराशीं बाळा !
कौस्तुभ हा माळेमधला !
हृदयाचें कोंदण याला !
तो चोराया का आलां ?
दैत्याहुनि दैत्यचि झालां ! राजहंस माझा निजला !
" हें असें जाहलें म्हणतां, तरि देवचि निजला काहो ?
जरि निर्दय होउनि निजला आळवीन फोडुनि टाहो !
कीं असा पोटचा गोळा पोटांतचि देवा राहो !
ही कुऱ्हाड आकाशाची
मजवरती पाडायाची–
नाहींच कल्पना त्याची,
हा तुमचा कावा सगळा ! राजहंस माझा निजला !
" जरि दूत यमाचे आले लाडक्यास या न्यायाला–
ते निष्ठुर असले तरिहा भुलतील पाहुनि याला !
हृदयाचें होउनि पाणी लागतील चुंबायाला !

मी मुका असा घेतांना–
हा पहा–पुन्हां हंसलाना !
कां अशा फिरवितां माना ?

सुख खुपे काय डोळ्यांला ? राजहंस माझा निजला !
" हें सर्वस्वाचें फूल त्याभंवतीं आलां गोळा,
मी बघतें–कधिंचा आहे त्यावरती तुमचा डोळा !
एकदां करावा त्याचा वादानें चोळामोळा–

सर्वांच्या मनिंचा लाहो
हाच ना ? स्पष्ट बोला हो !
मी इतकी वेडी का हो–

कीं हेंहि कळेना मजला–राजहंस माझा निजला !
" जरि होउं नये तें झालें–तरि सोडणार या नाहीं !
पाळणाहि रुततो ज्याला प्रेमें जरि निजवी आई !
तो देह खांच दगडांत–छेः ! नको नकोग बाई !

हृदयाची खणुनी खांच,
झांकिन मी बाळ असाच,
. दुःखांचे फत्तर साच !

जा ! जाउनि सांगा काळा–राजहंस माझा निजला !
" जरि काळाचाही काळ बाळाला न्याया आला–
तरि नाहीं मी द्यायाची या जीवाच्या जीवाला !
सारखीं गाउनी गाणीं निजवीन कल्पवर याला !

जा !–करा आपुलें काळें !
माझेही दमले डोळे !
प्राणांचें पसरुनि जाळें–

मी निजतें घेउनि याला ! राजहंस माझा निजला ! "

*  *  *

सांगुनी असें सकलांसी मृत बाळ उराशीं धरुनी
तन्मुखीं स्वमुख ठेवोनी चुंबिलें एकदां फिरुनी,

पाहिलें नीट निरखोनी झणिं तीही गेली निजुनी !
मग पुन्हां कधीं ती उठली,
जाणीव कुणा ही कुठली !
परि मति या प्रश्नें हटली–
बोलेल कोण या बोला–‘ राजहंस माझा निजला ! ’
मग मातापुत्रांवरि त्या तरु गाळिति कोमल पानें
ढाळिती लता निज सुमनें, पशुपक्षिहि रडती गानें !
दशदिशा दगडही कढती–मन दुभंगुनी शोकानें !
दुमदुमतें स्थळ तें अजुनी
त्या एकच करुणागानीं,
जा जाउनि ऐका कानीं !
ऐकाल याच बोलाला:—
‘ राजहंस माझा निजला ! ’

[ २ ]

## अल्लड प्रेमास.

क्षणभर वेडया प्रेमा थांब !
अधिर मनासह जासी कोठें ?
चुकशिल संकटिं पडशिल वाटे,
जग हें सारें बारे खोटें !
हृदया सोडुनि, गडया म्हणोनी, जाइं न कोठें लांब !
क्षणीं पांढरा, क्षणींच काळा,
रंग आवडे असा जगाला,
ठाव तयाचा कुणा न कळला !
खुळ्या तुलाची, अशा जगाची, कळेल का कृति सांग ?
जग सगळें हें देखाव्याचें !
गुलाम केवळ रे स्वार्थाचें !
स्मशान कीं हें शुद्धत्वाचें !
शुद्ध भाबडें, सरळ रोकडें, अशांत करिशिल काय ?

प्रेमा येथें शपथ लागते !
प्रासावांचुनि कविता अडते !
कर्त्यावांचुनि कार्यहि घडतें !
देव बिचारा, तया न थारा, तुझी कथा मग काय ?
तुझ्यासारखा तुला सोबती–
मिळेल का या अफाट जगतीं ?–
–संकुचितहि हें अफाट जरि अति–
आणी न मना, अशी कल्पना, अगदीं भोळा सांब !
कोणी तुजला मानिल खोटें,
तिरस्कारही दिसेल कोठें,
अपमानाचेंही भय मोठें,
बाग जगाची, ही न फुलांची, कांटे जागोजाग !
टाकिल कुणि तुज धिक्कारानें,
रडविल किंवा उपहासानें
फसविल नकली कीं मालानें,
कोणी भटकत, उगाच रखडत, फिरविल मागोमाग !
म्हणुनि लाडक्या ! कुठें न जाई,
या हृदयांतचि लपुनी राहीं,
योग्य मित्र नच सुख तरि नाहीं !
कुसंगतीहुनि, वेडया ! मानीं, फार बरा एकांत !

[ ३ ]

## बागेंत बागडणाऱ्या लाडक्या लहानग्यास.

थांब जरासा बाळ !
सुंदर खाशा प्रभातकाळीं
चहूंकडे हीं फुलें उमललीं,
बाग हांसते वाटे सगळी,
शीतल वारा, या जलधारा कारंज्याच्या छान !

रम्य तडागीं निर्मळ पाणी,
गाति पाखरें गोजिरवाणीं,
आनंदाचीं बसलीं ठाणीं
खरें असे रे, तरी नकोरे, मारुं लाडक्या धांव !

पाहुनि सौख्याचा हा ठेवा
सृष्टि करीलचि माझा हेवा !
माझ्यापासुनि फसवुनि न्यावा-
यत्न परोपरि, करितिल सारीं, भुलशिल तूं लडिवाळ !

तऱ्हेतऱ्हेचीं फुलें विकसलीं
रंगीबेरंगी हीं सगळीं
तूंही शिरतां त्यांच्या मेळीं-
माझें मग तें फूल कोणतें, कसें ओळखूं सांग ?

बघ सुटला हा मोठा वारा,
वायुवृत्ति तव देहहि सारा,
उडवुनि नेइल तुला भरारां-
दिगंतराला, जातां बाळा, पुन्हां कसा मिळणार !

स्वच्छ तडागीं प्रतिबिंबातें
पाहुनि वेड्या ! धरावयातें
चुकुनी जाशिल पाताळातें !
तयासारखा, क्षणीं पारखा, होशिल बा आम्हांस !

किती बुडबुडे पाण्यावरतीं
इकडुन तिकडे तरंगताती
चंचल लहरी, तूं त्यां सांथी,
क्षणांत बारे, लपाल सारे, काळाच्या उदरांत !

फूलपांखरें हीं स्वच्छंदी,
तूंही त्यांच्यासम आनंदी,
क्षणांत पडशिल त्यांच्या फंदीं !—
त्यांच्यासंगें, त्यांच्या रंगें, जाशिल उडुनी दूर !

अशा तुला मग बागडतांना,
भरभर वाऱ्यावर फिरतांना,
फुलांत दडतां कीं उडतांना,
कवण उपायीं, आणूं ठायीं, पुन्हां लाडक्या सांग !
शब्दांवांचुनि मंजुळ गाणें
( अर्थ तयाचा देवच जाणे ! )
गाइल माझें गोजिरवाणें !
सप्तसुरांपरि, या वाऱ्यावरि, विरुनी जाशिल पार !
बालरवीचे किरण कोवळे
कारंजावर पडति मोकळे,
रंग खेळती हिरवे पिवळे,
धरावयासी, त्या रंगांसी, जाशिल बाळा खास !
जडावेगळी अमूर्त मूर्ति,
कल्पकतेची कीं तूं स्फूर्ति,
पुण्याची मम आशापूर्ति,
रविकिरणांवरि, जलधारांतरिं, तन्मय होशिल पार !

[४]

## मुरली.

ही एक आस मनिं उरली
कन्हया बजाव बजाव मुरली !

जरि फुटले दोन्ही कान,
तिळभरही नुरलें भान,
नच राही भूक तहान,
बघ वृत्ति वृत्तिमधिं मुरली !

का गाणें मजला व्हावें,
दृष्टीला केंवि दिसावें ?
चित्तासहि नाहीं ठावें !–
मम आस नसे परि पुरली !

मी अगदीं भोळी राधा,
मोहिनी करी सुखबाधा,
तूं माधवजी नच साधा,
तुज दासी विनवुनि झुरली !

चांदणें चहुंकडे खुललें,
आनंदें विश्वहि झुललें,
फत्तरही सारे फुलले,
स्फूर्तीच त्यांत तव शिरली !

तीनेंच शब्द मम निघती, जग फिरुनि, फिरुनि मनिं रिघती,
मज आतां दुसरी न गती, जगतीहि सारि जणुं जिरली !
अणुरेणुहि देहीं स्वैर भिन्नता विसरली वैर,
अब नंदलाल कर खैर ! प्रेमाची दुनिया उरली !
बुद्धीचा तुटला धीर, आशामय होय शरीर,
जलिं बुडे जलधिचें तीर, बघ, बघतां दृष्टिहि विरली !
कथुं काय, काय मज वाटे, आनंद मात्र मनिं दाटे,
तरु शिरीं मूळ उफराटें, शून्यांत परार्धें भरलीं !
जन्माचें झालें चीज, कायमची मेली नीज,
विश्वाचें गवसे बीज- चिद्वृत्ति त्यांत फुरफुरली !
मायेची मेली बिजली, परि खऱ्या जलीं ती विझली,
तीव्रता तियेची थिजली, सुकलेलीं विश्वें भिजलीं !
कोसळति सरीवर सरी, लहरीवर उठती लहरी,
अश्रूंची गरदी भारी, अवकाशें तुडुंब सगळिं !
पुष्पाविण येई वास, वाऱ्याविण चाले श्वास,
हर्षाविण आतां हास, मरणाविण सुटका झाली !
ब्रह्मगोल त्वन्मय झाला, चहुंकडेच मुरलीवाला,
त्वद्रूप गोपिकाबाला, मी मला शून्य या कालीं !
सांवळ्या यशोदाबाळा ! मंधाला पडला आळा,
स्वैराचा वाटे चाळा, बावरी राधिका बनली !
किति करूं कन्हया धांवा ! गा, नाच वाजवीं पांवा !
त्यांतच हा जीव विरावा- यावांचुनि इच्छा नुरली !
एकेक ऐकुनी सूर दुःखांचा हो जरि चूर-
सारखी तरी हुरहूर न कळे ही लागे कसली !
तूं मनांतला चंडोल, मग माझ्या मनिंचें बोल,
जरि हृदयीं लपले खोल- तरि खोल हृदय या कालीं !
बोल बोल तव बिनमोल, जिवाचें देइन मोल,
परि बोल एकदां बोल- ना तरी राधिका मुकली !

फिर विश्वाचा हा गोल सांभाळुनि माझा तोल
प्रेमाचा धरुनी सोल बघ मागुनि राधा आली !
मुरलीची प्यालें भांब, घडि घडी थरारे अंग,
या लहरि उठति कां सांग ?- आनंदवृत्ति पाझरली !
उलगडति पीळ हृदयाचे जणुं सुटति बंध देहाचे-
कीं जीव देहभर नाचे कुणिकडे राधिका भकली !
ही लहर अशा देहाची, हालचाल आनंदाची,
चेतनाच कीं जीवाची तुज भेटाया जणुं आली !
तिजमुळें होउनी दंग वाऱ्यांत तरंगे अंग,
अणुअणुही होति दुभंग- त्यांमाजि नादवीं मुरली !
हृदयाचे ठोके पडती अवकाश त्यांत जे उरती-
करिं मुरलिरवाची भरती मग एकचि धडकी सगळी !
मुरलीचा मंजुळ नाद हृदयांत खुलवि पडसाद,
मम जीवाची ही साद तुज हांका मारित सुटली !
सारखा मुरलि वाजीव, अणुंअणुंसि देहिं दे जीव,
त्यांमाजि नाद गाजीव, हृदयाचे पडदे उकलीं !
जीवाच्या कमळा भुलवीं, निजगुंजारविं त्या डुलवीं,
पाकळी पाकळी खुलवीं, झुलवीं त्या पाडुनि भुरळी !
कृष्णजी ! त्यांत तूं भृंग, त्यांतचरे होई गुंग,
गुंजारव करिं उत्तुंग ही मोहरात्र ओसरली !
चांदणें खुले दिलरंगी, हो एक नादरसरंगीं,
पोहत मी स्वैर तरंगीं- बघ शुद्धबुद्ध मम हरली !
या रसीं देहकण न्हाले, जो तो निजनादीं डोले,
क्षणभरांत सारे फुलले- बघ फुलें तयांचीं झालीं !
करुनि त्या फुलांचा झेला जीवाचा छेल छबेला
नटवीन कधीं अलबेला ! झेला मज, आलें जवळीं !
शृंगाररसानें नटली- तुज राधा रमवूं झटली,
जन्मांची ओळख पटली- कृष्णांत राधिका रमली !

वांकड्या अधरिं हा पांवा, वांकडाच डोळा डावा,
किती वेळ असाच पहावा ! अब खेल करो बनमाली !
श्वासें मज हृदयीं भरवीं, नादें कीं ओढुनि नेईं,
चुंबनेंच कीं मज बनवीं तव ओंठावरली लाली !
दृढ आलिंगन दे अथवा अवकाश न त्यांत असावा
एकरूप जीवाभावां तव देहिं देह मम जिरवीं !
बघ आतां घटका भरली, बोलाची बोली सरली,
जीवाची भाषा हरली, ठायींच वृत्तिही हरली !
जीवाचा पंचीप्यारा मज आतां दिससी न्यारा !
मुरलीचा पिउनी वारा चहुंकडेच राधा झुकली !
उरलें न शीत वा उष्ण, कांहीं न शुभ्र वा कृष्ण,
एकरूप राधाकृष्ण, जयनाद गात ही मुरली !
चहुंकडेच आतां शांत ! विश्व शांत, आत्मा शांत !
कृष्ण शांत, राधा शांत ! मुरलींत शांतता भरली !
भोगुनी तापमय उष्णा मुरलिची लागतां तृष्णा
जग गाइल राधाकृष्णां ही साक्ष मनोमन मुरली !
ही अखंड मुरली जावे, सर्वांच्या हृदयीं गाजे,
मग कोण वदाया लाजे?- कीं धन्य धन्य ही मुरली !
त्या नादरसाचे प्याले मनिं ' गोविंदाग्रज ' प्याले
शाहीर मुरलिचे बनले मग गानिं वाजविति मुरली !

[५]

## घुंगुरवाळा.

वाजिव रे बाळा ! वेल्हाळा ! रुमझुम् घुंगुरवाळा !
अस्फुट विश्वाचें- प्रेमाचें- गाणें आनंदाचें-
वदलों जें नादीं संवादी तुझिया जन्मा आधीं-
पहिल्या प्रीतीचे गमतीचे कांहींसे भीतीचे,
बाळा ! ते बोल तूं बोल आज मनीं जे खोल !
रात्रींच्या काळीं जों बसली ब्रह्मानंदीं टाळी-

मनिं तेव्हां बाणे जें गाणें अस्फुट मंजुळवाणें,
धीर न परि हृदया उघडाया उघडपणें तें गाया !
वदलों मग पाहीं दोघेंही लाजुनि कांहीं कांहीं !
हृदयीं खळबळलें दरवळलें विना ऐकिल्या कळलें !
गाणें मंजुळ तें झुळझुळतें तुझिया वाळ्याभंवतें !
वाळा हालूं दे बोलूं दे आनंदें डोलूं दे !
एकच हा वाळा वेल्हाळा ! घेरे तान्ह्या बाळा !
एकच पायाचा वाळ्याचा नाच गोड बाळाचा-
ऐकुनि आनंदें त्या छंदें घर सगळें नाचूं दे !
'**गोविंदाग्रज**' ही कवनांहीं त्या छंदावर गाई !

[ ६ ]

## एकाद्याचें नशीब.

कांहीं गोड फुलें सदा विहरती स्वर्गांगनांच्या शिरीं,
कांहीं ठेवितसे कुणी रसिकहि स्वच्छंद हृन्मंदिरीं;
कांहीं जाउनि बैसती प्रभुपदीं-पापापदा वारि तें,
एकादें फुटकें नशीब-म्हणुनी प्रेतास शृंगारितें !
कोणी पर्वत आपुल्या शिरिं धरी हैमप्रभा शीतला,
कोणाच्या उदरामधून निघती मोठ्या नद्या निर्मला;
कोणाला वनदेवता वरितसे मोदांत जी नाहते !
एकाद्यामधुनी परंतु जळती ज्वालानदी वाहते !
झाडें जोडुनि पत्रयुग्म फुटलें मेघाप्रती याचती,
स्वच्छंदें जलबिंदु तोंच सगळ्या पानांवरी नाचती;
सारीं पालवतीं, फुलें विहरती, शोभा वरी लोळते,
एकाद्यावर मात्र वीज पडुनी त्या जाळते पोळते !
चाले खेळ असा जगांत; बहुधा सौख्यांत सारे जरी,
एकादा पडतो तसाच चुकुनी दुःखार्णवीं यापरी;
पाहीं कोण अशा हताशहृदया ? जो तो असे आपला !
देवा ! तूं तरि टाक अश्रु वरुनी, त्यांसाठिं तो तापला !

[ ७ ]

## स्मृतिगीत.

आठवतो का सांग सखे ! तो काळ विवाहाचा ?
बाळपणाचा, मुग्धपणाचा, निर्मळ भावाचा !
संसाराचें चित्र चिमुकलें, चिमुकलेच जीव,
फुललें नव्हतें हृदयांचेंही राजस राजीव !
पहात होते तात तदा त्या लीला बालांच्या,
जणुं आठवती त्यांसहि लीला त्याच सुकालाच्या !
जपति परोपरि प्रसन्नहृदया पुण्यमया माता
गेले ते दिन सीते ! यापरि हा ! बघतां बघतां !
बाळपणींचे प्रसंग जणुं ते घडति आज फिरुनी
चित्रपटा या अश्रुजलानें चल टाकूं धुउनी !
तूं सीता ती, राम तोच मी, त्याच आज माता,
परि जे गेले दिन ते आतां येतिल का हातां ?
कशास आशा नसती आतां–झालें तें गेलें,
सुकलें फूल न देइ वास जरि अश्रूंनीं भिजलें !

[ ८ ]

## गुलाबी कोडें.

रंग गुलाबी संध्या पसरी पश्चिमदिग्भागीं
समोर पूर्वा स्वमुख रंगवी त्याच रम्य रंगीं.
परी पश्चिमा–हृदयिं तांबडें सूर्यबिंब विलसे,
कशी रंगली पूर्वा याचें कारण कांहिं नसे.
विनोदचतुरा मुग्धा बाला विचारि निजनाथा
" शास्त्रज्ञा ! पंडिता ! उलगडा हें कोडें आतां
" अपरावदनीं रमते लाली रविसहवासानें
रवि नसतां परि कां रंगावें प्राचीच्या वदनें ?
" रंग इकडचा तिकडे वठला, छटा कुठुनि गेली !
ही जादूची नजरबंदि कुणिं कधीं कशी केली ? "

विनोदपंडित पति कौतुकला हंसे तसा थोडें,
ओंठ गुलाबी, गाल गुलाबी, गुलाबीच कोडें!
वदे तिला "हें रहस्य असलें कथीन कानांत–"
करि कंठीं कर एक, दुज्यानें धरि दुसरा हात.
ओढुनि जवळीं ऐकिवला तिज मुकाच कानांत,
—गालावरचें गीत कसें तें वठवूं गानांत?
दूर सरकतां लज्जित बाला प्राणनाथ बोले
"बघ हृदयाच्या आरशांत जें चित्र तुझें डोले!
"रविबिंबासम चुंबनबिंबचि विलसत या गालीं
सहज तयाची छटा गुलाबी पसरे भंवतालीं!
"चुंबनचित्र न परी उमटतां या दुसऱ्या गालीं!
सांग वल्लभे! नाचतसे कां त्यावरि ही लाली?
"रंग इकडचा तिकडे वठला, छटा कुठुनि गेली?"
ही जादूची नजरबंदि कुणिं कधीं कशी केली?
"कांट्यानें काढावा कांटा" शास्त्रज्ञा ठावें,
गुलाब टाकुनि गुलाबास मग कां नच उडवावें?
हीं हृदयाचीं कोडीं सोडवि हृदयांचा मेळ,
शास्त्रांनां हा कसा कळावा हृदयाचा खेळ!
ओंठ गोष्ट मग कशीं बोललीं तीं मिटलीं तोंडें
'**गोविंदाग्रज**' रसिकां टाकी गुलाबीच कोडें!

[९]

## विरामचिन्हें.

जेव्हां जीवनलेखनास जगतीं प्रारंभ मीं मांडिला,
जो जो दृष्टिंत ये पदार्थ सहजीं वाटे हवासा मला;
बाल्याची पहिली अशी बदलली दृष्टी सदा बागडे
तेव्हां '**स्वल्पविराम**' मात्र दिसती स्वच्छंद चोंहींकडे!
आहे काय जगांत? काय तिकडे? हें कोण? कोठें असें?
सांगा ईश्वर कोण? त्यापलिकडे तें काय? केव्हां? कसें?

जें तें पाहुनि यापरी भकतसें, दृक् संशयें टाकित,
सारा जीवनलेख मी करितसे तैं '**प्रश्नचिन्हां**' कित !
अर्धांगी पुढती करी वश मना, शृंगारदेवी नटे,
अर्धें जीवन सार्थ होइल इथें साक्षी मनाची पटे;
प्रेमानें मग एकजीव बनतां भूमीवरी स्वर्ग ये !
केला '**अर्धविराम**' तेथ; गमलें तेथून हालूं नये !
झाली व्यापक दृष्टि; चित्त फिरलें साश्चर्य विश्वांतरीं,
दिक्कालादि अनंतरूप बघतां मी होत वेड्यापरी !
सूक्ष्मस्थूलहि सारखीं भ्रमविती; लागे मुळीं अंत न,
त्याकाळीं मग जाहलें सहजची '**उद्गार**' वाची मन !
आशा, प्रेम, नवीन वैभव, तशी कीर्तिप्रभा, सद्यश,
हीं एकेक समर्थ आज नसती चित्ता कराया वश;
सर्वांचा परमोच्च संगम चिरं जेथें असे जाहला,
देवा ! '**पूर्णविराम**' त्या तवपदीं दे शीघ्र आतां मला !

———:•:———

## एकनाथ पांडुरंग रेंदाळकर.

जन्म—इ. स. १८८९ मृत्यु १९२०.

### कोकिळास—

गाच कोकिला ! अपुलीं गाणीं शांतविणारीं दग्ध मना,
हलवुनि सोडीं भोंवतालच्या उदास या वातावरणा !
नादरसानें भिजवुनि टाकीं रुक्ष येथले फत्तरहि,
रूप देउनी भव्य, करीं ही स्वर्गाहुनिही श्रेष्ठ मही !
दिव्यादेशें निराश हृदया नवीन देईं उत्साह,
सुकल्या झाडा फुटे पालवी जैसा वळतां जलवाह,
गानरूप तूं गमसि, लकेऱ्या तुझ्या पसरतां रानांत,
कीं तव रूपें फिरतें आहे आशेचें मृदु संगीत !

नित्यनवीन ध्वनी तुझा हा वाटे येउनि तोच पुन्हां,
असे रोजची तीच उषा, पण शिळी वाटली काय कुणा ?
एकच गाणें, ध्वनीहि एकच मोहकता पण दुजी असे,
वाटे स्वर्गामधील कांहीं दिव्य अंश त्यामाजि वसे !
घनराजाच्या एकच सरिनें टवटवीत हो वनराई,
तुझी लकेरी एकच ऐकुनि जीव तसा गुंगुनि जाई !
सृष्टिसतीचा बहु आवडता पिढीजाद तूं गंधर्व,
फिके वाटती तुझ्यापुढें ते नाद जगामधले सर्व !

* * *

लहान मोठीं भरुनी गेलीं झाडें हीं झुपकेदार,
झुलती आंबे वाऱ्यावरती फुटुनी ताजा मोहोर.
तृणें लाजरीं वायुसंगमें खालीं वर माना करिती,
ऊर्मी उठती सौंदर्याच्या काय तरुण सृष्टीवरती !
नानारंगी फुलें उमलुनी शोभे सारा वनभाग,
काव्यतरूचे कोंबच आले उगवुनि कीं जागोजाग.
अशा प्रदेशीं संध्याकाळीं पडलों असतां वृक्षतलीं—
भेदित गगना तुझी लकेरी माझ्या कर्णपुटीं भरलीं.
अमृतरसाचा स्रोत लोटला स्वर्गांतुनि का मजवरती,
भावजलीं कीं बुडुनी गेलों, झाली माझी अशी स्थिति !
स्वप्रतिरवें शांत व्योमीं होउनि खळबळ कितीतरी
मन्नेत्रांतुनि सुखाश्रु गळले झरझर गवती फुलांवरी !
सौंदर्याचा पूर लोटला त्या गाण्यांतुनि सभोंवतीं,
आनंदानें फुलवेलींनीं तदा उधळिलीं फुलें किती !
नाद तुझा तो पसरत पसरत गेला माळापलीकडे,
नमीं कशाचा शिरे अनंतीं लंघुनि गिरिचे उंच कडे !
या विश्वांतिल अणुरेणूही गुंफावा निजगानगुणीं—
गड्या कोकिळा ! काय सांग ही इच्छा आहे तुझ्या मनीं ?

क्षणांत येथें, क्षणांत तेथें नाचुनि चंचल नाद तुझा
येथें-तेथें गुंफुनि एक स्थळीं, विश्वमय करी रजा !

*   *   *

आम्रतरूशीं तुझीं हितगुजें चालत आलीं अहर्निशीं,
प्रभाव त्यांचा घडुनी येतो परी जगाच्या इतिहासीं !
स्वतांशींच तूं उगिच आपला गुंगत बससी कांहिं तरी,
ब्रह्मांडावर जादू त्याची चालविसी पण कवीपरी !
जगास उठवी तुझा गानरव भरुनि रवीच्या तेजांत,
शिरुनि फुलांच्या गंधीं निर्मी उत्सुकता जनहृदयांत.
हीं झाडें, हे चंचल ओढे, फार काय जग सारेंहि,
तुझ्या गानमय सरित्तरंगीं पिका ! सदा नाचत राही !
गासी स्तोत्रें दिव्यभावमय नित्य उगवत्या सूर्याला,
नुकत्या फुलल्या रानफुलाला वाहसि गानस्तुतिमाला.
अल्लड वेली नाचति तुझिया गाण्याच्या तालावरती,
भ्रमरी झिम्मा खेळति पुष्पांसवें, वृक्ष शिर डोलविती !
तो संगीतप्रवाह पडतां कर्णीं, बंधन फोडोनी,
माझा आत्मा गेला अवचित सर्वहि विश्वीं पसरोनी,
उदित जाहल्या मधुर भावना कितीतरी जड हृदयांत,
अरुणागमनें जैशा रक्तच्छटा पसरती गगनांत.
एकच गाणें परी मनीं भरि भिन्न विकारांची श्रेणी,
शुभ्रच रविकर सुरेंद्रकार्मुक रंगविती जेवीं गगनीं !
आजवरीच्या आयुष्याचें गमे आज सार्थक झालें,
परवा नाहीं याच उत्सवीं आतां जरि जीवित सरलें !
क्षण हा नाहीं विसरणार मी केव्हांही या जन्मांत,
याच्या लाभासाठीं हांसत सांपडेन भवचक्रांत !
न घडे कां या सुखक्षणांनीं जीवित माझें-विश्वाचें ?
धुउनी टाकीं तूंच पिका ! तरि कठोरपण हें ईशाचें !

टाक कोंदुनी गानरवानें प्रत्यक्षाप्रत्यक्षाला,
जन्मापासुनि अंत होय तों बुडवीं गानीं जगताला !

* * *

कसें करावें, किती करावें, स्वागत चिमण्या गड्या ! तुझें,
वाणी अडते, मन गोंधळतें, होय काय तें नच समजे !
एक तुझी ती गोड लकेरी फेंक वसंताच्या कलिज्या !
उधळुनि देतों तुजवरुनी मी अजवरिच्या कविता माझ्या !
गाणारा तूं स्वर्गगायनें सृष्टीच्या दरबारींचा
कसा टिकावा डौल तुजपुढें बाह्यभूषणप्रिय कविचा ?
जड शब्दांनीं, गणवृत्तांनीं, निर्बल यमकप्रासांनीं,
मृतप्राय ही झाली आहे जगांतली कवितारमणी ?
अनंतबंधनजालीं हो का प्रतिभाबल कविचें व्यक्त ?
लहरिविलास स्वैर दिसावे कसे नळाच्या पाण्यांत ?
कसरतवाला चपळ किती, पण सेनानायक होय कसा ?
गारोडीही कदा विधाता नाहीं व्हायाचाच तसा !
शास्त्र ठेवुनी पुढें, विरचिती पद्यें त्याच्या नियमांनीं,
पीक कवींचें अशाच आह्मां आलें आहे या भुवनीं !
कवी खरा तूं एक कोकिळा ! गात भावमय गाणारा,
चराचरात्मक विश्वगोल हा झुलतो त्याच्यावर सारा !
गानरसीं तव साधी भोळी मही तरंगो फुलापरी
स्वर्गी जावो त्या पूरानें चढतां हळुहळु वरी वरी !
प्रतिक्षणीं दे नवीन फेंकुनि अवाङ्मनसगोचर नाद,
अमंगलाही मंगलांत ने घालुनियां भेदक साद !
शंभुशिरांतुनि जशी उसळुनी धांवे गंगा बाहेर,
पाप जगांतिल टाकी ध्वंसुनि तसा तुझाही हा सूर.
याच सुरानें घडेल जगतीं काय तुला तें केंवि कळे ?
रवि न जाणतो अजुनी कीं निज आगमनें अंधार पळे !

* * *

बाळपणीं मीं ह्याच एकदां सूर मधुर तव आयकिला,
पुन्हां आजवर माझ्या कानीं विहगा ! तो नाहीं पडला.
गोड आठवण करीत त्याची गोड नाद तो चिंतीत--।
होतों वागत तसाच विषमय जगांतल्या व्यवहारांत.
होउनि चुकल्यापरी कोकिळा ! तुला शोधिलें किती स्थळीं—
परी लाभलें नाहीं कांहीं तीव्र निराशेवांण मुळीं !
ठाउक नसतां मार्ग आपला सैरावैरा पळे नदी,
तसा भटकलों कुठें कुठें तव लागुनि नादाच्या नादीं !
येथें दिसशिल तेथें दिसशिल, म्हणुनी मी सोडुनि भान
भणभण वणवण फिरफिरलों रे कितीतरी रानोरान !
या झाडावर असाशिल, दिसशिल दूर तिकडच्या झुडपांत,
लावुनि बसलों दृष्टि सारखी कितीकदां आकाशांत !
काम सोडुनी धाम सोडुनी सोडुनि सारा व्यवहार
त्वदेकचिंतनमयाचि कोकिळा ! केला माझा संसार !
तुला शोधण्या पाय धांवती, दृष्टी तुजला पहावया,
अन्यध्वनिला विमुख कर्ण हे तुझेंच गायन ऐकाया !
अशा रीतिनें महोग्र तप जें आजवरी मीं आचरिलें,
गंधर्वा ! हें आज तयाचें अपूर्व फल गोचर झालें !

* * *

किती हिंडलों झाडीमधुनी, किती तुडविलीं मीं रानें,
हिरवीं शेतें किती शोधिलीं रोज नव्या उत्साहानें.
बसतां उठतां सदासर्वदा एकच चाले ध्यान तुझें,
कवि कवितेला किंवा प्रणयी हृदयेश्वरिला जसा भजे !
प्रयत्न माझे आजवरीचे सारे निष्फळ होऊन
त्वदीयदर्शनवांछा नाहीं कधीं दिली मीं सोडून
आज जहाली जरी निराशा उद्यांतरी तूं दिसशील,
या आशेनें न सोडिली मीं उत्कंठा हृदयांतील.
गेला अस्ता भानु, पसरला सर्व स्थानीं अंधार,
विश्व कंठितें रात्र जाणुनी प्रभात आहे येणार !

* * *

जन्मांतरिंचीं या जन्मींचीं सुकृतें एक स्थलिं जमलीं,
म्हणुनी कर्णी गानसुधा तव आज अशी अवचित पडली!
गाच कोकिळा! एकसारखा, क्षणही दवडूं नको वृथा,
नाशुनि टाकीं व्यथा वाढल्या आठवुनी संसारकथा!
दीर्घ पसरली खालीं शय्या हिरव्या कोमळ गवताची,
छटा विखुरली नयनमनोहर गगनीं संध्यारागाची,
मरकतमाणिमय मंदिरांत तूं बसुनी गासी संगीत,
अधिक सुखाचा क्षण याहुनि मम असेल कुठला दैवांत?
चालूं दे तव गानमहोत्सव, विराम त्याला नको पिका!
या गवतावर पडुनि सेवितों किमपि आत्मसंवेद्य सुखा!
जाशिल उडुनी केव्हां नकळे करुनी मागें अंधार,
होइल तेव्हां दृश्यजात हें गायकराजा! निस्सार!
तुझ्या अभावीं स्थिती जगाची होय कशी ती मी जाणें,
जाउं कसा मग येथुनि मंजुळ चालत असतां तव गाणें,
गाच कोकिळा! क्षणभरही मी येथुनि नाहीं हलणार!
असाच टाको भरुनि अंबरा तुझ्या गायनाचा पूर!
या पूरांतिल एकच बिंदू येइल माझ्या कवितेंत,
तरी सहज मी फेंकुनि देइन दीन ही धरा स्वर्गांत!

*   *   *

स्वर्ग कोठला अथवा दुसरा? तूंच स्वर्गाचा जनिता,
नंदनवनिंच्या पुष्परसाची वाहविसी चंचल सरिता!
सर्व स्थानीं मधुर स्वर्ग-प्रभा पसरली तूं गातां,
गमे अप्सरःक्रीडोद्यानापरी मनोहर भू आतां
स्वर्गीचा तूं गायक, तुजला स्वर्गचि उचित रहायाला,
येसी केव्हां समुद्धराया पापपूर्ण या जगताला!
फेरी आहे गंधर्वा! तव भाग्यदिनीं इकडे झाली,
सुकुनी गेल्या वनीं घनाची स्वारी वाटे कीं वळली!
वसंतमित्रा! जयगीतें तुज किती वहावी हर्षानें?
प्रेम तुझें मीं व्यक्त करावें कैसें या जडवाणीनें?

करी गानमय विश्वगोल हा, जडाजडाचें गान करी,
गाण्यावांचुनि नुरवीं कांहीं गानपटो ! वार्ता दुसरी !
होतिल कंटक फुलांसारखे, उच्चनीचता लोपेल,
बाभळिचीं हीं झाडें स्पर्धा कल्पतरूशीं करितील !
मूक भावमय काव्यरसानें होउनियां बेफाम अति
दुबळीं हृदयें पिका ! हलवुनी सोडितील ही जड जगती !
विश्वरूप हा भगवान् गाणीं तुझीं गोड हीं ऐकोनी
तुजवरि तारकमिषें सुखाश्रू ढाळित आहे बघ गगनीं !

[२]

## प्रबोधन.

उघडिं नयन ! रम्य उषा हंसत हंसत आली !
अरुणकिरणमय वसना अवनी ही ल्याली !
मंजु मधुर गान करीत, आनंदें भुवन भरित,
विहंगवृंद गगनिं उडत–या सुरम्य कालीं !
हंसाति फुलें, तरु डुलती, लतिकागण नृत्य करिति,
धांवति या भ्रमरतती–सुप्ति तुला आली !
स्निग्ध दृष्टि तव पडतां, होय वृत्ति सुखभरिता
रविकरिं घनपंक्ति तथा–स्वर्णमय जहाली –
सुप्रभात सुखकर हा, दारुणतिमिरोत्कर हा
रमवी सकलांस पहा–दिव्यविभवशाली !
ऊठ ! ऊठ ! तुजविण परि नीरस हें सुख सुंदरि !
विफल गमत तें ज्यावरि–दृष्टि न तव गेली !
विकचकमलगंधि पवन शीतल, करि तापशमन,
त्यांत परी श्वसन तव न–तप्त तनु जहाली !
खगकूजित अलिगुंजित लतिकातरुगणसिंजित
सुदति ! विफल सकल गमत–तुजविण या कालीं !
गगन तरणिकररंजित चपल धवल घन विहरत
क्षणहि परि न दृष्टि वळत–तव मुखिं दृढ ठेली !

ऊठ ! ऊठ ! सखि ! झडकरिं ! नयनद्युति चपल पसरिं !
रम्य मधुर हास्य करीं–स्वर्ग आण खालीं !
प्रेमाचा ओघ सरल वाहो तव मुखिं अविरल
अचरहि जग करुनि तरल–बुडविं सुखिं विशालीं !

—मोहिनी.

[ ३ ]

## प्रेमासाठीं !

प्रेमासाठीं वेडा झालों ! मिळेल तें कोठें मजला ?
भ्रमुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी प्रेमजला !
वणवण फिरलों माळावरती, गिरिशिखरेंही लंघियलीं,
शिलाखण्ड तुडविले पदतलीं–श्रान्त विकल ही तनु झाली !
झोप सुखाची मज मुकली,
उदासीन वृत्ती भकली,
जीवित–मधुकलिका सुकली !
शून्य त्रिभुवन भासे सारें, नयनजलें भूतल भिजला !
भ्रमुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी प्रेमजला !
गुलाबकलिका घेतां हातीं कण्टक टोचुनि मधु न मिळे;
हताश होउनि तेणें माझा धैर्यशैल हा ! हाय ! ढळे.
विपरीता झाली सृष्टि,
भकली किंवा मम दृष्टि,
होतों अन्तरिं बहु कष्टी,
इकडे वळतों, तिकडे पळतों, अंकुर न कुठें परि रुजला !
भ्रमुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी प्रेमजळा !
मृगजल भरलें, जलचि सुदुर्लभ; मिळे कोठुनी इथें सुधा ?
सोडुनि वेडा छन्द मनांतिल खेद करावा मीं न मुधा—
परि तळमळ मनिंची न सरे,
प्रेमाविण न प्रिय दुसरें !
मिळेल तें मज कसें बरें ?

चैन पडेना क्षणभरि, कांहीं उपाय सांगा हो मजला !
भ्रमुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी प्रेमजला !
भूवरिचीं विकसित प्रसूनें कशास ? जीं सुकुनी जाती !
नित्यविकासी नन्दनवनिंचीं कुसुमें येतिल का हातीं ?
गन्धें भरतिल सकल दिशा !
हृदयवृत्ति होतील पिशा !
दुःखतती टिकतील कशा ?
त्यांची माला घालुनि कण्ठीं हिंडावें गमतें कविला !
भ्रमुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी प्रेमजला !
काय करावा उपाय आतां ? कायहि जडसा हाय गमे !
विचार करुनी मस्तक फिरलें, मानस कोठेंही न रमे !
रत्न म्हणूनी दीपशिखा–
धरुनी कितिदां मुकें सुखा !
वाट दाखविल कोण सखा ?
सजला सोडुनि शरद्घना हा हाका मारुनि जिव दमला !
भ्रमुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी प्रेमजला !

—मंदारमंजरी.

——:•:——

## ‘ नागेश.’

जन्म–इ. स. १८८९.

### फूलपांखरूं.

दिवस शांततेचे, मनोहर आश्विनमासाचे;
हिरव्या कुरणांनीं, जाहली मंडित ती अवनी.
स्थिरचर आनंदे, भुलोनी डोले स्वच्छंदें.
मंगल असलेलें, प्रेममय पूर्वीच झालेलें–
हृदय कवीचें तें, मोहिलें सृष्टीच्या गीतें;
प्रमुग्ध तें झालें, सृष्टिमधिं विचराया सजलें.

एका बाजूस, मनोहर फूलपांखरास–
गातांना त्यानें, पाहिलें कविच्या हृदयानें.
फूलपांखराचें, प्रेममय गाणें हृदयाचें–
कुठें कळायाला, कवीच्या भोळ्या हृदयाला ?
परि तो मोहोनी, थबकला अवचित त्या स्थानीं,
फूलपांखरें त्या, सृष्टिच्या मंगलमय हृदया
येथुनितेथोनी, टाकिलें पुरतें भारोनी !
मग तो गाणारा, प्रेममय नित्यहि असणारा,
कां नच भुलणार–कवी तो वेडा होणार ?
कवि तो त्यासंगें वदाया प्रेमें मग लागेः–

* * *

“ सृष्टीच्या छकुल्या ! मूर्तिमत् काव्या सोनुकल्या !
फूलपांखरा ! हे, काय तव गाणें हें आहे ?
त्याच्या अर्थाला, सांगरे माझ्या हृदयाला.
त्यांतिल आनंद, लुटूं दे मजला स्वच्छंद !
लोट रसाचे ते, त्यांतले द्यावे तूं मातें.
तुझ्या गायनाचा, अर्थ तो दिव्यानंदाचा–
कळला जरि नाहीं, मला तरि दिव्यच तो पाहीं !
फोल जरी असतें, तुझें बा ! अभिनव गायन तें,
येतिल तरि साऱ्या, लता या डुलल्या कां असत्या !
झरे प्रवासी ते, थबकले मधेंच कां असते ?
झाडांच्या वरती, पांखरें निश्चल कां वसती ?
दगडांतिल पुरती, खिन्नता कैशी वद जाती ?
म्हणुनी मज गमतें, तुझीं हीं स्वर्ग्यच संगीतें !
गा तर गा गाणें–गाऊं दे माझें हें सोनें !
अपुल्या मृदु चरणीं, धरेला हलवुनि हलवोनी
गुङ् गुङ् निज गानीं, टाकसी गुंगच तूं करुनी !
तव दुडदुड नृत्यें चालली असती सातत्यें;
तुज घुंगुरवाळा, करोनी सृष्टी वेल्हाळा !–

नाचत जणुं सुटली, तुझ्यानें वेडी झालेली !
मी तर पूर्णपणें, जाहलों वेडा हृदयानें !

* * *

" सौख्य चिरस्थायी, नांदतें नित्यहि तव हृदयीं.
दुःखें संसृतिचीं, मनाच्या पूर्णच अवनतिचीं
तुजलागीं ठावीं,-पांखरा ! कैशीं तीं व्हावीं ?
गानीं उत्पत्ति,-स्थितिहि तव अभिनव संगीतीं !
लयही गाण्यांत, तुझा, त्या दिव्यानंदांत !
सुखार्थ तुज जनन, प्रभूनें दिधलें हें जाण !
घे तर आनंद, मुखानें बोल स्वच्छंद !
मीहि तुझ्या संगें, पहा हा डोलाया लागें !
अस्फुट गाण्यास, तुझ्या मी देतों तालास;
प्रपंचभारानें, लोटितों क्षणभरि दुरि हातें;
उन्मन होवोनी, लागतों विहगा ! तव भजनीं.
" गाणारा मीहि, तुझ्यासम एक असें पाहीं;
प्रताप हे गिरिचे, झऱ्यांच्या मंगल सुरसांचे,
मोहक वृक्षतती, नाचऱ्या वेलींची पंक्ति,
फार काय परि हें, जगाचें मंडल जें आहे,
तें मज सारेंहि, काव्यसें भासे मम हृदयीं !
त्याला मी गातों, पाहुनी त्यातें मनिं रमतों;
झिम्मा घालोनी, रमतसें तयासह स्वमनीं !

* * *

" परि हा आनंद,-तुझ्या या गाण्यांतिल छंद-
साध्याभोळ्याला,-मिळावा कैसा वद मजला ?
म्हणुनी मी फंदी, होउनी लागें तव नादीं !
गा तर गा विहगा ! तुझ्या त्या अव्यक्तातें गा !
विश्वाचा गोल, होउं दें मंगलमय विमल;
प्रेमाचें भरतें, वहाया लागो भरभर तें;

उच्चनीचभाव, झडोनी जावो झणिं दूर;
गर्व मानवांचा कवींचा गळो पुरा साचा !

* * *

"जें जें हृदयाला, लावुनी सोडी चटक्याला-
तें तें सारेंहि प्रभूचें अंशभूत पाहीं !
फूलपांखरा ! तू असासि मम चटक्याला हेतु;
म्हणुनी देवाचा लाडका, अससी तूं साचा !
तुझें कवच धरुनी, जणुं प्रभु विचरे या रानीं !
अतिप्रचंडाला, पापमय वातावरणाला
थाया शांतीतें, गात तो मंगल संगीतें.
गानाचे जलसे, सतत तव चलोत हे ऐसे !
दुरित लया जाओ, विश्व हें मंगलमय होओ !

* * *

"पुष्पखगा ! तूतें, बघोनी माझ्या हृदयातें-
पूर्ण शांति आली, खिन्नता सकल दूर झाली.
पडदे दुःखाचे, तुटुनियां गेले भ्रांतीचे !
प्रियावियोगानें, जरी मी आहें खिन्न मनें,
तथापि मम हृदया,-खगा ! ये दुःखाची क्षमता,
सारी ही सृष्टि, रमविते माझ्या दृष्टीसी !
गा तर तूं गाणें, तुझ्यावर रचितों मी कवनें !
तुझीं स्फूर्तिगीतें, आणि मम साधीं संगीतें,
हो या दोघांचा, सुसंगम गंगायमुनांचा !
मंगल तें क्षेत्र, बनोनी करो जग पवित्र !
शोभा स्वर्गींची, जगाला येवो प्रेमाची !
तुला गातगात, दिसो त्या तेजाचा सुपथ !
त्या तेजःसुरसीं, विलयता येओ आत्म्यासी !
मग तो मूकपणें, म्हणाया सजो दिव्य गाणें !
-हीं आशा-विभवें, पांखरा ! होतिल का सत्यें ?"

[ २ ]

## निराशेंतील उत्कंठा.

जा जा येथुनि-पळहीं आतां राहुं नको जा-मज कळलें !
दे माझें तें मज सगळेंही न कळत चोरुनि जें नेलें !
शिरीषसुमनासम मृदु जें तें तव संगें किति भटकेल ?
अनंतिंच्या त्या अनंत गति तव किती अडवुनी ठेवील !
क्षण चमकसि उडुमालेंत,
क्षण दिससी सुमकोशांत,
क्षण हंससी तूं पुष्पांत !
अपुल्यासंगें गरगर भरभर अदय फिरविशी, बहु दमलें-
दे माझें तें मज सगळेंही न कळत चोरुनि जें नेलें !
मंद सुशीतल सुरभि समीरणलहरीमाजी क्षण लपशी !
हळूच नाचत गात गात मग झऱ्यामधूनी क्षण येशी !
चकचकशी हिमखण्डांत,
झळकशि मृदु रविकिरणांत,
खुलशि शांत विधुबिंबांत,
लताकुञ्जवनगुहांमधुनि तव संगें फिरतां जें थकलें-
दे माझें तें मज सगळेंही न कळत चोरुनि जें नेलें !
खेंचुनि तुजला किती आणिलें न राहसी तूं परि लवही !
निजतरलत्वें जिंकिलास तूं अहा ! खरोखर पॅरिंदही !
ध्यास तुझा परि लोपेना,
उत्कंठा ती हरपेना,
आशातन्तुहि भंगेना !
कैसें मागूं ? कैसें घेऊं ? फिरतां फिरतां जरि दमलें-
कांहि दिवस घे, परंतु मग दे, न कळत चोरुनि जें नेलें !

[ ३ ]

## उत्कंठिताचें गाणें.

कोणी जातिल घेउनी तुज गडे ! उत्तुंग शैलावरी,
कोणी प्रेमसुधातरंगिणि ! तुला गातील मंजुस्वनीं;
कोणी प्रेमल, जोडतील तुजला मैत्रीण सौदामनी,
कोणी त्वत्पद पूजितील सुरभिप्रोद्दामपुष्पोत्करीं !
त्वत्कंठीं कुणि घालितील उडुंची गुंफून हारावलि,
कर्णी वा कुणि ठेवितील मृदुला दिव्या गडे ! मंजरी;
कोणी केतकरेणुंनीं सुललिते ! रेखून चित्रें बरीं—
देवी ! शोभवितील खास तव हीं रम्या कपोलस्थली !
उत्तुंगांबरचुंबि-भव्य-सुभग-प्रासादपृष्ठावरी
नेओनी कुणि ठेवितील तुजला प्रेमप्रकर्षे पहा !
संशांतस्फटिकप्रभेंत बसुनी घेऊनि वीणा अहा-
तूतें गातिल मंजु मंजु मधुर स्तोत्रेंहि नानापरी.
देवि ! स्पष्टचि रोडकाचि जगतीं बोलूनचालून हा !
त्या कोठें बहुमोल वस्तु मजला ?-ही पर्णशाला असे !
रत्नांचा रुचिरप्रकाश कुठला ? वीणाहि मातें नसे !
कैसें गे तर तूजला सकरुणे ! मीं रंजवावें पहा !
नाहीं सन्निध देवि ! तूंच बघसी, कांहीं मला साधन !
आशा ही परि थोर--कीं ' मजसि तूं व्हावीस ' ऐसी सखे !
एक प्रेममयी सुवृत्ति तुज घे, देतों, रहा तूं सुखें !
तीचें मूल्य करून जीर्ण उटजीं माझ्या, वसें येउन !

——:•:——

# त्र्यंबक बापूजी ठोमरे.

## अरुण.

पूर्वसमुद्रीं छटा पसरली रम्य सुवर्णाची
कुणीं उधळिली मूठ नभीं ही लाल गुलालाची ?

पूर्वदिशा मधु मृदुल हांसते गालांच्या गालीं,
हर्षनिर्भरा दिशा डोलती या मंगल कालीं !
क्षितिजाची कड सारविली ही उज्ज्वल दीप्तीनें,
सृष्टिसतीनें गळां घातलें का अनुपम लेणें !
हे सोन्याचे, रक्तवर्ण हे पिवळे हे कांहीं,
रम्य मेघ हे कितेक नटले मिश्रित रंगांहीं !
उदरांतुनि वाहते कुणाच्या सोन्याची गंगा,
कुणीं लाविला विशुद्ध कर्पुररस अपुल्या अंगा !
अरुण चितारी, नभःपटाला रंगवितो काय,
प्रतिभापूरित करी जगाला कीं हा कविराय !
कीं, नव युवती उषासुंदरी दारीं येवोनी
रंगवल्लिका रम्य रेखिते गोंडस हस्तांनीं !
दिवस यामिनी परस्परांचें चुंबन घेतात—
अनुरागाच्या छटा तयांच्या खुलल्या गगनांत !
स्वर्गीच्या अप्सराच अथवा गगनमंडलांत
रात्रीला शेवटचीं मंगल गीतें गातात !
किंवा ‘ माझी चोरुनि नेली मोत्यांची माला ’
म्हणुनि नभःश्री रुसली, आली लाली गालांला !
कीं, रात्रीचें ध्वांत पळालें, आशेची लाली
उत्साहाशीं संगत होउनि ही उदया आली !
किंवा फडके ध्वजा प्रीतिची जगता कळवाया,
कीं अपणावर आज पातली हीच खरी विजया !
कीं, स्वर्गीच्या दिव्यांचें हें फुटलें भांडार,
जणूं वाटतें स्वर्गच त्यासह खालीं येणार !
प्रगट जाहलें श्रीरामाचें पुष्पक किंवा हें !
कीं, सोन्याची पुरी द्वारका लखलखते आहे !
“ तेजानें न्हाणिते जगाला कोण सखे बाई !
नवल अगाई ! तेजोमय तूं ! तेजोमय मीहि ! ! ”

परस्परांना दिशा म्हणाल्या प्रेमळ वचनांनीं
“ विरह-काल संपला गा गडे ! प्रेमाचीं गाणीं !
“ या मेघाच्या कुंजामध्यें ही लपली कोण ?
तिला बोलवा–पुरे गडे ग ! हा तुमचा मान !
“ अम्ही गवळणी हृदय-रसांनीं पूजूं प्रेमाला,
प्रेमकाल हा ! म्हणोत कोणी अरुणोदय याला.
“ पूर्वदिशेशीं गोफ खेळतो कृष्ण गडी बाई !
उधळित सोनें सर्व तयाच्या लागूं या पायीं.
“ मधुस्मितानें विश्व भरूं ग ! शंकित कां म्हणुनी ?
सर्व सारख्या ! हांसावें मग कोणाला कोणी ? ”
गोफ चालला गगनमंडळीं, रंग नवा आला,
त्यांत लागला ‡कृष्णाचा कर पूर्वेच्या गाला.
विनयवती ती पूर्वदिशा मग अधोवदन झाली,
तो प्रेमाची अद्‌भुत लहरी वसुधेवर आली !

* * *

या प्रेमाच्या लाटेखालीं मस्तक नमवावें,
हें आह्मांला, ब्रह्मांडाला, देवाला ठावें !
परंतु ही बघ भूदेवी तर वेडावुनि गेली,
टकमक पाहत स्वस्थ बैसली या मंगल कालीं !
दंव बिंदूचा–नव्हे नव्हे ! हा पडदा लज्जेचा–
मुग्धपणाचा बालपणाचा कोमलहृदयाचा–
निजवदनाहुनि या प्रौढेनें दूर पहा केला,
योग्यच अथवा प्रेम न मोजी क्षुद्र लौकिकाला !
प्रेमातिशयें मला वाटतें विसरुनि जाइल ही
प्रिय नाथाचा आगमनोत्सव हा मंगलदायी.
कविते ! तिजला साह्य तूंच हो, तूंही पण वेडी !
परंतु वेडाविण सुटतिल का हृदयाचीं कोडीं ?

---

‡ कर्षतीति कृष्णः, अर्थात् सर्वंकष ज्यांचे किरण आहेत तो सूर्य.

जा जा ! आतां लाजुं नको ग ! पाहुं नको खालीं !
लाजच अथवा–खुलशिल तूंही या मंगल कालीं.
या लज्जेनें कविमानस हें होउनियां लोल,
प्रेमचंचले ! प्रेमच तुजवर मग तें उधळील !
प्रेमावांचुनि फेड कशानें प्रेमाची व्हावी ?
हा बघ सविता प्रेमळ भूतें प्रेमानें नटवी !

* * *

हा प्रेमाचा लोंढा वरुनी आला हो आला !
भव्य गिरींनों ! निज शिखरावर झेलुनि घ्या याला.
नील झग्यावर वेलबुटी तो तुमच्या चढवील,
' निगा रखो ! ' येईल तुम्हांला सरदारी डौल !
कविवाणीचा स्फूर्तियुक्त मग होतां अभिषेक,
तटस्थ होउनि तुह्मांस बघतिल हे सारे लोक !
सुवासिनींनों, वनदेवींनों, डोला ग डोला !
नटवा सजवा वनमालेला तुमच्या बहिणीला !
वनमालांनों, हळूच हलवा हा हिरवा शेला,
सूत्रधार हा नभीं उदेला, उधळा सुमनांला !
' जय ' शब्दानें आळविण्याला लोकनायकाला
नभोवितानीं द्या धाडुनि ही विहगांची माला !
सरोवराच्या फलकावरती स्वर्गाच्या छाया
कुणी रंगवा, कुणी फुलांवर लागा नाचाया !
वेलींच्या वलयांत बसोनी गा कोणी गाणीं,
या झाडावर त्या झाडावर हंसत सुटा कोणी !
कुणी कुणी या नदीबरोबर नाचत जा बाई !
प्रपातांतही बसुन गा कुणी मंजुळ शब्दांहीं !
उषःकालच्या सुगंध, शीतल, मृदुल मंद वाता !
विहार कर, ये पराग उधळित अवनीवर आतां !
या कोमल रविकिरणांवरती स्वर्ग बसुनि आला,
सख्या मारुता, गाउनि गाणीं झोंके दे त्याला !

* * *

ऊठ कोकिळा, भारद्वाजा, ऊठ गडे, आतां,
मंगल गानीं टाका मोहुनि जगताच्या चित्ता !
सरिते, गाणें तुझें, सुरामधिं या मिळवीं बाई !
साध्या भोळया तुझ्या गायना खंड मुळीं नाहीं !
पिवळीं कुरणें या गाण्यानें हर्षोत्कट झाली,
गाउं लागलीं, नाचुं लागलीं, वेडावुन गेलीं !
चराचराच्या चित्तीं भरलें दिव्याचें गान !
मूर्त गान हें दिव्य तयाला गाणारें कोण ?
दिव्य गायनें, दिव्य शांतता, दिव्याचे स्रोत,
वसुंधरेच्या अरुण ओतितो नकळत हृदयांत !
त्या दिव्यानें स्वर्भूमीचें ऐक्य असें केलें,
त्या दिव्यानें मांगल्याचे पाट सुरू झाले !
मंगलता ती दिव्य कवीला टाकी मोहोनी,
वाग्देवीनें सहज गुंफिलीं मग त्याचीं गाणीं.

[२]

## संध्यारजनी.

अस्तगिरीच्या अभिनवकुंजीं निजला निजनाथ,
बघतां बघतां त्यास रंगलें वारुणिचें चित्त.
हलुच पाहते, मधुर हांसते, जाते लाजून,
म्हणे मनाशीं " जीव टाकुं का हा ओवाळून !
प्रेमनिर्भरा बघुन सखीला भास्कर मायावी
जातां जातां साखरचुंबा एक तिचा घेई !
लाजलाजुनी जीव सतीचा मग अर्धा झाला,
त्यांतच आल्या रोषाच्याही लहरी गालाला !

* * *

गेला, झाला दृष्टिआडही सूर्य, तरी अजुनी
पहा चमकते प्रेमपताका पश्चिमदिग्वदनीं.

थक्क होउनी दिशा म्हणाल्या " काय मोहिनी ही !
प्रेमसमाधी अजुनि खुळीची या उतरत नाहीं !
" किती पश्चिमे ! आतां त्याचें चिंतन करिशील ?
दृष्टि लावुनी अशीच बसशिल सांग किती वेळ ?
" खिन्नपणा हा पुरे ! पुरे ग अश्रूंची माळ !
उद्यां बरें का तो राणीला अपुल्या भेटेल ! "
संध्येच्या खिडकींत येउनी ही हंसरी तारा,
हलुच पाहते, खुणाविते ही 'या-या !' कोणाला ?
पलिकडचा तो तेजोमय नव पडदा सारून
बघते हंसते, क्षणांत लपते, ही दुसरी कोण ?
लाजत लाजत असाच येइल सारा स्वर्लोक,
मुग्ध बालिका जमतिल गगनीं आतां नव लाख !
प्रथम तारके ! पहा सखी तव एक पुढें आली,
ही दुसरी, ही तिसरी—आतां किතितरि भंवतालीं !

* * *

आली होती भरती, आतां अस्त समुद्राला,
त्या लाटांतुन काय सांडल्या या मौक्तिकमाला !
कल्पतरूचीं फुलें उडालीं कीं वाऱ्यावरती !
आकाशींच्या गंगेला कीं बुदबुद हे येती !
नव टिकल्यांची चंद्रकळा कीं गगनश्री नेसे !
स्वर्गीचें भांडार उघडलें कीं रात्रीसरसें !
विश्वशिरावर टोप चढविला हिऱ्यामाणकांचा !
मंगल मंगल जिकडे तिकडे जय मांगल्याचा !
रजनीदेवी ! वैभवशाली तूं अमुची राणी,
हीं नक्षत्रें; तारा साऱ्या, लीन तुझ्या चरणीं,
ज्याच्या त्याच्या तारा वांटुन दे ग्रहगोलांनां,
गगन-मंडलीं फेर धरूं दे प्रेमाचा त्यांनां.
दिशादिशांला तुझीं गाउनी प्रेमाचीं गाणीं
रजनीदेवी ! विश्व टाक हें प्रेमें भारोनी !

काळ्या काळ्या या पडणाऱ्या अंधारासंगें
ब्रह्मांडाचें हृदय नाचवीं प्रेमाच्या रंगें !

*　　　*　　　*

काळ्या अंधरांत खेळतें विश्व लपंडाव,
ताऱ्यांवरती बसून बघती तें कौतुक देव.
दहा दिशांनीं पांघरूनि या काळ्या बुरख्याला
काळा बागुल काळोखाचा एक उभा केला.
मंद मंद तेजांत शोधिते गगनश्री त्यांनां,
पाजळूनि हे नक्षत्रांचे रत्नमणी नाना,
खेळ चालला एकसारखा हा खालींवरती,
पूर्वदिशाही तोंच हांसली सांपडली हातीं !

*　　　*　　　*

उदयगिरीवर नव तेजाची शांत पताका ही !
कीं गंगेच्या शुभ्र जलाचा स्रोत वरी येई !
हे मेघांचे धुऊन पडदे स्वच्छ कुणीं केले ?
मंगल मंगल तेज चहुंकडे कुठुनि बरें आलें ?
अर्ध्या मिटल्या, अर्ध्या उघड्या असल्या नयनांनीं
कुणास बघती दिशा कळेना मंदस्मित करुनी ?
पहा उदेला दिव्य गोल हा--छेः,भलतं कांहीं !
हा तारांचा सखा तयांनां भेटाया येई !

*　　　*　　　*

तुमची राणी बसे सारखी तुम्हां न्यहाळीत,
गगनाच्या चौकांत चला हो, या रजनीनाथ !
धवल चंद्रिके ! दे आलिंगन दिव्य यामिनीला,
बहिणी बहिणी तुम्ही सुखानें चंद्राशीं खेळ !
कां तारांनों ! तुम्ही लाजतां ? हा मंगल काल !
निर्मत्सर व्हा, प्रेमसंगमीं पोहा चिरकाल !

ब्रम्हांडाचा गोल धरी या प्रेमाचा फेर,
फुलें शांतिचीं अहा उधळलीं जगतीं चौफेर!

*  *  *

निज निज आतां म्हणे जगाला वत्सलता माता,
रजनीदेवी गात बैसली अंगाई गीतां.
गगनाच्या या शेजेवरती निजवा तारांनां,
चंद्रा! दे ओढणी तुझ्या नव तेजाची त्यांनां.
हंसतां हंसतां झोंप लागली दहा दिशांनांहि,
ब्रह्मांडाचा गोल डोलतो, पण जागा नाहीं!
या प्रेमाला गातां गातां कविचेंही चित्त
प्रेमाच्या निद्रेंत रंगलें पाठ गात गात.

[ ३ ]

## निर्झरास.

गिरिशिखरें वनमालाहि  दरी दरी घुमवित येई!
कड्यावरुनि घेऊन उड्या  खेळ लतावलयीं फुगड्या.
घे लोळण खडकावरती,  फिर गरगर अंगाभंवतीं,
जा हलुहलु वळसे घेत  लपतछपत हिरवाळींत.
पाचूचीं हिरवीं रानें  झुलव गडे, झुलुझुलु गानें!
वसंतमंडप-वनराई  आंब्याची पुढती येई.
श्रमलासी खेळुनि खेळ  नीज सुखें क्षणभर बाळ!
हीं पुढचीं पिकलीं शेतें  सळसळती-गाती गीतें,
झोंप कोठुनी तुला तरी,  हांस लाडक्या! नाच करीं.
बालझरा तूं-बालगुणी  बाल्यचि रे! भरिसी भुवनीं!

*  *  *

बालतरू हे चोंहिकडे  ताल तुला देतात गडे!
प्रेमभरें त्यांवर तूंही  मुक्तामणि उधळुनि देई!
बुदबुद-लहरी-फुलवेली  फुलव सारख्या भंवतालीं.
सौंदर्ये हृदयामधलीं  दे विश्वीं उधळून खुलीं!

गर्द सावल्या सुखदायी   वेलींची फुगडी होई!
इवलालीं गवतावरती   रानफुलें डुलती हंसती.
झुलवित अपुले तुरे तुरे   निळी लव्हाळी दाट भरे.
जादूनेंच तुझ्या बारे!   वन नंदन बनलें सारें!
सौंदर्याचा दिव्य झरा   बालवसंतचि तूं चतुरा!
या लहरीलहरींमधुनी   स्फूर्ति दिव्य भरिसी विपिनीं!

* * *

आकाशामधुनी जाती मेघांच्या सुंदर पंक्ति;
इंद्रधनूची कमान ती ती संध्या खुलते वरती;
रम्य तारका लुकलुकती नीलारुणफलकावरती;
शुभ्र चंद्रिका नाच करी स्वर्गधरेवर एकपरी;
हीं दिव्यें येती तुजला रात्रंदिन भेटायाला!
वेधुनि त्यांच्या तेजानें विसरुनियां अवघीं भानें
धुंद हृदय तव परोपरी मग उसळली लहरी लहरी.
त्या लहरींमधुनी झरती दिव्य तुझ्या संगीततति!
नवल न, त्या प्राशायाला स्वर्गहि जर भूवर आला!
गंधर्वा! तव गायन रे वेड लाविना कुणा बरें?

* * *

पर्वत हा, ही दरी दरी तव गीतें भरलीं सारीं.
गाण्यानें भरलीं रानें, वर खालीं गाणें! गाणें!
गीत मम स्थिरचर झालें! गीतमय ब्रह्मांड डुले!
व्यक्त तसें अव्यक्तहि तें तव गीतें डुलतें झुलतें!
मुरलीच्या काढित ताना वृंदावनि खेळे कान्हा;
धुंद करुनि तो नादगुणें जडताही हंसवी गानें;
दिव्य तयाच्या वेणुपरी तूंहि निर्झरा! नवल परी—
गाउनि हें झुळुझुळु गान विश्वाचें हरिसी भान!
गोपि तुझ्या हिरव्या वेली रास खेळती भंवतालीं!
तुझ्या वेणुचा सूर तरी चराचरावर राज्य करी!

* * *

काव्यदेविचा प्राण खरा तूंच निर्झरा ! कवीश्वरा !
या दिव्यांच्या धुंदिगुणें दिव्याला गासी गाणें.
मी कवितेचा दास, मला कवी बोलती जगांतला,
परि न झरे माझ्या गानीं दिव्यांची असली श्रेणी !
जडतेला खिळुनी राही हृदयबंध उकलत नाहीं !
दिव्यरसीं विरणें जीव जीवित हें याचें नांव;
तें जीवित न मिळे मातें मग कुठुनी असलीं गीतें ?
दिव्याची सुंदर माला ओवाळी अक्षय तुजला !
तूंच खरा कविराज गुणी सरस्वतीचा कंठमणि !
अक्षय तव गायन वाहे अक्षयांत नादत राहे !

* * *

शिकवीरे शिकवीं मातें दिव्य तुझीं असलीं गीतें !
फुलवेली–लहरी असल्या मम हृदयीं उसळोत खुल्या !
वृत्तिलता ठायीं ठायीं विकसूं दे सौंदर्याहीं !
प्रेमझरी–काव्यस्फूर्ति ती आत्मज्योती चित्तीं
प्रगटवुनी चवदा भुवनीं दिव्य तिचें पसरीं पाणी !
अद्वैताचें राज्य गडे ! अविच्छिन्न मग चोंहिकडे !
प्रेमशांतिसौंदर्याहीं वेडावुनि वसुधा-माई—
मम हृदयीं गाइल गाणीं रम्य तुझ्या झुळझुळ वाणी !
आणि जसें सगळें रान गातें तव मंजुळ गान,
तेंवि सृष्टिची सतारहि गाइल मम गाणीं कांहीं !

[ ४ ]

## [१]फुलराणी.

हिरवे हिरवे गार गालिचे, हरित तृणाच्या मखमालीचे,
त्या सुंदर मखमालीवरती + **फुलराणी** ही खेळत होती.
गोड निळ्या वातावरणांत अव्याज मनें होती डोलत;
प्रणयचंचला त्या भूमीला अवगत नव्हत्या कुमारिकेला !

---

१ एक कळी.

आईच्या मांडीवर बसुनी झोंके घ्यावे, गावीं गाणीं;
याहुनि ठावें काय तियेला साध्या भोळ्या फुलराणीला!

*   *   *

पुरा विनोदी संध्यावात डोलडोलवी हिरवें शेत;
तोच एकदां हांसत आला, चुंबून म्हणे फुलराणीलाः—
" छानी माझी सोनुकुली ती! कुणाकडे ग पाहत होती?
कोण बरें त्या संध्येंतून हळुच पाहतें डोकावून?
" तो रविकर का गोजिरवाणा आवडला अमुच्या राणींना!"
लाजलाजली या वचनांनीं, साधी भोळी ती फुलराणी!

*   *   *

आंदोलीं संध्येच्या बसुनी झोंके झोंके घेते रजनी;
त्या रजनीचे नेत्र विलोल नभीं चमकती ते ग्रहगोल!
जादूटोणा त्यांनीं केला चैन पडेना फुलराणीला;
निजलीं शेतें, निजलें रान, निजले प्राणी थोर लहान.
अजून जागी फुलराणी ही, आज कशी ताळ्यावर नाहीं!
लागेना डोळ्याशीं डोळा, काय जाहलें फुलराणीला!

*   *   *

या कुंजांतुन त्या कुंजांतुन इवल्याशा या दिवल्या लावुन,
मध्यरात्रिच्या निवांत समयीं खेळ खेळते वनदेवी ही.
त्या देवीला ओंव्या सुंदर निर्झर गातो; त्या तालावर—
झुलुनि राहिलें सगळें रान, स्वप्नसंगमीं दंग होउन!
प्रणयचिंतनीं विलीन वृत्ति कुमारिका ही डोलत होती;
डुलतां डुलतां गुंग होउनी स्वप्नें पाही मग फुलराणीः—

*   *   *

" कुणी कुणाला आकाशांत प्रणयगायनें होतें गात;
हळुच मागुनी आलें कोण, कुणी कुणा दे चुंबनदान!"
प्रणय-खेळ हे पाहुनि चित्तीं विरहार्ता फुलराणी होती,
तों व्योमींच्या प्रेमदेवता वाऱ्यावरती फिरतां फिरतां—

---

१ काजवे.

हळूच आल्या उतरुन खालीं फुलराणीसह करण्या केलि.
परस्परांनां खुणवुनि नयनीं त्या वदल्या ' ही आमुची राणी !'

* * *

स्वप्नभूमीचा जुळवित हात नाच नाचतो प्रभातवात;
खेळुनि दमल्या त्या ग्रहमाला हळुहळु लागति लपावयाला !
आकाशींची गभीर शांति मंद मंद ये अवनीवरती;
विरूं लागलें संशयजाल, संपत ये विरहाचा काल.
शुभ्र धुक्याचें वस्त्र लेवुनी हर्षनिर्भरा नटली अवनि;
स्वप्नसंगमीं रंगत होती तरीहि अजुनी **फुलराणी** ती !

* * *

तेजोमय नव मंडप केला, लख्ख पांढरा दहा दिशांला;
जिकडे तिकडे उधळित मोतीं, दिव्य वऱ्हाडी गगनीं येती.
लाल सुवर्णी झगे घालुनी हांसत हांसत आले कोणी;
कुणीं बांधिला गुलाबि फेटा, झकमकणारा सुंदर मोठा !
आकाशीं चंडोल चालला हा वाङ्निश्चय करावयाला;
हें थाटाचें लग्न कुणाचें–साध्या भोळ्या **फुलराणीचें** !

* * *

गाउं लागले मंगलपाठ, सृष्टीचे गाणारे भाट,
वाजवि सनई मारुतराणा कोकिळ घे तानांवर ताना !
नाचुं लागले भारद्वाज, वाजविती निर्झर पखवाज,
नवरदेव सोनेरी **रविकर** नवरी ही **फुलराणी** सुंदर !
लग्न लागतें, सावध ! सारे सावध पक्षी सावध वारे !
दंवमय हा अंतःपट फिटला भेटे **रविकर फुलराणीला** !

* * * *

वधूवरांनां दिव्य रवांनीं, कुणीं गाइलीं मंगल गाणीं;
त्यांत कुणीसें गुंफित होतें परस्परांचें प्रेम, अहा ! तें !
आणिक तेथिल वनदेवीहि दिव्य आपुल्या उच्छ्वासांहीं
लिहीत होत्या वातावरणीं **फुलराणी**ची गोड कहाणी.
गुंगत गुंगत कवि त्या ठायीं स्फूर्तीसह विहराया जाई;
त्यानें तर अभिषेकच केला नवगीतांनीं **फुलराणी**ला !

## [५]

## प्रेमलेख.

मेघाचें करि भूर्जपत्र धरुनी अस्ताचलीं प्रत्यहीं
स्वर्गीचे नव लेख कुंकुमरसें ती सांध्यदेवी लिही;
रात्रीं शांत गभीर अंबुनिधिच्या आनील पृष्ठावरी
लज्जालेख लिही विकंपित करें ती तारकासुंदरी;
श्यामा निर्झरिणी पुनःपुनरपी सारीत नीलांचला
मुग्धालेख सुरम्य सैकतिं लिही मंदोर्मिमालाकुला;
वेलींचे स्वकरें कराग्र धरुनी त्या मंदमंदानिलें
क्रीडालेख वनस्थलीहि लिहिती कांहीं तरी आपुले.
हे सारे मधुलेख घेउनि जगीं नाचोत वेडे कवि,
गावो गीतशतें तयांस, मजही त्यांची कळे थोरवी.
लज्जामुग्ध परी शिरःकमल तें ठेवून माझ्या उरीं
श्वासांच्या कवनीं लिही प्रियतमा ही प्रेमलेखावळि.
सारे ते मग लेख तुच्छ गमती चित्ताचिया लोचनीं,
तीचा अक्षय लेख एकच, उभा मी मग्न पारायणीं !

## [६]

## काल आणि जीवित.

गेले भंगुनि दुर्ग, दुर्गगिरिचीं गेलीं झरोनी शिरें,
गेले देश कितेक राख बनुनी संतप्त कालानलें.
होवोनी थरकांप, पेटुनि मनीं, ज्वालामुखें प्रत्यहीं
जें तें नश्वर ! ‘ हाय हाय ! ’ म्हणुनी निःश्वास टाकी मही !
भूमीचा बडिवार काय तरि या, तो विश्वसाक्षी वरी,
कालव्याधशरें प्रतापनिधिही घायाळ हो अंतरीं;
शुक्राच्या शशिच्या कला स्मरुनि हो स्वर्देवता सुंदरी;
भीतिलस्त, खगोलनेत्र करुनी दिङ्मूढ वेड्यापरी !
काळाचा घनघोर उग्र वणवा दुर्वार्य ऐसा जरी
ब्रह्मांडांत प्रतिक्षणीं भडकुनी अस्वस्थ चित्ता करी,

चित्ताच्या परि नंदनांतिल पहा एकेक माझ्या कळी
स्वानंदांत डुलोनियां प्रगटवी स्वामित्व कालानलीं!
जावो विश्व जळून, जीवित तुझें कालस्थलाबाधित,
प्रीतीनें मज हा धडा शिकविला, हो शांति हस्तंगत!

——:•:——

## बाळकृष्ण दिनकर वैद्य, कल्याणकर.

जन्म–इ. स. १८४९. मृत्यु–इ. स. १९११.

### संवय.

बांध्याचा कधिं एळकोट न सुटे पागा मिळाली जरी,
जोशी भूपति जाहला सतत ना पंचांग सोडी तरी;
दासीची बनली जरीहि महिषी सभ्यत्व येना तिला,
झालेली सवयी सुटे न सहसा ऐसें तुका बोलिला:
कोणाला घडली शिवाशिव तरी ती सर्वही चालते,
कोणाला नच सावली पतकरे ऐशीच हो चाल ते;
कोणी पत्करिता उरोषण परी हा दोष त्या नावडे,
कोणी उंः करुनीच गट्ट करिती निर्लेप पोळया वडे.
कोणाची सवयी विलक्षण सदा वासूनि तोंडा वसे,
कोणाची सवयी विलक्षण अशी कीं बोलतांना हसे;
कोणी लेखन हो करीत असतां ही जीभ काढीतसे,
कोणी स्वस्थ असो सभेंत घरीं वा थुथ्थुथ्थु थुंकीतसे.
कोणी शिरीं सहन हो करि दों मणांला,
कोणास ही जड गमे पगडी शिराला;
टोपी शिरीं धरि कुणी अथवा रुमाला,
ऐसा प्रकार सवयीविण काय झाला?
मुकाळू, झोंपाळू, चपल, खुनशी, तापट, खुळा,
महालोभी, लोभी, कृपण, उधळ्या, घामट, बुळा,
विनोदी, स्वच्छंदी, कपटपटु वा, वात्रट, खुनी,

किती नांवें सांगूं संचय मिळवी जीं प्रतिदिनीं !
मारी हो मिटक्या सदोदित कुणी त्यावीण खातां नये,
पात्रीं अन्न न टाकिल्याविण कधीं खाणेंहि अंता नये;
कोणी स्वच्छ करून पात्र उठतो त्या टाकणें नावडे,
कोणाची दिसते विचित्र सवयी कीं जेवलें कोंबडें !

[२]

## संसार.

सदसद्विचार करुनी हृदयीं खुशाल भव हा करा
वाटतो वैराग्याहुन बरा.
संसारामधिं असून नत जरि ईश्वर चिंतिल मनीं,
तरी मग काय अधिक हो वनीं !
कुवासनाक्षय अमोल गुण हा बसेल जो साधुनी,
तयाला नलगे केवळ धुनी
परोपकारा द्रव्य खर्चिलें न ठेविलें बांधुनी,
तयाला न निंदिलें साधुंनीं,
तुह्मि खुशाल नर हो संपत्ती मेळवा,
नच भुलुन तयांनां स्त्रिया सुताहि खेळवा,
मनिं माझा इतुका बोध मात्र घोळवा–
सद्युक्ति, सत्पथ, सत्संगति हीं प्रेमानें आदरा,
सांगतों मार्ग तुह्मांला खरा.
मनुजा ! सुखदायक हें वैभव असतें त्याज्यच जरी,
करी सर्वज्ञ प्रभु कां तरी ?
विरक्त होउनि नरें फिरावें वनिं पशुपक्ष्यांपरी,
योग्य तरि बुद्धि न देता हरि.
सर्वज्ञ प्रभु वैभव इतुकें कोणासाठीं करी,
घडीभर मनन करीं अंतरीं.
कां टाकुनि देइल सुदैव विषवल्लिला ?
कां ज्ञानी मानिल व्यर्थहि भगवल्लिला ?

घ्या समजुनि घ्याहो या सद्गुरुकिल्लिला,
पीयूषासम विषवल्लीहो मिळतां योजक बरा,
समजुनी बोध मनीं हा धरा.
नर हो ईश्वरचिंतन होतें वैराग्यपथीं बरें,
म्हणति परि नसे सर्वथा खरें.
भवसुख सुचतां ज्ञानी देखिल होती हो बावरे,
प्रसंगीं अज्ञ जसा धावरे.
न साधुनी वैराग्यहि नर हो स्त्रीधन बघतां झुरे,
कसा मग तो भगवंता स्मरे ?
घालि तो गळ्यामधिं माळ मात्र साजरी.
घोळतें सदा हें वैभवसुख अंतरीं,
आणितो आव ठकवितो जना बहुपरी.
व्यर्थ व्यर्थ हें, अवघें पातक समज उमज पामरा !
म्हणतसे बाळकृष्ण मनिं धरा.

——:•:——

## मोरो गणेश लोंढे.

जन्म–इ. स. १८५४. मृत्यु इ. स. १९१९.

### जगावें कशाला ?

जगावेंसें वाटे बहुत वरुषें या महिवरी,
कशाला कां, याचें वर न वदवे उत्तर तरी !
जरी स्वार्थासाठीं खपुन सगळें आयु सरवी,
कशाला हा भोगी वर नर अशी थोर पदवी ?
प्रकाशें तेजानें रवि महिस भाजी निजकरें,
जलातें शोषूनी सकल करितो शुष्कहि सरें,
जनांला प्यायाला जल न गवसे शुद्ध अमल,
पशूंचे सांगाडे बहुत फिरती हीन अबल:

अशा वेळीं येई गडगडुनि मोठा घन, जल-
 करीं जेथें तेथें सकल हरुनी दुःखद मल;
वरी भूमींतूनी हरित तृण वेगें उगवतें,
 पशू खाती मोदें, जनन मज तें धन्य गमतें!
मरायाला आले सकल जन येथें, कळतसे,
 भयाला पाबूनी सतत तरि मागें पळतसे;
न मित्राला देई मदत समयीं योग्य भिउनी,
 कशाला पृथ्वीच्या वरि तरि उगा भार जगुनी!
असे हा मृत्यूच्या सतत वदनीं वर्तत नर
 मिटी त्याला वाटे वदन झटि तेव्हां भयकर!
कशाला त्या भ्यावें सतत बरवें कार्य करितां?
 जगायाची इच्छा फुकट मनिं सत्कार्य नसतां.
पहातां कोणाचें मरण मनिं दुःखें भरतसे,
 उगा वेड्यासारा दिवसरजनी कीं झुरतसे;
किती केलें तेणें उचित हित कैसें महिवरी?
 नसे ऐसें कांहीं, जननमरणीं एकचि परी.
जरी आला आतां पसरुनि मुखाला यम पुढें,
 कळेना कोणाचें म्हणवुन किती होइल कुडें;
जरी वाटे यावा जवळि न कधीं तो यम मुळीं,
 तरी येतो नेमें, अवचित हरी जीवित पळीं!
करी सत्कार्याला लवकर जरी सज्जन मरे-
 तरी त्याची कीर्ति सकल जगता व्यापुनि उरे;
उगा वेड्यासारा भ्रमत फिरुनि फार जगतो-
 कशाला तो लोकीं? महिस नुसता भार गमतो!
कशाला व्हावें तें बहुत जरि आयुष्य असलें
 सुकार्यी केव्हां जें मुळिंच गुतलेलें न दिसलें?
पहा मोठे मोठे दगड पडले या महिवरी,
 युगें गेलीं मोठीं तरि न झिजले ते अणुभरी.

सदा आयुष्याचा पळ पळ असा खर्च पडतो,
परी कोण्या कामीं मनन करितां जीव उलतो;
सदा भोगीं रंगे, दिवसरजनी व्यर्थ दवडी,
अमोला वेळाचें समजुनि गणी मोल कवडी !
जगावें यासाठीं–सतत गवसो भोज्य बरवें,
जगावें यासाठीं–वसन वर ल्यावें नवनवें,
जगावें यासाठीं–वरसुरतरंगीं मन जडो,
नराच्या जन्माला तरि खचित येणेंच न घडो !
पशू पक्षी घेती जनन, बरवे रंग करिती,
चरायाला जाती, सतत अपुलें पोट भरिती,
पिती पाणी मोदें, भटकुनि वयाला खपविती,
कशाला यासाठीं नरतनु ? तिची काय गणती ?
मुलें बाळें होतीं, सतत खपती त्यांस जपती,
घरें दारें कष्टें बहुत करिती, त्यांत वसती,
पुरें होतां आयू मरुन पडती कालगतिनें !
कशाला यासाठीं नरतनु ? वदूं काय वदनें !
कशाला देवानें नरतनु तरी सुंदर दिली ?
विचाराची शक्ती अनुपम कशी तींत भरली ?
विचारूनी चित्तीं खरचिल सुकार्यीं निजबळ–
तरी त्याचें लोकीं जनन मग होईल सफळ.
जरी वाणी लाभे मधुर तरि बोधा जनमना,
दुज्याला बोलूनी कटु न शिणवा, ना तुम्हि शिणा;
जरी शक्ती मोठी सतत परकार्यीं रति धरा,
विपद्ग्रस्तांलागीं मुदितवदनें साह्य वितरा.
जगीं दुःखी प्राणी असुख विसरो संगतिमुळें,
फुलांनां पाहूनी सुख बहुत घेती अलिकुळें;
जरी लाधे पैसा मदत गरिबाला तरि करा,
तृषार्तांना जैसा जल पुरवितो सुंदर झरा.

———:०:———

# लक्ष्मण पांडुरंग भोसेकर.

जन्म–इ. स. १८५५.

## मनास बोध.

अनुताप चित्तिं होउनि भाव धरिशि तरि नको बहिर्नमना,
 नमनाचा न, मनाचा, देव भुकेला तुला कळे न मना !
आजन्म राबलासी सुखवाया आप्त, इष्ट–राजी वा,
 राजीवाक्ष विसरशी न गमे हा केंवि खर्खरा जीवा.
उत्तम नरजन्माचें सार्थक करणें मना तुझ्यावरती.
 वरिती न शांति इंद्रिय–गण जरि षड्रिपु तुला न आंवरती.
घालिसि भवांत पिंगा जेंवि मुली खेळण्यांत माहेरीं.
 हे रीत अज्ञपणचि, श्रीपति–गृह दूर दृष्टिनें हेरीं.
खाणींत कोळशाच्या राहुनि म्हणशीं ‘ न वस्त्र शुभ्र मला,’
 भ्रमलास अविद्येनें, जैसा गुळ–खोबरीं शिशु भ्रमला.
भवमोह खैर–इंगळ, तेथ निजुनि ताप तव कसा जाई ?
 जा ईश्वरा शरण, भरिं शेज सुवैराग्य पुष्पिं जुइ जाई.
खोटें—नाटें स्वल्पहि न करिं मना भुळुनियां स्वलाभाला,
 भालास तुष्ट राहीं अनृत तुला टोंचु जेंवि उरिं भाला.
‘ गर्व नसावा ’ बोलसि, परि तव वर्तनिं मना दिसे न तसें,
 नत सेविति अभय मना, गर्व तिरस्कार वैर जोडितसे.
गीतें ताल सुवाद्यहि सामग्री अळविण्या रमारंगा;
 रंगावें तन्नादें हरिभजनीं, त्यजुनि विषय दुःसंगा.
सोडुनि कर्मफलेच्छा अर्चन पूजन करील देवाचें
 वाचें स्मरण हरीचें, तोचि मना जन्मसार्थका वांचे.
कैवर्तक भवसागरिं प्रभुवांचुन, अन्य सर्व जन काचा
 कांचा इतर, न रत्नें, समजुनि हो दास विश्वजनकाचा.
गोडी किती वदूं तुज श्रीहरिभक्तींत जी सदा राहे,
 दारा—हेतु त्यजुनी पी तूं भक्ती—सुधा उदारां हे !

अंतरिं तूं विषयेच्छु, खोडिल ओढाळही गुरांपरिस,
 परि सद्गुरु—कृपा तुज सुधरिल लोहास जेंवि कीं परिस.

[ २ ]

## वृद्धापकाळची इंद्रियांस प्रार्थना.

ज्ञातांचा दश इंद्रियांत, रसने ! व्यापार मंदावला,
 सारा भार भवाब्धितारणिं तयीं माथीं तुझ्या टाकिलाः
केंसांनीं निजकालिमा दवडिला, ते शुभ्र स्वाभ्यंतरीं,
 ग्रीवा होइ सकंप नम्र; वद गे श्रीराम आतां तरी !
बालत्वीं वदसी न राम रसने ! तेव्हां तुला सोडिलें—
 दांतांनीं, परि ते पुन्हां परतले, प्रौढत्विं विश्वासले;
रामीं प्रीति तुला अजून नुपजे, ते खिन्न कीं अंतरीं,
 जाती सोडुनि एक एक वद गे श्रीराम आतां तरी !
हे जिव्हे ! वद राम, चिंतुनि मना श्रीशांघ्रि तल्लीन हो,
 हस्तांनों ! तुह्मि केशवार्चन करा, प्या तत्कथा कर्ण हो !
नेत्रांनों ! हरिला बघा, चरण हो ! जा विष्णुच्या मंदिरा,
 घ्राणा ! हुंगिं मुकुंद-पाद-तुळशी, कृष्णा नमीं रें शिरा !

[ ३ ]

## गवत.

दुर्दैवें जन जो जलाशय—जलीं जातां बुडूं लागतो,
 कांठाच्या गवतासही लगबगां तो संभ्रमें आश्रितो.
भासे क्षुद्र परी पहा गवत तें भीतास साह्या करी,
 तारी त्या अथवा तयासह उडी घाली जलाभीतरीं.
कैशी ही उपकारबुद्धि गवतीं, तें धैर्य-तें शौर्यहि,
 ऐसे सद्गुण मानवांत विरळा, धुंडोनि पाहा मही.
मोठे वृक्ष कडाडती, जंव नदीमाजीं महापूर ये
 रक्षी या गवतास ईश, शिवती यातें न त्याचीं भयें.

[४]

## दिव्यांतील वात.

ही दीपांतिल वात सूक्ष्म असुनी अंगीं पिळा वाहते,
तैलीं स्नान तसेंच पान करुनी पुष्टीस संपादिते;
स्पर्शे अग्नि तदा सुरक्षुनि वपू तेलास देते बळी,
काळें तोंड तिचें कधीं न उजळे, झाडोनिही काजळी.
यासाठीं जन संकटीं गवसला येई जरी आश्रया,
त्यातें शक्त्यनुसार साह्य करितां आनंद त्या चिन्मया;
तो विश्वाधिपती सहेतुक रची सृष्टी, नसे वानवा,
हंसक्षीरचि न्याय हा समजुनी बोधास घे मानवा.

———:०:———

## ' चिंतामणि. '

जन्म—इ. स. १८८८. मृत्यु इ. स. १९१९.

## सूर्यान्योक्ति.

आली उषा, गगन लोहित घेत झांकी,
बालार्करूप शिशुला प्रसवे दिशा कीं !
गेले शशांकधर, तारकही निघोनी,
जावें प्रसूतिसमयीं न समीप कोणी !
त्या सप्तवर्णयुतहस्तकवर्तिकांहीं*
तूं रंगवीशि नभ आणि दिशाहि दाही,
तेव्हां प्रवीण दिसशी मज चित्रकार
होती बघून तव चित्र कुणीहि गार.
घोरप्रतिज्ञ घन × वायुविसृष्ट सूर्या,
आले विदूषित तुझें यश जे कराया—

*इंद्रधनुष्यांतील साताहि रंग ज्यानें घेतलेले आहेत अशा हातांतील कुंचल्यांनीं. ×वाऱ्यानें पाठविलेले.

त्यांनां सुवर्णवसनेंहि अनर्घ्य देशी
    हा! थोरशील! कुजनांसहि तोषवीशी!
भो मित्र! मित्र दिसतो तव तोयराशी,
    नेशी नभीं ÷ निजकरीं धरिशी उराशीं;
जाशीहि रात्रभर सोल्लस वारिधामा
    आलिंगिण्या खचित 'मित्र' यथार्थनामा!
जेव्हां त्वदस्त घडुनी रजनी विलासे
    टाकी तदा तव सुहृद् बहुधा + उसासे;
*शीतांशुदर्पणगत–प्रतिबिंब लोभें
    पाहूनि मित्र तव निर्भर तो उचंबे!
मंदप्रताप वळला रवि पश्चिमेळा
    त्या पश्चिमक्षितिजसिंधुसमीप गेला,
पाहूनि बिंब उदकीं रभसें निघाला
    त्यासी ज्वलन्मुख सकोप भिडावयाला!
विक्रांत सर्व जगही निमिषांत केलें,
    त्याचेंहि तेज शिव! चार पळांत गेलें!
हें नित्य नित्य बघतों जन सर्व आम्ही
    होई तथापि मति केंवि न योग्य कर्मी?

[ २ ]

## वीरपत्नी कोण?

[ तलवार वीरपत्नीला म्हणते.]

घेई मला कडेवरि, क्षण न विसंबे मला प्रियसखा तो
    ध्यातो मलाच समरीं, आनंदेंही सदा सखा गातो.
देतें सुयश तयाला, करितें जगतांत मान्य अवलोक,
    देतें समरीं मरतां अमला कीर्ती अलभ्य सुरलोक!

---

÷आपल्या किरणां (च्या उष्णते) नीं +रात्रीं पाण्यांतून वाफा निघतांना दिसतात. *चंद्र हाच कोणी एक दर्पण, त्यांत पडलेलें प्रतिबिंब. सूर्याचें प्रतिबिंब. चंद्र स्वयंप्रकाश नाहीं.

अन्योन्यप्रीति अहा ! वर्णावी कोणत्या प्रकारानें !
मजला त्यजील जरि तो जाइन झुरून रोज गंजानें !
मीच खरी शूरसखी, आहे मजलाच योग्य तो मान,
मजलाच वीरपत्नी ऐसें म्हणतात सार्थ विबुधजन.
मत्पातिव्रत्य कडक तेज म्हणुनि दुर्निरीक्ष्य आंगींचें,
धारास्पर्श करिल जो गरल कमी तो म्हणेल नागींचें !
नांवाच्याच तुम्ही गे पति मरतां प्राण मात्र गे देतां,
घेतां 'अबला' म्हणवुनि शूरांच्या होउनी तुह्मी दयिता !

* * *

[ वीरपत्नीचें प्रत्युत्तर.]

अवलेपयुक्त परिभवकारक वच परिसुनि स्वसवतीचें
जलपूर्ण नयन झाले, शब्द अधर पावले प्रसव तीचेः—
" रिपुकंठभेददक्षे कटु हे असतीस योग्य वच असती,
मर्मच्छेदक असले योजील न केधवांहि वीरसती:
" मजला विवाहकालीं द्विजवरकरमंत्रितांबुसेकानें
याराधांगी केलें, म्यां न मरावें उगाच शोकानें.
" तूं स्फुरण त्यास देशी हेतिहतिश्रमविनाश जें करितें,
मी अधरामृत देतें जें अखिलभवश्रमांस संहरितें.
" देतें तत्प्रातिम कुमर भ्यावें जगद खलही यदश्वरजें,
तुज धाराहत भीतो, अर्पण करितेस राज्य नश्वर जें.
" दीप्तिमती तूं वरुनी अंतर परि तव कठोर लोहाचें
आजवरी शाप तुवां करवाल, घेतले कितीकांचे !
" खलकंठीं नम्र पडसि खलजनसंसर्ग तुज करी भ्रष्ट,
खलहस्तगामिनी तूं होतां करिशीलहि स्वपति नष्ट !
" केंवि तुवां इच्छावा करवाले, मान वीरपत्नीचा ?
दासीच तूं तयाची, साध्वींत गणील कोण गे नीचा ?

——:०:——

# पारुजी नारायण मिसाळ.

जन्म—इ. स. १८८८.

## कवीचे मित्र.

कवे ! मित्र हे जिकडेतिकडे तुझे पसरले जगावरी,
प्रेमानंदें नाचति तुजवरि तत्प्रेम दिसे कितीतरी !
गगनीं तारा या फुलल्या, पाहुनियां तुजला खुटल्या, भानहि विसरुनियां गेल्या !

पाहुनि हंसती तुझ्याकडे त्या, तूंही हंसशी बघुनि वरि !
कवे ! मित्र हे जिकडेतिकडे तुझे पसरले जगावरी !
व्हावें तुजला सौख्य म्हणूनी सुधा सुधाकर वर्षितसे,
तुझ्या सुखास्तव यत्न तयाचे, तुझ्या दर्शनें हर्षतसे !
निज ज्योत्स्नेच्या सृष्टीतें, करुनी शोभवि सृष्टीतें, व्हावें सुख तव दृष्टीतें—

इच्छा ऐशी असे तयाला आहे तो नभिं दूर तरी,
कवे ! मित्र हे जिकडेतिकडे तुझे पसरले जगावरी !
पहा पहा हें हांसत आहे फूल दूर पाहून तुला,
किती प्रेम तुजवरी तयाचें गमे न जगतीं तया तुला !
कितीक तत्त्वें नवीं नवीं, बोधाचीं तुजला शिकवी, जणूं सुधेची देत चवी !

मरतांही निज मित्रां बोधिति असे मित्र किति शोध तरी
कवे ! मित्र हे जिकडेतिकडे तुझे पसरले जगावरी !
आभरणें नवनवीं घेउनी सृष्टि दृष्टि तव तुष्ट करी !
सुख द्यायातें झटे सदोदित अन्य आस नच मनीं धरी.
असेल माझा मित्र जिथें, व्हावें त्याला सौख्य तिथें, वागा ऐसें, प्रिय मज ते—

सेवक, मित्रां सांगत फिरते, या प्रेमा येई न सरी !
कवे ! मित्र हे जिकडेतिकडे तुझे पसरले जगावरी !
अगणित तुजला मित्र लाभले गुणां नसे ज्यांचिया सरी
सरस्वतीची कृपा जाहली जईं कविवरा ! तुझ्यावरी—
जगन्मित्र हें नांव तुला, योग्य दिसे लाडक्या मुला, ईशाच्या, विज्ञप्ति तुला—

मित्र आपुला म्हणविशि मज का ? नेशी प्रेमें धरुनि करीं—
सरस्वतीची भेट करविण्या पुसतों, तूं कां स्तब्ध तरी ?

——:०:——

## भास्कर मोरेश्वर कीर्तने.

जन्म—इ. स. १८९१.

### 'उद्यांचा नको करूं वायदा.'

काळ चालला, धरीं तयाला, करी तुझा फायदा
उद्यांचा नको करूं वायदा !
शास्त्रज्ञानी काय म्हणे कीं—सूर्यासहि नाहिं ती
उद्यांच्या उदयाची शाश्वती !
येइल ऐसा दिवस कधितरी, सूर्य न जेव्हां वसे,
कळेना, तोच उद्यांचा असे !
तो रवि तेजस्वी विभूतिमान् जरि असे,
तरि नाश तयाला, नवल होय हें कसें ?
असति हे इन्दु इन्द्रादि देवही तसे.
तूं तर नररे, दीन हीन कीं, क्षणभंगुर जीवित
आजचा नाहीं दिन शाश्वत !
बाळपणीं तूं अजाण खेळसि; यौवनिं तूं जाणता
असज्जगिं भासतसे सत्यता.
संसारामधिं गुरफटसी, तो वृद्धपणा ये तुज
आठविसि हरिचें चरणांबुज !
परि हात कांपतो, कृत्य कराया न ये,
हरिनाम आननीं नीट वदाया न ये
तें भविंचें आशाजाल तोडतां न ये,
तापहि होतो, परि तो पश्चात्, उपयोगी काय तो ?
मृत्यू सन्निध तों गांठतो !
सर्वव्यापी, सर्वज्ञानी, सर्वशक्ति ईश्वर
असे तो एक, ऐक रे नर.

सदसत् यांची विचारणा जी बुद्धि करी अंतरीं
जाण तीं अंश असे ऐश्वरी.
सत् करी हितासी, असत् विनाशा करी,
तूं चाल निश्चयें, तर गत दिसते बरी;
मन चंचल तुझें मध्यें येइल जरी—
पाडिल मोहीं, स्मृतिविभ्रम मग, बुद्धिनाश लांब न,
ऐसें होइ तुझें नाशन!
कृत्य करावें धार्मिक, ऐसें येइ तुझ्या मानसीं
परंतू असशी तूं आळशी.
कामक्रोधादिकां मात्र तूं अहर्निशीं तोषिसी
कथितों. करीं उलट यांजसी.
करिं निवड यांमध अशी, सांगतों तुला
करिं 'आज' धर्म, उपकृती, शिक्षणादिला,
करिं 'उद्यां' अपकृती अधर्मादि यांजला;
पुनरपि धार्मिक कृत्य उद्यांला सुचेल; लांबेल तें—
अधार्मिक, नाश असें पावतें.
जाते घडि ही असे आपली, कुणीं पाहिलें उद्यां?
निश्चयें म्हणसी 'करुं ह उद्यां'
मोहक, नाशक परी 'उद्यां' कीं, 'आज' च फलदायक
अधिक अरि गम त्रासकारक.
जरि मृत्यु आज ये. विचारील तो खरें—
'कृति काय आजवरि केली ती सांग रे?'
तरि आज, आज अजमान आज तूं स्मरे.
मयूरशतनयाचें ऐकें यांत तुझा फायदा,
उद्यांचा नको करूं वायदा!

# शारदाप्रसादनमंडळ, पुणें,

याची

## अभिनवकाव्यमाला.

( विक्रीस तयार. )

| भाग | संपादक | किंमत |
|---|---|---|
| दुसरा | रा. नार[illegible] वामन टिळक | एक रुपया. |
| तिसरा | रा. नर[illegible]तामण केळकर | एक रुपया. |
| पांचवा | सौ. सरस्वतीबाई भिडे | एक रुपया. |

( तयार होत आहेत. )

| भाग | संपादक | किंमत |
|---|---|---|
| चवथा | रा. भाडखोलकर व रा. केळकर | एक रुपया. |
| सहावा | रा. लक्ष्मणशास्त्री लेले | एक रुपया. |

रा. लक्ष्मणशास्त्री लेलेकृत.

| नांव. | किंमत. |
|---|---|
| तिलकांजलि | चार आणे. |
| पद्यमंजरी | आठ आणे. |
| संस्कृत [illegible]पाठमाला, भाग पहिला | बारा आणे. |
| ,, भाग दुसरा | एक [illegible]या दोन आणे. |

नवीन किताबखाना, बुधवा[illegible] चौक,

पुणें सिटी.